
म. ग्रं. सं. ठाणें.
विषय भूप्रवास
सं. क्र. ८०५



# महाराष्ट्राचे जिल्हे

## परभणी

प्रसिद्धि विभाग महाराष्ट्र सरकार मुंबई

# प रि च य

परभणी जिल्हा हा भूतपूर्व हैद्राबाद संस्थानच्या मराठवाडा या भागांतील पांच जिल्ह्यां-पैकीं एक जिल्हा असून मराठवाड्याच्या अितिहासांत ह्याची परंपरा अश्मयुगापर्यंत मागें जाते. प्राचीन भारताच्या इतिहासामध्यें अश्मयुगांत गोदावरीच्या खोऱ्यांतील प्रदेशाची फार उन्नति झाली असावी असा संशोधकांचा अंदाज आहे. **ऐतिहासिक पार्श्वभूमि** अशोकानें दक्षिणेत स्वाऱ्या केल्यामुळें परभणीच्या विकासाला बहुमोल मदत झाली. हा जिल्हा देवगिरीच्या यादवांच्या अधिपत्याखालीं कांहीं वर्षे होता. १४ व्या शतकाच्या प्रारंभास अल्लाउद्दिन खिलजीने यादवांचा बिमोड केला त्यावेळीं हा जिल्हा अल्लाउद्दिनाच्या ताब्यांत गेला. त्यानंतर तघलक घराण्याचा उच्छेद झाल्यानंतर आसूफशाही आपली पाळेमुळें घट्ट रोवीपर्यंत परभणीचें अनेक मुसलमान राजघराण्याकडे हस्तांतर झालें आणि शेवटी तो आसफशाही राज्यांत समाविष्ट झाला. परभणीचा आजचा उध्वस्त किल्ला हा यादव राजांनी बांधलेला असावा असा तर्क आहे.

**नैसर्गिक स्फूर्तिस्थानें**ः—परभणीचें जुनें नांव प्रभावती असें होतें. परभणीचा हा परिसर पूर्णा, दूधना, कयाधू, आसना, करपरा आदि नद्यांनी युक्त आहे. ह्या जिल्ह्यांतून सह्याद्रीच्या, बालाघाट आणि सातमाळ या पर्वतरांगा पसरलेल्या आहेत. जमीन, हवामान, पाऊस व नद्यांचे प्रवाह यांनी परभणी जिल्ह्याच्या भूमीला कुठे सुजल, कुठे सुफल तर कुठे निर्मल आणि नापीक केलेलें आहे.

**जेथें महासिद्धींचीं भांडारें**
**अमृताचीं कोठारें**
**जीये गांवी खिल्लारें**
**कामधेनूचीं**

ज्ञानदेवांनीं आपल्या अमृतमय वाणीनें केलेलें हें वर्णन परभणी जिल्ह्याला अगदीं चपखल लागू पडतें. विविध प्रकारच्या फुला फळांना, भाजीपाल्यांना आणि पिकांना जोपासून येथील भूमातेची कूस धन्य झाली आहे. इसवी सनापूर्वी सात वाहनांच्या काळांत गोदातटाकी महाराष्ट्र सारस्वत आणि संस्कृति यांचा जो उद्‌गम झाला त्याचा वारसा परभणी जिल्ह्याला लाभला होता. महर्षी अगस्तीच्या दक्षिण दिग्विजयानें या जिल्ह्यांत ठायीं ठायीं तीर्थें निर्माण केलीं आहेत. पौगंड, पोलस्व यासारखे तपोधन, गोरख, गैबी आणि गहिनीनाथ यासारख्या श्रेष्ठ नाथपंथीयांनी या जिल्ह्यांत वास्तव्य व साधना केल्याचे उल्लेख धर्मग्रंथांत आहेत. उत्तरेस पेणगंगा आणि दक्षिणेस गोदा या दोन नद्यांनी परभणी जिल्ह्याचें लोकजीवन अनादिकालापासून समृद्ध केलें आहे.

परभणी जिल्ह्याचें मुख्य ठाण्याचें ठिकाण जें परभणी त्याचें पुरातन नांव प्रभावती असें होतें. याचें कारण असें कीं, या गांवात प्रभावतीचे एक अतिशय सुबक आणि प्रचंड असें मंदिर होतें आणि त्याच्यासमोर एक सुंदर पुष्करिणी होती. या मंदिराच्या आणि पुष्करिणीच्या पौराणिक कालीन सामर्थ्याच्या अनेक किंवदंती जिल्ह्यांत प्रसृत आहेत. परंतु खिलजीच्या आक्रमणांत या मंदिराची मस्जीद बनविण्यांत आली आणि आज ती रोशनखा गल्लीची मस्जीद म्हणून प्रसिद्ध आहे.

**ऐतिहासिक वैशिष्ट्यें**

परभणीच्या उत्तरेस आज जिंतूर या नांवाने ओळखले जाणारे गांव हे पूर्वीचें जैनपूर होय. हे गांव म्हणजे एक प्रकारे जैनांच्या गत अितिहासाची साक्षच होय. येथील कोरीव गुंफा अतिशय अप्रतिम आणि प्रेक्षणीय अशा आहेत. जिंतूर शेजारी चारठाणा अथवा चारूक्षेत्र हे गांव असून प्राचीन स्थापत्य-कलेचे जणू माहेरघरच वाटावे इतके तें अवशेषानी समृद्ध आहे.

**जिंतूर**

वाल्हूरग्राम आणि पार्थपुरी ( हल्लीची पाथरी ) यांच्या अस्तित्वाचा दुवा तर थेट रामायण महाभारताच्या कालापर्यंत गेल्याचे आढळतें आदिकवि वाल्मिकींच्या पूर्वायुष्यांतील वाल्या कोळ्याचे मूळ गांव हें वाल्हूर ग्राम असावें तर प्रत्यक्ष पार्थांनीं पार्थपुरी स्थापन केलेली असावी असें मोठ्या अभिमानानें म्हटलें जातें. पार्थपुरी ही पार्थांनी स्थापन केलेली असो वा नसो पण याच गांवी संत श्रीधरांनी अश्वमेध यज्ञ लिहून पूर्ण केला, हें आतां पुराव्यानें सिद्ध झालेलें आहे. पाथरीचे ऐतिहासिक श्रेष्ठत्व स्पष्ट करणारा एक ताम्रपटहि प्रसिद्ध आहे. राक्षसभुवनाच्या समरप्रसंगी गोदातटाकी निजामाचा पराभव केल्यानंतर त्यांचा संपूर्ण उच्छेद करण्यासाठीं थोरले माधवराव पेशवे हे जेव्हां त्याच्या पाठीस लागले होते, त्यावेळीं त्यांनीं पाथरीस तळ दिला होता.

**वाल्हूरग्राम व पाथरी**

धोतर जोड्यांसाठीं प्रसिद्ध असलेल्या आष्टी गावीं जैन व वैदिक संस्कृतीचीं प्रतीकें आजहि शाबूत आहेत.

थोरल्या माधवराव पेशव्यांच्या कारकिर्दीतील बाबूजी नाईकांचा बंडावा जिंतूर तालुक्या-पर्यंत येऊन पोहचला होता. या बंडाव्यांत बाबूजी नाईकानें जो धुमाकूळ घातला त्याच्या कथा आजहि तालुक्यांतील डोंगरतळसारख्या खेड्यांतून ऐकावयाला मिळतात. बाबूजी नाइकांनीं डोंगरतळ्याला तट व स्वतःच्या निवासासाठीं महालहि बांधला होता. आज या ठिकाणीं एक फार मोठा पाटा वरवंटा नाईकांचा म्हणून दाखविण्यांत येतो.

**बाबूजी नाईक**

भारतांतील बारा ज्योतिर्लिंगापैकीं एक ज्योतिर्लिंग आमर्दक येथील नागनाथ येथून अगदी जवळ आहे. या स्थानाचें आजचें नांव औंढी असें आहे. हें गांव पर्वतराजीच्या कुशीत वसलें असून शिवलिंगाच्या स्थापनेचा इतिहास थेट पांडव कालापर्यंत पोचतो. ते कसेहि असो नागनाथाचे शिवालय मात्र अतिशय प्रेक्षणीय असें आहे. काळ्या सलग फत्तरांत बांधलेल्या या देवालयावर अतिशय सुबक आणि रेखीव असें नक्षीकाम असून खोदलेल्या मूर्तींच्या चेहऱ्यावरील भाव विलक्षण प्रेक्षणीय आहेत. संत शिरोमणी श्री नामदेव यांना ब्राह्मणांनी नागनाथांचे दर्शन घेण्याची मनाई केली म्हणून त्यांनी आपल्या भजन बळाने शिवालय फिरविलें अशी दंतकथा ज्या शिवालयाबद्दल प्रसिद्ध आहे तोच हा नागनाथ. संत शिरोमणी नामदेव आणि त्यांचें गुरू विसोबा खेचर यांच्या समाध्या आजहि येथें पाहावयास मिळतात.

**ज्योतिर्लिंग**

औंढ्याचा परिसर मठ, मंदिरें आणि चैत्यालयें यांनीं गजबजलेला आहे. ही सगळीं बांधकामें राष्ट्रकूट कालीन असून प्रेक्षणीय आहेत. जवळच सरनौबतांचा किल्ला आणि देखण्या बांधणीचे गांव शेंदूरसना आहे. या गांवांतील नायकांचे निवासस्थान, आजुबाजूची भव्य तटबंदी आणि कंदकूर्तीस नेलेल्या अप्रतिम राम मूर्तीच्या मंदिराचा पोकळ गाभारा आणि सुबक बांधणीचे विठ्ठल मंदिर ही सारीं प्रेक्षणीय आहेत.

**औंढ्याचा परिसर**

राजापूर येथील मूर्तिइतक्या लावण्यसुंदर आणि रेखीव मूर्ति महाराष्ट्रांत अन्यत्र नाहींत असें म्हटले तरी चालेल. आजेगांव येथील केशवराजाची लावण्यसुंदर मूर्तिदेखील इतकीच सुबक आहे. हाताळ गांवच्या शिवमंदिरानें आणि नरसी येथील नारसिंहाच्या हेमाडपंती देवालयाने या दोन्हीहि गांवाना एक वेगळ्या प्रकारचें देखणेपण दिलें आहे. हिंगोली येथील खाकेबुवाचा मठ आणि स्फटिकाची रेखीव मूर्ति असलेले दत्त मंदिर ही दोन्हीहि प्रेक्षणीय आहेत. प्रत्यक्ष परभणीजवळचे चापनाथाचें शिवालय डोंगराच्या शिखरावर असून तेथें जाणाऱ्याचे श्रम सार्थकी लावण्याइतकें सुंदर आहे. नाथ सांप्रदायांचे जाग्रत स्थान वाई हे याच जिल्ह्यांत असून तेथील गोरखनाथास प्रदक्षिणा घातल्यानें जनावरांचे रोग नाहींसे होतात अशी आजहि समजूत आहे. चौंडी अंबा टोकाईचे माता मंदिर, छत्रपतींच्या कुलाची आठवण करून देते. हे गांव शहाजी राजे भोसल्यांचे होते आणि त्यांच्या महालाची जागा म्हणून आज कांहीं अवशेष दाखविण्यांत येतात.

**राजापूर येथील मूर्ति**

याशिवाय करंजळे, बाराशीव हनुमान, राजूर वझूर, राणी सावरगांव, तपवन, टोके, बनवस, गंगाखेड इत्यादि गांवे परभणीच्या समृद्ध ऐतिहासिक परंपरेस साक्षीभूत आहेत.

भागवत धर्माचे मूळ संस्थापक ज्ञानेश्वर हे मूळ मराठवाड्यांतले. त्यांनीं सुरू केलेल्या भागवत धर्माच्या परंपरेचा विस्तार करणारे नामदेव, दासी असूनहि अमरपद लाभलेली जनाबाई आणि गुरु विसोबा खेचर हे परभणी जिल्ह्यांतलेच. प्रसिद्ध पंडित व ग्रंथकार रंगनाथ स्वामी, हंसराज, निंबराज, नारायण, शुकानंद, शिवराम, उद्धव चिद्घन, वासुदेव स्वामी, स्वामी दयानंद, बाबा महाराज, योगानंद इत्यादि संतकवि आणि साधुजन पुरुष या जिल्ह्यांत होऊन गेले. त्यांनीं आपल्या विदग्ध लेखणीनें आणि परमेश्वर भक्तीनें पुनीत झालेल्या प्रज्ञेनें अशी विपुल ग्रंथरचना केली कीं जिला आजहि महाराष्ट्र शारदेच्या दरबारांत मानाचें स्थान आहे.

**संत व पंडित मालिका**

मराठवाड्यांतील प्रसिद्ध संशोधक कै. डॉ. नांदापूरकर आणि कथालेखक व कादंबरीकार कै. बी. रघुनाथ हे दोघेहि परभणी जिल्ह्यांतलेच होत.

ब्रिटिशांच्या गुलामगिरीतून १९४७ सालीं भारत स्वतंत्र झाला आणि भारत व पाकिस्तान हीं दोन राष्ट्रें जन्मलीं. भारत जरी स्वतंत्र झाला तरी ब्रिटिशांनीं पूर्वीचे संस्थानिक तसेच कायम ठेवले होते. निजामाचे हैद्राबाद संस्थान देखील याच प्रकारांतले. हैद्राबाद हें मुस्लीम संस्थान असल्याकारणानें हिंदूंवर तेथें अनन्वित अत्याचार होऊं लागले. रझाकाराच्या राजवटीनें तर अत्याचारांचा कळसच केला. मराठवाड्यांतील विद्यार्थ्यांना केवळ प्राथमिक शिक्षण मातृभाषेंतून दिलें जात असे. पांचव्या वर्गापासून विश्वविद्यालयीन शिक्षणासाठीं उर्दू हेंच आवश्यक माध्यम होतें. नागरिक स्वातंत्र्याचे साधे हक्कहि निजामी राजवटींत नाकारले गेले होते व त्यामुळें मराठवाड्यांतील राजकीय, सामाजिक, शैक्षणिक

**अर्वाचीन इतिहास**

सभा संमेलने देखील हैद्राबाद राज्याच्या बाहेर जाऊन भरवावी लागत. ब-याच वेळां धार्मिक कार्यक्रमाच्या नांवाखालीं राजकीय कार्यक्रम पार पाडावे लागत.

देशांतील इतर संस्थानांमध्यें ज्याप्रमाणें राजकीय जागृति होऊन संस्थानी प्रजा परिषदा, संस्थानी कॉंग्रेस आदि राजकीय संस्था जागृतीचें काम करीत होत्या. त्याचप्रमाणें हैद्राबाद संस्थानमध्येंही

**स्टेट कॉंग्रेसचें युद्धपर्व**

स्टेट कॉंग्रेसची स्थापना करण्यांत आली. हैद्राबाद स्टेट कॉंग्रेसच्या अध्यक्ष पदाचा पहिला मान परभणी जिल्ह्यांतील राष्ट्रीय विचारसरणीचे एक वकील श्री. गोविंदराव नानल यांना लाभला. (अ. भा. कॉंग्रेसचे अधिवेशन १९५२–५३ मध्यें नानल नगरामध्यें झालें) पण निजामी सत्तेनें स्टेट कॉंग्रेसवर लगेच बंदी घातली. स्टेट कॉंग्रेसवर बंदी असल्यामुळें मराठवाड्यांत महाराष्ट्र परिषद या संस्थेमध्यें काम करून मराठवाड्यांतील राजकीय पुढारी जनजागृति करीत होते.

१९४६ साली क्रिप्स कमिशन भारतांत आलें होतें. त्यावेळेपासून निजामानें "स्वतंत्र हैद्राबाद" ची कल्पना उचलून धरली होती. मराठवाड्यांतील महाराष्ट्र परिषदेनें क्रिप्स कमिशनकडे

**स्वतंत्र हैद्राबाद कल्पनेस तडा**

एक निवेदन पाठविलें व त्या निवेदनांत "हिंदुस्थान स्वतंत्र होतांना हैद्राबाद संस्थानचे तीन तुकडे करून ते लगतच्या भाषिक प्रदेशांत सामील करावेत," अशी स्पष्ट मागणी केली व निजामाच्या कल्पनेस मराठवाड्याने धक्का दिला. आणि यावेळेपासून मराठवाडा महाराष्ट्राला जोडावा अशी निकडीची मागणी होऊं लागली पण निजामानें दाद दिली नाहीं.

शेवटीं नाईलाजानें सप्टेंबर १९४८ मध्यें चोहोंकडून हैद्राबाद संस्थानविरुद्ध पोलिसकारवाई करून भारत सरकारनें निजामास शरण आणलें, राज्यकारभार आपल्या ताब्यांत घेतला, सुव्यवस्था व शांतता स्थापन केली. नंतर २ वर्षांनीं लोकनियुक्त प्रतिनिधींच्या सल्ल्यानें कारभार करावा व पुढील धोरण ठरवावें, या अटीवर भारत सरकारनें आपला लष्करी अंमल हैद्राबादमधून काढून घेतला. मराठवाड्यास पुनः स्वातंत्र्य प्राप्त झालें.

१९५३ सालीं राज्य पुनर्रचना मंडळानें देशव्यापी दौरा काढला. मराठवाड्यांतहि तो दौरा झाला. मराठवाडा मुंबई राज्यांतील भाषिक प्रदेशाशी जोडावा अशी एकमुखी मागणी करण्यांत आली. राज्य पुनर्रचना मंडळानेहि या एकमुखी मागणीची प्रशंसा केली व तसा निर्णय दिला.

अशा प्रकारें मराठवाडा द्विभाषिक मुंबई राज्यांतील महाराष्ट्रांत आला व मराठ्यांचा १७६५ मध्यें हुकलेला योग १ नोव्हेंबर १९५६ रोजीं द्विभाषिक राज्यांत कां होईना पण जुळून आला.

द्विभाषिक मुंबईनंतर भाषिक तत्वावर दि. १ मे १९६० रोजीं मराठवाडा–विदर्भ–पश्चिम महाराष्ट्र यांचे मिळून महाराष्ट्र राज्य अस्तित्वांत आलें.

—o-oo-o—

# भौगोलिक रचना

**रचना व हवामान**

परभणी जिल्हा हा १९ अंश आणि २० अंश उत्तर अक्षांश आणि ७६.१५ आणि ७७.३० पूर्व रेखांश यामध्यें वसला आहे. ह्या जिल्ह्याचें क्षेत्रफळ ४८५४.५ चौरस मैल असून त्याच्या उत्तरेस अकोला, बुलढाणा, यवतमाळ हे जिल्हे असून दक्षिणेस उस्मानाबाद व बीड जिल्हे आहेत. याच्या पूर्वेस नांदेड असून पश्चिमेस औरंगाबाद जिल्हा आहे. ह्या जिल्ह्याची हवा एकंदरींत कोरडी असून उन्हाळा अतिशय कडक असतो. तसेच जिल्ह्यांतील पावसाचें प्रमाण सरासरी ३५ इंच असून हा पाऊस मुख्यत्वेंकरून नैऋत्येकडून येतो.

ह्या जिल्ह्यांतील तालुक्यापैकीं पाथरी, परतुड (उत्तरेकडील भागाखेरीज) गंगाखेड व परभणी या तालुक्यांचा भूभाग सपाट आहे. परतुड तालुक्याचा उत्तर विभाग, जिंतूर, हिंगोली आणि कळमनुरी तालुके आणि वसमत तालुक्याचा पूर्व भाग डोंगराळ आहे. ह्या जिल्ह्यांत म्हणावी तशी जंगले नसलीं तरी ह्याच्या उत्तर भागांत मात्र बरेच तुरळक जंगल आहे. डोंगराळ भागांतील जमीन सुपीक नाहीं. दक्षिण भागांतील तालुके सामान्यत: सपाट असून गोदावरी आणि तिला मिळणाऱ्या लहान नद्यांच्या पाण्याचा त्यांना चांगल्या प्रकारे पुरवठा होतो.

गोदावरी, पेणगंगा आणि दुधना व पूर्णा ह्या चार मोठ्या नद्या ह्या जिल्ह्यांतून वाहतात. गोदावरी परतूड, पाथरी, परभणी या तालुक्याच्या दक्षिण बाजूने आणि गंगाखेड तालुक्याच्या मध्य भागांतून वाहते. पूर्णा, दुधना ह्या दोन नद्या जिंतूर आणि हिंगोली तालुक्यांतून वाहतात. पेणगंगा ही नदी हिंगोली तालुक्याच्या उत्तरेस वाहते. गोदावरी नदीच्या कांठावरील जमीन अधिक सुपीक आहे.


**प्रमुख पिकें**

सर्व सामान्य भौगोलिक रचनेनुसार जिल्ह्यांतील एकूण जमीन ३१,१९,२९५ एकर असून त्यापैकीं २८,१०,९७२ एकर जमीन लागवडीखालीं आहे. तसेच पडीक जमिनीचें एकूण क्षेत्र १,२३,२२० एकर असून त्यापैकीं ११,२३३ एकर जमीन लागवडीजोगी असून ही जमीन कसण्याच्या दृष्टीनें प्रयत्न करण्यांत येत आहेत. आतांपावेतो ५,६६३ एकर जमीन सुधारण्यांत आली आहे आणि आतां त्यामध्यें कायम स्वरूपाची लागवड करण्यांत येत आहे.

ह्या जिल्ह्याचा जंगल विभाग ६७,७९६ एकर असून १,०७,३०७ एकर चराऊ रान आहे. जिल्ह्यांतील प्रमुख पिकें ज्वारी, गहूं आणि कापूस हीं आहेत. लोकांचें मुख्य अन्न ज्वारी हें आहे.

ज्वारी हें जिल्ह्याचें प्रमुख पीक असून एकूण लागवडीखालील जमिनीपैकीं सुमारें ३१ टक्के जमिनींत ज्वारी पेरतात. एकूण लागवडीखालील जमिनींपैकीं २८ टक्के जमिनीत कापसाची लागवड केली जाते. ह्या जिल्ह्याचें दुसरें पैसा देणारें पीक म्हणजे भुईमुग होय. वसमत तालुका केळीसाठीं प्रसिद्ध असून सुमारें ३,३५२ जमिनींत केळीच्या बागा आहेत.

## भौगोलिक रचना



# लो क जी व न

१९५१ च्या खानेसुमारीनुसार या जिल्ह्याची लोकसंख्या १०,१०,८४६ इतकी होती. १९६१ सालीं झालेल्या खानेसुमारीनुसार परभणी जिल्ह्याची एकूण लोकसंख्या १२,०६,३६८ असून तालुकावार लोकसंख्या खालीलप्रमाणें आहे—

| | |
|---|---|
| परतूड | १,३३,८५२ |
| जिंतूर | १,४०,८३५ |
| हिंगोली | १,५९,५०४ |
| कळमनुरी | १,२७,४९३ |
| पाथरी | १,६३,५५१ |
| परभणी | १,७६,०२२ |
| वसमत | १,४२,१७१ |
| गंगाखेड | १,६४,९४० |

गेल्या १० वर्षांतील लोकसंख्या वाढीचें प्रमाण शेंकडा १९.३४ टक्के अधिक असून १९०५ पासून १९६१ पर्यंतच्या ६० वर्षांतील वाढीचें प्रमाण ८५.८२ टक्के अधिक आहे.

एकूण लोखसंख्येपैकीं ८३ टक्के लोक ग्रामीण भागांत राहात असून ते १५०० खेड्यांतून विभागले आहेत. लोकसंख्येचें प्रमाण दर चौरस मैलास २०८ पडते. एकूण लोकसंख्येपैकीं ७७ टक्के लोक शेतकरी आहेत. जिल्ह्यांत शेती हेंच उपजीविकेचें प्रमुख साधन आहे. शेतीखेरीज व्यापार क्षेत्रांत ४,९६६, वाहतूक क्षेत्रांमध्यें, ९,०३१, मजूरी करणारे ६,२५४, लोक असून बाकीच्या व्यवसायांत १०,३२६ लोक आहेत.

पुरुष, स्त्रिया व मुलें व मुली यांचें एकत्रित किंवा जोडीनें किंवा एकट्यानें खेळण्याचे कांहीं प्रकार परभणी जिल्ह्याच्या कांही भागांत आढळतात. उदा. सोंगट्या, फुगड्या, वगैरे. उत्सव समारंभांत कुस्त्यांचे खेळ मल्लखांब वगैरे वैयक्तिक खेळ खेळले जातात.

**खेळ व मनोरंजन**

मुलींच्या खेळांत निरनिराळी परंपरागत गीतें म्हटलीं जातात परंतु पूर्वीं कधीं प्रचलीत असलेल्या चालीरीतीचे दर्शन घडण्यासारखी गीतें मात्र नाहींत. लमाणी लोकांचे शिमग्यांतील टिपरीचे खेळ व इतर जमातींत शिमग्यांतील खेळ, चेंडूफळीचे खेळ, नागपंचमी, पोळा इत्यादि सणाला झोक्याचे खेळ खेळले जातात.

गुराख्याचे रानांतील खेळ म्हणजे आट्यापाट्या, सूरपारंब्या इत्यादि होत. उत्सवप्रसंगीं धार्मिक उत्सवांतून टिपऱ्या गोफ, फुगड्या इत्यादि खेळ खेळले जातात. गणेशोत्सवांत सोंगे, मेळे व

विविध प्रकारचे नाट्यप्रयोग होतात. पुराण, कीर्तन, प्रवचन, भजन, पोवाडे तमाशे होतात. हे प्रकार दरवर्षी होतात. कुस्त्या, लाठीचे खेळ, आट्यापाट्या, दांडपट्टा, खो खो, हुतुतू हे खेळ खेळले जातात. गाड्यांच्या शर्यती, बैलांच्या टकरी ह्याहि अधूनमधून चालतात. पत्ते, सोंगट्या, बुद्धीबळ, दशावताराचे खेळ यांचीही प्रथा आहे. त्यांत भेंड्या, उखाणे कूटप्रश्न इत्यादि येतात.

**लोकांचे अन्न व आहार**

( १ ) जनतेच्या आहारांत मुख्यत्वें ज्वारीचा उपयोग केला जातो. ज्वारी, तांदूळ, गहूं, हरभरा, लाख, तूर, ही धान्यें विशेषेकरून उपयोगांत आणली जातात. करडी, जवस व भुईमूग हीं गळिताचीं धान्यें तेलासाठीं उपयोगांत आणली जातात. अंबाडी, मेथी चुका, चाकवत, घोळ, आलु ( चमकोरा ) देवडांगर, भुई कोहळे वाळुक, भोपळा ( दूधी ) वगैरे फळभाज्या व पालेभाज्या, शेवग्याच्या शेंगा, वालाच्या शेंगा, मटाराच्या शेंगा, शेपालक, मुळा, रताळे इत्यादींचा व कांदा मुळा यांचाहि समावेश होतो. मूग, मट इत्यादि कडधान्यें व सफरचंद, मोसंबी, संत्रे, आंबे, केळी, नारळे, द्राक्षे ही रसफळें बदाम, पिस्ते, काजू किसमिस हा सुकामेवा व कोंबडी, बकरा, तितर पक्षी याचें मांस, बैल, म्हैस यांचें मांस, डुकरांचे मांस, बेडूक, खेकडा असे प्राणी मांसाहारांत येतात. कीटक व अंडी यांचाहि आहारांत समावेश आहे. चिंचोक्याचे पीठ, मक्याचे पीठ, शिंगाड्याचे पीठ वापरण्यांत येते.

# कृषि उत्पादन आणि नैसर्गिक संपत्ति

**आधुनिक पद्धति व शेती सुधारणा**

ह्या जिल्ह्यांतील लोकांचा मुख्य धंदा शेती हा असून एकंदर लोकसंख्येपैकीं सुमारे ७० टक्के लोकांची उपजीविका शेतीवरच चालते. या जिल्ह्याची प्रमुख पिकें खरीप आणि रब्बी, ज्वारी, कापूस, भुईमुग आणि गहूं हीं होत. ह्यांपैकीं बहुतेक पिकें पावसावरच अवलंबून आहेत. शेतकऱ्याचें अज्ञान दूर करणें, त्यांना आहे त्या स्थितीत आहे त्या जमिनींतून अधिकाधिक उत्पादन कसें काढतां येईल याचा सल्ला देणे, तसेच प्रात्यक्षिकांद्वारें मार्गदर्शन करणे, सुधारलेली अवजारें बी बियाणें, खतें इत्यादींचा पुरवठा करणें इत्यादि कार्य जिल्ह्यांतील शेतकी अधिकाऱ्यांमार्फत केलें जातें. जिल्हा शेतकी अधिकाऱ्यास एक दुय्यम शेतकी अधिकारी हा मदतनीस म्हणून जिल्ह्याचे ठिकाणीं असतो. तालुक्यासाठीं एक शेतकी अधिकारी व ग्राम पातळीवर ग्रामसेवक शेतकी व्यवसायांत शेतकऱ्यास मदत करतात.


परभणी जिल्ह्यांतील एकूण जमिनीची वर्गवारी पुढीलप्रमाणे आहे:—

| तपशील | एकर |
|---|---|
| जमिनीचें एकूण क्षेत्र | ३१,१९,२९५ |
| जंगलाचा भाग | ६७,७९६ |
| लागवडीस उपयुक्त नसलेली ओसाड जमीन | १,२३,२२० |
| लागवडीस उपयुक्त पडीक जमीन | ५,६६३ |
| जनावरांची कुरणें आणि गायरानाखालील जमीन | १,०७,३०७ |
| पिकाखाली नसलेली पण फलोत्पादनासाठीं असलेली जमीन | ३,३५३ |
| लागवडीखालील जमीन | २८,१०,२५२ |

जिल्ह्यांतील प्रमुख निरनिराळ्या पिकाखालीं असलेली जमीन पुढीलप्रमाणें आहे:—

| पीक | एकर |
|---|---|
| तांदूळ | २८, ३२७ |
| गहूं | १, १८, ६२० |
| ज्वारी | ८, ९६, ३२२ |
| हरभरा | ९२, २२७ |
| मूग | १, ०६, ०८० |

# कृषि उत्पादन आणि नैसर्गिक संपत्ति



| पीक | एकर |
|---|---|
| तूर | ८८,६८६ |
| उडीद | ५०,६८२ |
| उंस | ३,८६१ |
| मिरची | १०,२३६ |
| कापूस | ५,०३,८५९ |
| भुईमुग | ९४,१३६ |

**प्रायोगिक केंद्रें**

पूर्णा धरण योजनेमुळें या जिल्ह्याची बरीच जमीन पाटाच्या पाण्याखालीं येणार आहे. परभणी जिल्ह्यापुरता विचार केला तर या धरणामुळें परंपरागत चालत आलेल्या शेतीच्या पद्धतीला निराळे वळण निश्चितपणें लागणार आहे. आतांपर्यंत या जिल्ह्यांतील शेतकरी, पावसाच्या पाण्यावर पिकें घेत असल्यामुळें पूर्णा धरणाच्या कालव्यांतून मिळणाऱ्या पाण्याचा योग्य रीतीनें कसा उपयोग करून घ्यावा, कोणती पिकें काढावीत, पिकांचा फेरपालट कोणत्या पद्धतीनें करावा, यासंबंधीचें संशोधन प्रयोगानें करणें अत्यंत आवश्यक आहे. विशेषतः सतत पाणी वाहिल्यानें जे प्रश्न निर्माण होतील त्यांची योग्य ती उकल आणि उपाय याला फार महत्व आलें आहे. ह्या ह्या दृष्टीनें गोळेगांव संशोधन केंद्रा-वर वरील बाबीसंबंधीं संशोधन होईल. पूर्णा धरण अजून तरी अपूर्णावस्थेंत असल्यामुळें संशोधन कार्य चालू झालें नाहीं तरी सध्यां या केंद्रावर सुधारलेल्या बियाण्यांचे उत्पादन चालू आहे. या केंद्राचें क्षेत्रफळ २१५ एकर आहे.

**बीज संवर्धन केंद्रें**

शेतकऱ्यांना सुधारलेलें निर्भेळ बियाणें पुरावेल्यास पिकाचें दर एकरी उत्पादन वाढेल ही गोष्ट सर्वमान्य झाली आहे. केवळ शुद्ध बियाण्यांच्या वापरानें एकूण उत्पादनांत १० टक्के वाढ होते. परभणी जिल्हा हा प्रामुख्यानें शेतकी जिल्हा असल्यानेंह्या गोष्टीचें फार महत्व आहे. म्हणूनच प्रत्येक तालुक्याच्या ठिकाणीं बीज संवर्धन केंद्र स्थापन करण्यास प्राधान्य देण्यांत आलें असून प्रत्येक तहसिलीमध्यें एक केंद्र याप्रमाणें एकूण ५७१ एकर क्षेत्र बीज संवर्धनासाठीं घेण्यांत आलें. ही पांच बीज संवर्धन केंद्रें परभणी, जिंतूर, हिंगोली, बाळापूर आखाडा (कळमनुरी) आणि चिकलठाणा (पाथरी) येथें रीतसर चालू झाली आहेत आणि सतत सुधारलेल्या बियाणांचा पुरवठा होण्याकरितां आणखी तीन केंद्रें गंगाखेड, परतुड आणि वसमतनगर या ठिकाणीं ३१० एकर क्षेत्रांत स्थापन करून त्या त्या तालुक्यास भरपूर सुधारलेल्या बियाणांचा पुरवठा करण्याची तजवीज करण्यांत येत आहे.

**विस्तार प्रशिक्षण केंद्र**—राजेंद्रनगर, हैद्राबाद (दक्षिण) या ठिकाणीं १ डिसेंबर १९५४ रोजीं प्रथमतःच विस्तार प्रशिक्षण केंद्राची स्थापना झाली. ग्राम सेवकांना प्रशिक्षण देण्या-साठीं स्थापन झालेल्या आठ केंद्रापैकीं हें एक असून राज्य पुनर्रचनेनंतर हें केंद्र परभणीस हलवि-ण्यांत आले.

**मूलोद्योग शेतकी शाळा**

ग्रामसेवकांना शेतकी आणि पशुवैद्यकीचे प्रशिक्षण देण्यासाठीं तसेंच विस्तार कार्याचें सहा महिन्याचें प्रशिक्षण देण्यासाठीं मूलोद्योग शेतकी शाळा माजी हैद्राबाद राज्यानें १–८–५५ रोजीं राजेंद्रनगर, हैद्राबाद या ठिकाणी चालू केली. परंतु राज्य पुनर्रचनेमुळें दिनांक १–११–५६ रोजीं ती परभणीस हालविण्यांत आली. ह्या शाळेंत ग्रामसेवकांना एक वर्षाचें शिक्षण दिल्यानंतर विस्तार प्रशिक्षण केंद्रांत पाठविण्यांत येते.

**शेतकी महाविद्यालय, परभणी**

परभणी येथील शेतकी महाविद्यालयाची सप्टेंबर १९५६ मध्यें स्थापना झाली. ह्या समयी कॉलेजांत फक्त ३२ मुले आणि तीन लेक्चरर्स होते. परंतु हल्ली ह्या कॉलेजांतील विद्यार्थ्यांची संख्या १६० असून महिला विद्यार्थ्यांची संख्या २ आहे. तसेंच या ठिकाणी १० लेक्चरर्स, १२ इन्स्ट्रक्टर्स, सहा ग्रॅज्युएट असिस्टंट्स् व एक लायब्रेरियन आहे. प्रारंभी हे कॉलेज विस्तार प्रशिक्षणकेंद्रांतील कांहीं खोल्यांतून वसविण्यांत आले होते. परंतु १९५८ मध्यें तें सहकारी प्रमुख प्रायोगिक फार्मवरील हंगामी जागेमध्यें हलविलें गेलें.

ज्यावेळीं कॉलेज अस्तित्वांत आले त्यावेळीं ते उस्मानिया विद्यापीठास जोडण्यांत आलें होतें आणि त्यावेळीं कॉलेजांतील अभ्यासक्रम ३ वर्षांचा होता. परंतु नोव्हेंबर १९५८ मध्यें मराठवाडा विद्यापीठाची स्थापना झाल्यामुळें हें कॉलेज आतां त्यास संलग्न करण्यांत आलें असून ह्या ठिकाणचा अभ्यासक्रम चार वर्षांचा ठेवण्यांत आला आहे. एस. एस. सी. पास झालेल्या विद्यार्थ्यांना येथें प्रवेश दिला जातो. मे १९५९ मध्यें ११ पदवीधरांची एक तुकडी ह्या कॉलेजांतून उत्तीर्ण होऊन बाहेर पडली.

मे १९५९ मध्यें कॉलेजसाठीं १२८ एकर जमीन संपादण्यांत येऊन त्यावेळच्या द्विभाषिक मुंबई राज्याचे मुख्यमंत्री श्री. यशवंतराव चव्हाण यांनीं दिनांक १५ फेब्रुवारी १९६० रोजीं नव्या कॉलेजच्या इमारतीची कोनशिला बसविली. इमारतीचें बांधकाम प्रगतीपथावर असून ती लौकरच पूर्ण होईल अशी अपेक्षा आहे.

**कपाशीचा विकास**

कपाशी हें एक या जिल्ह्यांतील महत्वाचे पीक आहे. मराठवाडा विभागांतील सर्व जिल्ह्यांत "गावराणी" जातीचा कापूस अतिशय पिकतो. या कापसापासून जें सूत निघतें तें अतिशय ताटर व मजबूत असतें आणि ह्या कापसापासून काढलेल्या सुताचें कापड रेशमासारखें दिसतें आणि टिकाऊहि असतें. ह्या जातीच्या कापसाचें सूत स्वाभाविक रीतीनें तलम निघतें. त्यामुळें मलमल आणि कापडाच्या उत्तम जाती या कापसापासून तयार करणें शक्य आहे. या कापसाच्या जातीचें जतन करण्यासाठीं माजी हैद्राबाद सरकारनें ज्या भागांत कापूस विपुल प्रमाणांत तयार होतो तो भाग संरक्षित विभाग म्हणून जाहीर केला होता.

दुसऱ्या जागतिक युद्धाच्या अखेरीस मराठवाड्यांतील सुमारें १९ लाख एकर जमीन 'गांवराणी' कापसाच्या लागवडीखाली होती. त्याचप्रमाणें या कापसाच्या सुमारे २.६३ लक्ष गांठी तयार होतात. अधिक धान्य पिकवा या मोहिमेच्या बरोबरीनेच या पांच जिल्ह्यांतून कापसाची अधिक लागवड करण्याच्या मोहिमेलाहि जोराची चालना देण्यांत आली व त्याचा दृश्य परिणामहि दिसून आला. १९५५-५६ च्या अखेरीस या जातीच्या कापसाची लागवड २२.२० लाख एकरापर्यंत वाढविण्यांत आली.

पहिल्या योजनेच्या काळांत गांवराणी जातीच्या कपाशीच्या पैदाशीत सुधारणा केली गेल्यामुळें "दौलत" या नांवाची कपाशीची एक उत्कृष्ट जात निर्माण झाली.

शेतकी विषयाशी संलग्न झालेल्या अनेक बाबींसंबंधी पहिल्या पंचवार्षिक योजनेंत निरनिराळ्या संशोधन केन्द्रामध्यें संशोधन चालू होतें. त्या दृष्टीनें परभणी येथील तृणधान्य संशोधन विभागानें पहिल्या व दुसऱ्या पंचवार्षिक योजनेच्या काळांत भरीव कामगिरी केलेली आहे. परभणी

येथील तृणधान्य संशोधन विभागानें खरीप आणि रब्बी ज्वारी, तूर, मूग, उडीद, बाजरी, मका, मटकी, कुळथी यासारख्या पिकांवर उत्कृष्ट संशोधन केलें. त्याचा परिणाम म्हणून या ठिकाणीं परभणी ज्वारी ४ ( खरीप ), परभणी ज्वारी ८ ( खरीप ), परभणी ज्वारी १६ ( खरीप ) आणि परभणी ज्वारी २४ ( खरीप ) हे प्रकार तयार झाले. यापैकीं परभणी ज्वारी ४ व २४ ( खरीप ) या उस्मानाबाद आणि नांदेड जिल्ह्याला आणि परभणी ज्वारी १६ ( खरीप ) ही बीड आणि औरंगाबाद जिल्ह्याला योग्य ठरली आहे. या संशोधनामुळें पिकांच्या उत्पादनांत दहा टक्क्यांनीं वाढ झाली आहे.

**शेती संशोधन**

परभणी जिल्ह्यांतील शेतीच्या लागवडीसाठीं मान्सून पावसावर अवलंबून राहावे लागते. शेतकी विकासाच्या कार्यक्रमांत महत्वाच्या असलेल्या कोरडवाहू शेतीच्या पद्धतीच्या व जमिनीतील ओल (दमटपणा) टिकविण्याच्या योजना ह्या जिल्ह्यांत सुरू आहेत. जमिनीचें संरक्षण करण्याच्या ज्या अनेक योजना आहेत त्यांत चढउतारानुसार (कंटूर बंडिंगची) पद्धत अत्यंत फलदायी पद्धत म्हणून मान्य करण्यांत आली आहे. या योजनेनुसार योग्य अशा अंतरावर व उतार पाहून भूभागाच्या उभारणीवर बांध घालण्यांत येत असून जमिनीचें विभाग विकासासाठीं घेण्यांत येत आहेत.

**जमीन संरक्षण**

जमिनीचे उत्पादन वाढविण्याच्या दृष्टीनें तिची कायम स्वरूपाची सुधारणा करण्याच्या बाबतींत या योजनेचे फायदे दीर्घकाळपर्यंत मिळूं शकतात. पण बंडिंग केलेल्या प्रत्येक एकरामागें प्राथमिक बांधणीचें काम बरेच मोठें असतें आणि म्हणून या योजनेचे फायदे शेतकऱ्यांना मिळावेत या दृष्टीनें तिचा समावेश दुसऱ्या पंचवार्षिक योजनेंत करण्यांत आला असून शेतकऱ्यांना कर्ज व आर्थिक मदतीचे स्वरुपांत आर्थिक साह्य देण्याची योजना आंखण्यांत आलेली आहे. जमीन संरक्षण कार्याचें शिक्षण देण्यांत आलेल्या व खास नेमण्यांत आलेल्या नोकरवर्गाकडून कन्टूर वगैरेसंबंधीची पाहणी करण्यांत येत असते. आतांपावेतों या जिल्ह्यांत थोडेबहुत काम झालें असून दुसऱ्या योजनेच्या अखेरच्या कालावधींत ह्या जिल्ह्यांतील १६,३३० एकर जमिनीस बांध घातले आहेत. तिसऱ्या पंचवार्षिक योजनेमध्यें ५,५६० एकर जमिनीला बांध घालण्याची योजना आहे.

अन्नधान्यांच्या वाढीबरोबरच फळबागांची लागवड आणि योग्य रीतीनें विकास होऊन शेतकऱ्यांची आर्थिक बाजू भक्कम व्हावी या दृष्टीनें दीर्घ मुदतीची कर्जे देऊन त्यांना फळबागा कशा लावाव्यात, जुन्यांची निगा कशी राखावी याबाबत शास्त्रीय सल्ला दिला जातो. शेतकऱ्यांना दर एकरांमागें ३०० रुपये याप्रमाणें कर्ज दिलें जातें. दोन हप्त्यामध्यें हें कर्ज वांटलें जातें.पहिला हप्ता खतें,फळांची रोपटी आणि रोग व कीड जंतुनाशक औषधें यांच्या रूपानें देण्याची तरतूद आहे. दुसरा हप्ता रोपट्यांची निगा राखण्यासाठीं नगदी देण्यांत येतो. १९५९-६० सालीं या योजनेनुसार ७,५७५ रुपये पहिल्या हप्त्याप्रीत्यर्थ दिले गेले. आणि १९६० सालीं ८०,००० रुपये मागील वर्षाचा हप्ता व नवीन वर्षाचे पहिले व दुसरे हप्ते म्हणून देण्यांत आले आहेत. शेतकऱ्यांकडून यासंबंधीं अर्ज येत आहेत व त्यांना नियमाप्रमाणें कर्ज देऊन सल्ला देण्याची व्यवस्था करण्यांत आली आहे. शेतकऱ्यांच्या मुलांना आधुनिक शेती पद्धतीचें प्रात्यक्षिकांसह शिक्षण मिळावें या दृष्टीनें या जिल्ह्यांत एक शेतकी शाळा १ ऑगस्ट १९५५ पासून चालू झाली आहे.

**फलोत्पादन व शेती शिक्षण**

अन्नधान्याचें उत्पादन वाढविण्याच्या बाबतींत खते आणि जोरखतें ( रासायनिक खतें ) यांच्या वापराला फार महत्व आहे. कंपोस्ट आणि शेणखत जमिनीचा पोत राखण्यास मदत करतात

तर जोरखताची एकरी उत्पादनांत वाढ होण्यास मदत होते. आपल्या पिकांना कोणतें खत कोणत्या वेळीं आणि कसें द्यावें याची माहिती आतां सर्वसाधारण शेतकऱ्यास झाली आहे. दरवर्षी शेत-कऱ्याच्याच शेतामध्ये घेण्यांत येणाऱ्या खतविषयक प्रयोगामुळें सर्वसाधारण

**खतांचा पुरवठा**

शेतकरी देखील खत वापरण्यास प्रवृत्त झाला असून रासायनिक आणि इतर खताविषयीची मागणी दिवसेंदिवस वाढत आहे. ही खते शेतकऱ्यांना सरकार नियंत्रित दरांत पुरविते. आणि त्यांना ती सहजगत्या घेतां यावीत म्हणून अल्पमुदतीचें कर्ज देखील देण्यांत येतें. सुपर फॉस्फेट या खताचा वापर जास्त व्हावा व शेतकऱ्यांना तें स्वस्त दरांत घेतां यावें म्हणून सरकारने साडेबारा टक्के सूट दिली आहे. ही सूट मूळ किंमतींत वजा करूनच शेत-कऱ्यांना खत दिलें जातें.

**कंपोस्ट खत**

परभणी जिल्ह्यांतील कांहीं नगरपालिका कंपोस्ट खत तयार करून त्यांची विक्री करतात. नगरपालिकांनी कंपोस्ट खत जास्त प्रमाणांत तयार करून त्याची विक्री करावी आणि गांवातील मलमूत्र आणि कचरा यांचा उपयोग खत तयार करण्यासाठीं करावा म्हणून शेतकी विभागातर्फे त्यांना आर्थिक मदत देण्यात येते. ही आर्थिक मदत त्यांनी तयार करून विकलेल्या गेल्या दोन वर्षांतील आकड्यांची सरासरी काढून प्रत्येक टन खतास दोन रुपये या प्रमाणांत देण्यांत येते. १९५९-६० सालीं २,००० रुपये सबसिडी म्हणून देण्यांत आले.

बोरूचें हिरवळीचें खत जमिनीत आवश्यक त्या प्रमाणांत नायट्रोजनचा पुरवठा करण्याच्या दृष्टीनें फारच उपयोगी आहे. त्यामुळें जमिनीचा पोत कायम राहतो आणि सुपीकता टिकून राहते. हिरवळी खताचा जास्त वापर व्हावा आणि ते जोरखताच्या वापराला पूरक राहावे म्हणून या खतांचे बियाणे शेतकी विभागातर्फे वांटण्यांत येतें व त्याकरिता २५ टक्के आर्थिक मदत देण्यांत येते.

**पाणीपुरवठा**

छोट्या प्रमाणावर लौकर पाणीपुरवठा होण्यासाठीं विहिरी आणि पंपिंग सेटचा उपयोग करावा आणि थोड्या कष्टांत जास्त प्रमाणावर पुरवठा करून त्यायोगे उत्पादनांत वाढ व्हावी या उद्देशानें शेतकऱ्यांना दीर्घ मुदतीचीं कर्जें दिलीं जातात. या जिल्ह्यांत साधारण २५–३० फुटावर पाणी लागते; आणि पिकांस पाणीपुरवठा केल्याने पिकांच्या एकरी उत्पादनात वाढ होतें हें शेतकरी बांधवांना पटूं लागले आहे. त्यामुळें विहिरी खणण्याची व पंपिंग सेटस् बसविण्याची आवश्यकता वाढूं लागली आहे. दीर्घ मुदतीच्या कर्जाबरोबरच कांहीं अटी पूर्ण केल्यास त्यात ५०० रुपयापर्यंत सूट मिळते. ही सूट नगदी स्वरूपांत मिळत नसून ती तगाईच्या शेवटच्या हप्त्यांत धरून हिशेब ठेवला जातो. वरील कर्ज खात्या-तर्फे व लँड मॉर्गेज बँकांतर्फे देण्यांत येत असून अशा कर्जाची मागणी दिवसेंदिवस वाढत्या प्रमाणा-वर आहे.

**पीकस्पर्धा**

पीक स्पर्धांचा कार्यक्रम आंखून शेतकऱ्यामध्यें स्पर्धा ठेवण्याचा उद्देश पीक उत्पादन व स्पर्धेची निरोगी वृत्ती वाढविणें हाच होय. १९५८–५९ मध्यें परभणी जिल्ह्यास रबी मोहिमेंत १५ टक्के उत्पादन वाढविल्याबद्दल १०,००० रुपये बक्षिसादाखल देण्यांत आले होते. ह्या पैशाचा उपयोग खेड्यामध्यें सुधारलेलीं अवजारें घेऊन त्यांचा उपयोग शेतकऱ्यांना व्हावा याकडे केला जाणार आहे. या गोष्टीमुळें लोक पीक स्पर्धामध्यें हिरिरीनें भाग घेऊ लागले आहेत. १९६० च्या खरीप हंगामांत, ग्राम, तालुका व जिल्हा पातळीवर तसेंच राज्य पातळीवर पीक स्पर्धेत भाग घेण्यासाठीं अनेक अर्ज आले.

**शेतकरी संघाची स्थापना**—शेतकी विषयक कार्यामध्यें शेतकऱ्यांनी जास्त लक्ष केंद्रित करावें व सहकार्य करावें म्हणून प्रत्येक खेड्यांमध्यें शेतकरी संघ स्थापन केले जाणार आहेत. परभणी जिल्ह्यांतील एकूण १५८५ खेड्यापैकीं ९६२ खेड्यामध्यें शेतकरी संघ स्थापन करण्यांत आल असून त्यांची सदस्य संख्या १०,६६७ आहे. अशा तऱ्हेने सर्व खेड्यांत संघ स्थापन करून त्यांची तालुका-निहाय संस्था स्थापन करण्याचें ठरलें असून त्यासंबंधी जारीनें प्रयत्न चालू आहेत.

**पशुधन व संगोपन**—शेतकी विकासाचे कार्यक्रमाशीं पशूंची जोपासना करण्याच्या प्रश्नाचाहि निकटचा संबंध आहे. ह्या जिल्ह्यांत बैल २,३६,७००; गाई १,८३,१६७ शेळ्या; मेंढ्या ७०,२७१ असून कोंबड्या ८६,४४५ आहेत. ही सर्व गुरे परभणी जिल्ह्याच्या १५८५ खेड्यांतून पसरलेली आहेत. पशुधनाचे योग्य ते संगोपन आणि संवर्धन व्हावे म्हणून जिल्ह्याकरितां परभणी येथें व्हेटर्नरी ऑफिसर यांची स्वतत्र कचेरी असून जिल्ह्यातील पशुधनाकडे योग्य ते लक्ष पुरविले जाते.

ह्या जिल्ह्यांत देवणी आणि कंधारी अशा दोन जातीची गुरें सामान्यतः आढळतात. कंधारी जातीच्या गुरांची वाढ करण्याच्या दृष्टीनें हिंगोली येथें पशुउत्पादन केंद्र आहे. ह्या केंद्रांत उत्तम प्रकारच्या वळूंची निपज केली जाते. आणि हे वळू पैदाशीसाठीं खेड्यांना पुरविले जातात. ह्या वळूंच्या खुराकाचा खर्च सरकार, ग्राम-पंचायती किंवा गांवांतील प्रमुख लोक यांचेमार्फत जशी परिस्थिति असेल त्याप्रमाणें केला जातो. हिंगोली येथें जें कृत्रिम रेतन केंद्र आहे त्याचा उपयोग गुरांच्या सुधारणेच्या बाबतींस अतिशय होतो. हिंगोलींत अस्तित्वांत असलेली ग्रामयोजना देखील ह्या भागांतील गुरांच्या वाढीच्या कामीं महत्त्वाची ठरलेली आहे. या योजनेनुसार गाई बैलापासून जीं गुरें पैदा होतात त्यांची नोंद ठेवली जाते आणि चांगली पैदास होण्याच्या दृष्टीनें प्रयोग करण्यांत येतात.

**पशुसंवर्धन**

हल्लीं परभणी, मानवत, गंगाखेड आणि हिंगोली या ठिकाणीं गोशाळा आहेत. या जिल्ह्यांत पशुधनाची वृद्धि व्हावी असा या गोशाळा प्रस्थापनेमागील उद्देश आहे.

**पशु**–शेती विकासाशीं संलग्न असा पशुसंवर्धनाचा कार्यक्रम असून तो फार महत्त्वाचा आहे. पशूंचें संगोपन व संवर्धनामुळें आपणांस दूध, मांस, कांतडें, लोंकर, हाडें व शिंगें आणि खतें इत्यादि वस्तूंची प्राप्ति होते. शेतीच्या कामासाठींहि पशूंचा उपयोग होतो. हे सर्व लक्षांत घेऊन पशूंच्या जाती सुधारण्यासाठीं व त्यांच्या औषधोपचारासाठीं पहिल्या पंचवार्षिक योजनेंत पशुसंवर्धन कार्यक्रम हातीं घेण्यांत आला.

**गुरांच्या औषधोपचारांच्या सोयी**—पहिल्या पंचवार्षिक योजनेंत परभणी जिल्ह्यांतील गंगाखेड, परतूड व ओढा ह्या ठिकाणीं गुरांचे दवाखाने सुरू करण्यांत आले. दुसऱ्या पंचवार्षिक योजनेच्या काळांत पूर्णा, मंठा, पालम, बोरी, आष्टी, कुंदा आणि सोनपेठ ह्या आणखी सात ठिकाणीं गुरांचे दवाखाने उघडण्यांत आले. गुरांच्या रोगांना आळा घालण्यासाठीं पशुसंवर्धन खात्यानें प्रति-बंधक लस टोचण्याचा कार्यक्रम हातीं घेतला असून उपचारांच्या पद्धतींत सुधारणा करण्यासाठीं सर्व दवाखान्यांतून पदवीधर अधिकाऱ्यांच्या आणि प्रशिक्षित स्टॉकमेनच्या नेमणुका करण्यांत आल्या.

गुरांच्या जातींत सुधारणा घडवून आणण्यासाठीं हिंगोली येथें प्रमुख ग्रामीण योजना सुरू करण्यांत आली असून कृत्रिम गर्भधारणेनें चांगल्या व उत्तम जातीच्या गुरांची पैदास करण्यांत येते. त्यासाठीं उत्तम जातीचे वळू ह्या केंद्रास पुरविण्यांत आलेले आहेत. शेत-कऱ्यांना ह्या योजनेचें महत्त्व पटावें म्हणून वेळोवेळीं ग्रामीण विभागांतून जनावरांचीं प्रदर्शनें भरविलीं जातात. उत्कृष्ट जनावरांच्या मालकांना बक्षिसें व प्रमाणपत्रें देण्यांत येतात. दुसऱ्या पंचवार्षिक योजनेच्या काळांत संतुक पिंपरी, बोरी, सोनपेठ, गुंज, परभणी, मानवत, पूर्णा आणि हिंगोली या ठिकाणीं जनावरांचीं प्रदर्शनें भरविण्यांत आलीं.

**गुरांची सुधारणा**

परभणी जिल्ह्यांमध्यें मेंढपाळाचा धंदाहि मोठ्या प्रमाणांत चालतो. परंतु धनगरांना पुरेशा प्रमाणांत मेंढ्यांपासून लोकर मिळत नाहीं. मेंढ्यांच्या उत्कृष्ट जातीची निपज करून त्यापासून जास्त प्रमाणांत लोकरीचें उत्पन्न काढणें व लोकरीच्या प्रकारांत सुधारणा करणें ह्या हेतूनें हिंगोली येथे मेंढी केन्द्राची स्थापना करण्यांत आली. तीन खेड्यांतील धनगरांना मेंढी संवर्धन विकासासाठीं गट विकास अधिकाऱ्यांकडून कर्ज देण्यांत आलें असून ह्या भागांतून निपजीसाठीं पठवाडी मेंढीची निवड करण्यांत आली आहे.

**मेंढ्यांचा विकास**

ग्रामीण भागांत तसेंच मागासलेल्या विभागांत थोड्या खर्चांत उत्तम फायदा मिळवून देण्याच्या दृष्टीनें कोंबड्या पाळण्याचा धंदा किफायतशीर व उपयुक्त असा आहे. पूर्वीं दर कोंबडीमागें दरवर्षी केवळ ७० ते ८० अंडी मिळत असत. उत्पादनाचें हें प्रमाण अत्यल्प आहे. कोंबड्या पाळण्याच्या धंद्याचा विकास करण्यासाठीं हिंगोली येथें एक पोल्ट्री फार्म स्थापन करण्यांत आला. ह्या पोल्ट्री फार्ममधून उत्कृष्ट जातीच्या कोंबड्यांची निपज करण्यासाठीं खेडुतांना त्या सवलतीच्या दरांत पुरवण्याची व्यवस्था करण्यांत आली आहे. विकास गट अधिकाऱ्यामार्फत कोंबडी पाळण्याच्या धंद्यासाठीं कर्जेंहि दिली जातात.

**कोंबड्यांचा विकास**

**घोड्यांची पैदासः**—हिंगोली येथेंच उत्कृष्ट घोड्यांची पैदास करण्यासाठीं एक स्टड फार्म काढण्यांत आला असून ह्या फार्ममधून चांगल्या जातीच्या घोड्यांची पैदास केली जाईल. हे घोडे सैन्यासाठीं आणि मुंबईच्या हाफकिन इन्स्टिटयूट सारख्या संशोधन करणाऱ्या संस्थांना पुरविण्यांत येतील.

**मासेमारीः**—परभणी जिल्ह्यांत तिसऱ्या पंचवार्षिक योजनेच्या काळांत छोट्या पाटबंधाऱ्यांच्या योजनांत वाढ झाल्यावर व पूर्णा धरणाचे काम पूर्ण झाल्यावर मासेमारीच्या योजनेंत प्रगति होईल. मासेमारीच्या योजनेसाठीं तिसऱ्या पंचवार्षिक योजनेत ५१,००० रुपयांची तरतूद करण्यांत आली आहे.

ह्या जिल्ह्यांत जिंतुर आणि हिंगोली असे दोन जंगल विभाग आहेत. जिंतूर रेंजचा जंगल विभाग ५४ चौरस मैलाचा असून हिंगोलीचा १०४ चौ. मैलाचा आहे. दुसऱ्या योजनेच्या काळांत ह्या जिल्ह्यापैकीं १००० एकराचा विभाग जंगल वाढीकडे उपयोगांत आणला जाईल. जंगल विस्ताराचा हा कार्यक्रम पूर्ण झाल्यानंतर आसपासच्या खेड्यांतील खेडूतांना त्याचा फायदा होईल. जमिनीच्या खालच्या थरांत अधिक पाणी मुरल्या कारणानें आसपासच्या खेड्यांना पाण्याचा सांठा अधिक प्रमाणांत उपलब्ध होऊं शकेल. सुमारें २५ ते ३० वर्षांच्या कालावधीनंतर स्थानिक लोकांच्या सरपणाच्या गरजा भागूं शकतील आणि त्यामुळें जळणासाठीं आज ज्या शेणी वापराव्या लागतात त्या वापराव्या लागणार नाहींत. त्याचप्रमाणें आसपासच्या भागांतील गुरांची चाऱ्याची सोय होऊं शकेल.

**जंगलाचें संरक्षण व वाढ**

# शैक्षणिक प्रगति

मराठवाड्यांतील पांचहि जिल्हे पूर्वींच्या हैद्राबाद संस्थानांत मोडत असल्यानें संस्थानी राजकर्त्यांनी शैक्षणिक किंवा इतर कुठल्याहि क्षेत्रांत सर्वसामान्यतः सवलती न देण्याचे धोरण अवलंबिल्यामुळें जनतेचा शैक्षणिक विकास कुंठित झाला होता. १९५१ सालापर्यंत परभणी जिल्ह्यामध्यें २०९३ लोकांमागें एक प्राथमिक शाळा, १,१२,३१८ लोकांमागें एक माध्यमिक शाळा आणि ५,०५,४३२ लोकसंख्येमागें एक हायस्कूल असें प्रमाण पडत होतें. आणि अशा स्थितींतच हैद्राबाद राज्यांत पहिल्या पंचवार्षिक योजनेला सुरुवात झाली.

**ज्ञानप्रसार**


जिल्ह्यांत २६,१०२ आदिवासी, १,९०,८०५ हरिजन व इतर मागासलेल्या वर्गांची लोकसंख्या असून ती डोंगर कपारीच्या भागांत वसलेली आहे. त्याचप्रमाणें शेतीच्या व्यवसायांत गुंतलेला शेतकरी वर्ग आपल्या उद्योगाच्या दृष्टीनें सोयीच्या जागेवर वस्ती करून राहिल्यामुळें ज्ञान प्रसाराच्या कार्यांत, विशिष्ट प्रकारच्या अडचणी या जिल्ह्यांत येतात. तथापि स्वातंत्र्योत्तर काळांतील ज्ञान प्रसाराच्या कार्याच्या प्रगतीमुळें आज या जिल्ह्यांतील १०४४ शैक्षणिक संस्थांतून विद्यार्थ्यांस शिक्षण देण्यांत येत आहे.

**शिक्षकांना प्रशिक्षण**—परभणी जिल्ह्यांतील प्रशिक्षित प्राथमिक शिक्षकांची टंचाई लक्षांत घेऊन १९५४ सालीं परभणी येथें शिक्षकांची एक प्रशिक्षण शाळा सुरू करण्यांत आली. प्राथमिक शाळा शिक्षकांना ह्या ठिकाणीं शिक्षण देण्यांत येत असे. याच शाळेचें नंतर मूलोद्योग प्रशिक्षण महाविद्यालयामध्यें रूपांतर करण्यांत आलें. पहिल्या योजनेच्या काळांत ह्या शाळेंतून ३५ शिक्षकांना प्रशिक्षण देण्यांत आलें.

**जादा केंद्रीय प्राथमिक शाळा**—परतूड, गंगाखेड, जिंतूर व वसमतनगर या ठिकाणीं १९५४ सालीं चार जादा केंद्रीय शाळांची स्थापना करण्यांत आली. ह्यापैकीं प्रत्येक शाळेंतून सात शिक्षकांची नेमणूक करण्यांत आली. आणि ह्या शाळांमधून बहुसंख्य विद्यार्थी शिक्षण घेऊं लागले. याच सुमारास औरंगाबाद येथील केंद्रीय प्राथमिक शाळा परभणी जिल्ह्यांतील पाथरी या गांवी हलविण्यांत आली. पहिल्या पंचवार्षिक योजनेच्या काळांत सत्तर स्वयंप्रेरित शाळांचे सरकारी विद्यालयामध्यें रूपांतर करण्यांत आले.

बेकारीचा प्रश्न मिटविण्याकरितां आणि प्राथमिक शाळा शिक्षकांच्या संख्येंत वाढ करण्याच्या उद्देशानें सरकारनें ८० जादा नेमणूका केल्या. तसेंच विकास गटाच्या नियंत्रणाखालीं शिक्षकांच्या २१ अधिक जागा निर्माण करण्यांत आल्या. पहिल्या पंचवार्षिक योजनेच्या अखेरीस २४ मूलोद्योग शाळा व दोन माध्यमिक शाळाहि अस्तित्वांत आल्या.

# शैक्षणिक प्रगति




**समाजशिक्षण**—समाजशिक्षण योजनेची सुरुवात परभणी जिल्ह्यांत पहिल्या पंचवार्षिक योजनेमध्यें झाली. पहिल्या योजनाकाळांत समाजशिक्षणाचे १०१ वर्ग घेण्यांत येऊन १९१० प्रौढ साक्षर करण्यांत आले. जिल्ह्यास ही योजना नवीन असली तरी खेडुतांनीं त्यापासून चांगलाच फायदा घेतला.

**ए. सी. सी. आणि बालवीर**—याच अवधींत विद्यार्थ्यांसाटीं ए. सी. सी. योजना चालू करण्यांत येऊन त्यासाठीं १० ए. सी. सी. शिक्षक नेमण्यांत आले. योजनेंत १२५ विद्यार्थ्यांनीं भाग घेतला. बालवीर, स्काऊट चळवळहि चालू करण्यांत आली. त्यांत २०० विद्यार्थ्यांनीं भाग घेतला.

**वाचनालयें**—पहिल्या योजनेच्या काळांत परभणी जिल्ह्यांत ६ वाचनालयें चालू करण्यांत येऊन त्यांत एकूण ७५१३ ग्रंथ ठेवण्यांत आले. अशा प्रकारें पहिल्या पंचवार्षिक योजनेनें प्राथमिक, दुय्यम, मूलोद्योग व समाज शिक्षणाच्या बाबतींत परभणी जिल्ह्यांत सुरुवात केली व बरीच प्रगतीहि घडवून आणली.

**दुसरी पंचवार्षिक योजना**—दुसऱ्या पंचवार्षिक योजनेच्या प्रारंभीच्या आंकड्यांची पहिल्या पंचवार्षिक योजनेच्या सुरुवातीच्या आंकड्यांशीं तुलना करतां प्राथमिक शाळांत २२४ व माध्यमिक शाळांत ६ शाळांची वाढ झाल्याचें दिसून येतें. एक मल्टीपरपज हायस्कूलहि स्थापन झालें. प्राथमिक शाळांतील मुलांची आणि मुलींची संख्या बरीच वाढल्याचें आढळून आलें.

प्राथमिक शाळांत ४५५ पुरुष आणि १२ महिला शिक्षकांच्या नेमणुका करण्यांत आल्या. हायस्कूलमध्यें आवश्यकतेनुसार ३५ जादा शिक्षक नेमण्यांत आले. तसेंच प्राथमिक शाळांतील १२८ ट्रेन्ड पुरुष आणि २० ट्रेन्ड महिला यांची नेमणूक करण्यांत आली. दुय्यम शाळेंतहि ३३ ट्रेन्ड पुरुष नेमण्यांत आले. समाज शिक्षण वर्गांत ५ नें वाढ झाली आणि ५८५ प्रौढ साक्षर करण्यांत आले. दुसऱ्या पंचवार्षिक योजनेच्या प्रारंभासच एक ट्रेनिंग कॉलेज उघडण्यांत आलें व अशा रीतीनें दुसऱ्या योजनेच्या काळांत दोन बेसिक ट्रेनिंग कॉलेजिस् कार्य करूं लागलीं.

१९५६ सालीं राज्यपुनर्रचना घडून आल्यावर व हैद्राबाद राज्यांतील मराठवाड्याचे पांच जिल्हे मुंबई राज्यांत विलीन झाल्यानंतर तत्कालीन मुंबई सरकारनें ह्या विभागांतील मागासलेपणा, अज्ञान, निरक्षरता ह्या बाबतींत लक्ष देऊन या भागासाठीं दुसऱ्या पंचवार्षिक योजनेंत फेरफार केले.

दुसऱ्या योजनेच्या काळांत ७७५ जादा प्राथमिक शिक्षकांची नेमणूक करण्यांत आली. परभणी जिल्ह्यांतील प्रत्येक खेड्यांतून आतां शाळेची सोय झाली आहे. दुय्यम शाळांतूनहि एकूण ८० शिक्षकांची नेमणूक करण्यांत आली व हिंदीचे १० शिक्षकहि दुय्यम शाळांतून नेमण्यांत आले.

ह्याव्यतिरिक्त परभणी जिल्ह्यांत शेतकीविषयक अभ्यासासाठीं एक शेतकी कॉलेज असून नुकतेंच शिवाजी आर्टस् अँड सायन्स कॉलेज सुरू झाले आहे.

दुसऱ्या पंचवार्षिक योजनेच्या प्रारंभींच्या व अखेरीच्या आंकड्याची तुलना करतां प्राथमिक शाळांची संख्या ४४३ नें व हायस्कूलांची संख्या ३० वाढली आहे. दुसऱ्या पंचवार्षिक योजनेच्या काळांत दोन जादा मल्टीपरपज हायस्कूलें उघडण्यांत आली. प्राथमिक शाळांतील मुलामुलींच्या संख्येंत अनुक्रमें १९,२८० व ६,९७२ ने वाढ झाली आहे.

दुसऱ्या पंचवार्षिक योजनेच्या कालावधींत विद्यार्थ्यांच्या संख्येंत २६,२५२ नें वाढ झाली आहे. मल्टीपरपज हायस्कूलमध्यें १२९० जादा मुलांची नांवें नोंदविलीं गेलीं व प्राथमिक शाळांतून ३५१ पुरुष व ६० महिला शिक्षक नेमले गेले. म्हणजे प्राथमिक शाळांतून एकूण ४११ जादा शिक्षकांची नेमणूक करण्यांत आली. दुसऱ्या योजनेच्या काळांत ६८ पुरुष व १५ महिला शिक्षकांना ट्रेनिंग देण्यांत आलें. दुय्यम शाळांतून २४६ पुरुष व ३४ महिला शिक्षकांची जादा म्हणून नेमणूक करण्यांत आली. ह्याव्यातिरिक्त दुय्यम शाळांतील १२५ पुरुष व २२ महिला शिक्षकांना ट्रेनिंग देण्यांत आलें. समाज शिक्षण वर्गांतहि २१ ने वाढ होऊन ३११ प्रौढांना साक्षर करण्यांत आले.

दुसऱ्या पंचवार्षिक योजनेच्या काळांत मूलोद्योग शाळांत ६७ ने वाढ झाली आहे.

**तांत्रिक प्रशिक्षण**—औरंगाबाद येथील पॉलिटेक्निक मध्यें तांत्रिक शिक्षणाची सोय करण्यांत आली असून त्यामुळें सर्व मराठवाडा विभागाची सोय झाली आहे. पॉलिटेक्निकमध्यें डिप्लोमा कोर्सचें शिक्षण घेणाऱ्या गरीब गरजू विद्यार्थ्यांना वाढत्या प्रमाणांत शिष्यवृत्त्या व इतर मदत देण्याची व्यवस्था करण्यांत आली आहे.

**प्रौढ शिक्षण**

साक्षरतेचा प्रसार होण्याच्या दृष्टीनें प्रौढ शिक्षण जिल्ह्यांत सुरू करण्यांत आलें असून पहिल्या परिक्षेकरितां चार महिने मुदतीचे वर्ग व दुसऱ्या परिक्षेकरितां सहा महिने मुदतीचे वर्ग भरविण्यांत येतात. पहिल्या परिक्षेकरितां साठ दिवस व दुसऱ्या परिक्षेकरितां वीस दिवस हजेरी असणे आवश्यक आहे. १९५९-६० मध्यें या जिल्ह्यांत अनेक प्रौढ साक्षर झाले. याशिवाय समाज शिक्षणाच्या प्रसारासाठीं विकास गट क्षेत्रांत तरुण मंडळें, महिला मंडळें, भजनी मंडळें, शेतकरी संघ, समाज मंदिरें, अभ्यास मंडळें, बाल विकास मंडळें, क्रीडा मंडळें सुरू करण्यांत आलीं.

**ग्रामशिक्षण मोहीम**

समाज शिक्षण योजनेमध्यें केवळ निरक्षरता नष्ट करून लोकांना साक्षर करण्याचाच उद्देश होता. परंतु ग्रामशिक्षण मोहिमेंत मात्र साक्षरतेव्यतिरिक्त शेतकी, आरोग्य, सहकारचळवळ, स्वच्छता इत्यादींचाहि अंतर्भाव आहे. परभणी जिल्ह्यांत ११० खेड्यांतून ग्रामशिक्षण मोहीम चालू करण्यांत आली असून परभणीच्या जिल्हाधिकाऱ्यांच्या अध्यक्षतेखाली एक समिती स्थापन करण्यांत आली आहे. या समितीमध्यें जिल्ह्यांतील सर्व खासदार, आमदार आणि अधिकारी इत्यादींचा अंतर्भाव आहे. तसेंच ग्रामशिक्षण मोहीम अंमलांत आणण्यासाठीं तालुका समित्या व ग्राम समित्यांची स्थापना करण्यांत आली आहे.

**शैक्षणिक सवलती**

या जिल्ह्यांत सरकारी मदतीने चालणारी सात वाचनालयें असून त्यांत समाज शिक्षण ज्ञानाचा प्रसार करण्यास उपयुक्त अशी पुस्तकें शिक्षण विभागांतून त्या वाचनालयास देण्यांत येतात. अभ्यासक्रमांत शारीरिक शिक्षणक्रमाचा देखील समावेश करण्यांत आला असून तें काम एक अधिकारी स्वतंत्रपणे पहात असतात. भारतीय खेळांना त्यामध्यें प्राधान्य देण्यांत आले आहे. दरवर्षी तालुका आणि जिल्हा पातळीवर खेळांचे सामने घेऊन शारीरिक सुदृढतेस प्रोत्साहन दिलें जातें. जिल्ह्यांतील बऱ्याच प्राथमिक शाळांना त्यांचे विस्तीर्ण क्रीडांगण असून त्यांना खेळाचें साहित्य पुरविण्यांत आलें आहे. शिक्षणावस्थेंतच शिस्तीचें शिक्षण मिळावें म्हणून स्काउट व ए. सी. सी.चा क्रम सुरू करण्यांत आला आहे व त्या क्षेत्रांत शिक्षकांना प्रशिक्षण दिलें जातें.

शैक्षणिक दृष्ट्या परभणी जिल्ह्यांत प्रगति झाली असून १९६१ साली घेतलेल्या आढाव्यानुसार साक्षरतेचें प्रमाण १.८३ लाखांनी वाढले आहे. यामध्यें १.५३ लक्ष पुरुष असून ०.३० लक्ष स्त्रिया आहेत.

# व्यवसाय आणि उद्योगधंदे

**कुटिरोद्योग आणि हस्तकलाकौशल्य**—कलाकौशल्य आणि हस्तोद्योगाच्या सुंदर वस्तूंबद्दल भारतभूमी एकेकाळीं ख्यातनाम होती. पारतंत्र्याच्या कालांत ग्रामीण भागांत घरांघरांतून चालत आलेला हा गृहोद्योग हळूं हळूं लुप्त होऊं लागला. स्वातंत्र्य प्राप्त होतांच पूर्वापार चालत असलेल्या ग्रामीण घरगुती उद्योगास आणि कला कौशल्याच्या कामास नवजीवन प्राप्त झालें. दूरवर विखुरलेल्या कारागिरांस सहकारी चळवळीनें एकत्र आणलें आणि कला जीवनाचा नवीन मनु आपलें गतवैभव पुनः प्राप्त करण्याचा मार्ग आक्रमूं लागला आहे.

ग्रामीण भागांत चालणारे घरगुती उद्योग, कलाकौशल्याचीं कामें आणि हस्तव्यवसायांना उत्तेजन देण्यासाठीं आणि त्यांत गुंतलेल्या कारागिरांना सहाय्य व मार्गदर्शन करण्याच्या हेतूनें परभणी येथें डिस्ट्रिक्ट ऑफिसर फॉर कॉटेज इंडस्ट्रिज यांचें कार्यालय सुरू करण्यांत आलें आहे. लहान स्वरूपांत वैयक्तिक रीतीनें उद्योग करण्यापेक्षां कांहीं कलाकारांनीं एकत्र येऊन काम केल्यास त्या उद्योगास स्थैर्य येतें आणि अधिक आधुनिक यंत्र सामुग्री व सहाय्य प्राप्त करून घेतां येतें. ह्या दृष्टीनें एकाच उद्योगांत गुंतलेले कारागिर आणि कलाकार सहकारी तत्त्वावर एकत्र आले असून एकूण सहकारी संस्थांची संख्या ६९ आहे. सरकारच्या कुटिर उद्योगधंदे विभागातर्फे अशा सहकारी संस्थांना खेळत्या भांडवलासाठीं, हत्यारें आणि अवजारें खरेदी करण्यासाठीं, शेडस् आणि गोदामें यांच्या बांधकामासाठीं तसेंच इतर आवश्यक साधनसामुग्रीसाठीं आर्थिक सहाय्य आणि कर्ज देऊन तांत्रिक मार्गदर्शन करण्यांत येतें.

**हातमाग**—पहिल्या पंचवार्षिक योजनेच्या अखेरीस जिल्ह्यांत सुमारे १३,६४२ कामगार काम करीत होते. परभणी जिल्ह्यांतील सर्व कुटिरोद्योगांत हातमाग हा प्रमुख धंदा आहे. पहिल्या पंचवार्षिक योजनेच्या काळांत विणकर सहकारी संस्थांना भांडवलादाखल कर्जें देण्यांत आलीं. या जिल्ह्यांतील विणकरांच्या तीन संस्थांना ५९,५०० रु. कर्ज देण्यांत आलें.

**सहकारी कुटिरोद्योग संस्था**—परभणी जिल्ह्यांतील कांहीं भाग जंगल क्षेत्रानें व्यापलेला असल्यामुळें जंगल कुपांची कामे करण्यासाठीं जंगल कामगार सहकारी संस्था आणि मजूर कंत्राट सहकारी संस्था यांना आर्थिक सहाय्य आणि कर्जाच्या रूपानें मदत करण्यांत येते. जिल्ह्यांत १ जंगल कामगार सहकारी संस्था असून सात मजूर कंत्राट सहकारी संस्था आहेत.

**जिल्ह्यांतील ६९ सहकारी संस्थांचा तपशील पुढीलप्रमाणें आहे:—**

| | |
|---|---|
| विणकर सहकारी संस्था | ५ |
| लोकर विणकर सहकारी संस्था | ३ |

| | |
|---|---|
| चर्मकार आणि कातडी उद्योगधंदा | ११ |
| तेली सहकारी संस्था लिमिटेड | १० |
| विटा आणि चुना संस्था | १० |
| मजूर कंत्राट संस्था | ७ |
| सुतार सहकारी संस्था | ५ |
| कुंभारकाम सहकारी संस्था | ३ |
| दोर आणि गोणपाट उत्पादन संस्था | ३ |
| निरा उत्पादन सहकारी संस्था | २ |
| खादी ग्रामोद्योग संस्था | १ |
| धातूकाम औद्योगिक सहकारी संस्था | १ |
| जंगल कामगार सहकारी संस्था | १ |
| बांबू कामगार सहकारी संस्था | १ |
| मूळ औद्योगिक सहकारी संस्था | १ |
| महिला मंडळ | १ |
| साबण तयार करण्याची संस्था | १ |
| टोपल्या तयार करण्याची संस्था | १ |
| नॉन एडेबल ऑईल संस्था | १ |
| जिल्हा औद्योगिक सहकारी संस्था | १ |

**उज्ज्वल औद्योगिक भवितव्य**

ग्रामीण विभागांत वैयक्तिक रीतीनें घरगुती उद्योग व हस्तोद्योग करणाऱ्या कलावंताना हत्यारें, अवजारें इत्यादि खरेदी करण्यासाठीं आणि खेळतें भांडवल उभारण्यासाठीं कर्ज आणि आर्थिक सहाय्य कुटिर उद्योगधंदे विभागातर्फें देण्यांत येते. या जिल्ह्यांतील सर्व कुटिरोद्योगांत हातमाग धंदा प्रमुख आहे. पूर्वीच्या हैद्राबाद राज्याच्या हैद्राबाद हातमाग बोर्डानें हातमाग व्यवसाय वाढविण्याच्या दृष्टीनें कांहीं योजना तयार केल्या होत्या. या योजनांपैकींच एक योजना उत्पादन सोसायट्यांची वाढ करणें ही होती. विणकर सहकारी संस्थांना त्यांच्या भांडवलासाठीं कर्जें देण्यांत आलीं.

**रिबेट**

हातमागाच्या कापडाची विक्री करण्यासाठीं वसमत आणि मानवत येथील विक्रीकेंन्द्रांना फर्निचर आणि इतर साहित्य निर्माण करण्यासाठीं प्रत्येकीं २,८०० रुपयांची मदत देण्यांत आली. उत्पादन वाढविण्याच्या कामी विणकरांना प्रोत्साहन मिळावे, अधिक ग्राहक मिळावेत, यासाठीं हातमागाच्या कापडाच्या विक्रीवर रिबेट देण्याचीहि सवलत देण्यांत आली. प्रारंभीच्या काळांत कांहीं जातींच्या कापडावर रुपयामागे पाऊण आण्यापासून दीड आण्यापर्यंत रिबेट देण्याची सवलत देण्यांत आली. परंतु त्यानंतर सर्व प्रकारच्या कापडावर सरसकट दीड आणा रिबेट देण्याची सवलत देण्यांत आली. हातमाग कापड सुधारलेल्या पद्धतीनें रंगविण्यासाठीं आणि त्याला तकाकी आणण्यासाठीं रंगणी गृहें स्थापन करण्यांत आली. वसमत येथील सहकारी विणकर सोसायटीला रंगणी गृह स्थापन करण्यासाठीं ६,५६० रुपये देण्यांत आले. या

रकमेपैकीं ४,५६० रुपये देणगी असून बाकीचे दोन हजार रुपये चलाऊ भांडवलासाठीं कर्जाऊ देण्यांत आले आहेत.

दुसऱ्या पंचवार्षिक योजनेच्या प्रारंभी जिल्ह्याच्या वेगवेगळ्या भागांत ४,००० माग होते आणि तीन विणकर सहकारी सोसायट्या कार्य करीत होत्या. ह्या सोसायट्यांची सभासद संख्या सुमारें २,९०० होती. इतर हातमाग विणकरांनाहि दुसऱ्या योजनेच्या काळांत सहकारी सोसायट्यांच्या कार्यक्षेत्रांत आणण्याचे ठरविण्यांत आले आहे. दुसऱ्या योजनेंत विक्री केंद्रें, रंगणी गृहें वगैरेंची स्थापना करण्यासाठीं ग्रँटस् देण्याची व्यवस्था करण्यांत आली असून विणकरांना त्यांच्या कामचलाऊ आणि शेअर भांडवलासाठीं कर्जे दिली गेली आहेत. मानवत येथील विणकर सोसायटीला १९५७–५८ सालीं रिझर्व बँक ऑफ इंडियामार्फत ७५,००० रुपयांचे कर्ज मिळवून देण्यांत आलें आहे. गिरण्यांत तयार झालेल्या कापडाची स्पर्धा करण्याच्या दृष्टीनें हातमाग कापडाच्या विक्रीवर रुपयामागें दोन आणे रिबेट देण्याची सवलत देण्यांत आली आहे. या सर्व योजनांमुळें या जिल्ह्यांतील हातमाग व्यवसायाला चालना मिळेल असा अंदाज आहे.

**सहकारी संस्था**

या जिल्ह्यांतील लोकरीचा धंदा देखील एक महत्त्वाचा धंदा आहे. मेंढ्याच्या शरीरावरील लोकर कातरणे, पिंजणें, विणणें आणि धाग्याला पीळ देणें या सर्व गोष्टी हातानेंच केल्या जातात व त्या करण्याच्या पद्धतीहि ओबडधोबड अशा आहेत. म्हणूनच दुसऱ्या पंचवार्षिक योजनेच्या काळांत फ्रेम लुम्सचा उपयोग करण्याचें आणि लोकर विणकरांना सहकारी संघटनेच्या कक्षेंत आणण्याचें योजिलें आहे. यामुळें या धंद्याचा विकास होणार आहे. यासाठीं त्यांच्या शेअर भांडवलांत सहाय्य करणें, सुधारलेलीं अवजारें आणि साधनें विकत घेणें, विक्री केंद्रें उघडणें वगैरे बाबतींत मदत दिली जाईल. दुसऱ्या योजनेच्या काळांत मागांची संख्या १२० पर्यंत वाढविण्याचें ठरविण्यांत आलें.

**लोकरीचा धंदा**

चामडी कमाविण्याचा धंदा मागासलेल्या वर्गाच्या हातीं असून त्यांच्यापाशीं भांडवल सुधारण्यासाठीं पुरेशी आर्थिक साधनें नाहींत आणि आवश्यक तेवढी पतहि नाहीं म्हणून या लोकांना सहाय्य करण्याच्या दृष्टीनें हत्यारे आणि अवजारें पुरविण्यांत आलीं आहेत. परभणी विकास गटांतील देवठाण्यास दोन चर्मोद्योगाच्या शाळा स्थापण्यांत आल्या असून पिंगळीस एक शाळा उघडण्यांत आली आहे. तसेंच द्वितीय अवस्थेतील हिंगोली विकास गटांतील गणेश वाडीस एक चर्मोद्योग शाळा असून प्रथमावस्थेंतील हिंगोली विकास गटांत एक शिवण कला शाळा आहे. तसेंच कातडी कामाची व सूत विणण्याची शाळादेखील तेथें असून त्या ठिकाणीं सुतारकी आणि लोहारकी यांच्या शाळाहि आहेत.

**चामडी कमावणें**

दुसऱ्या पंचवार्षिक योजनेच्या काळांत लोकर विणकर संस्थांना कामचलाऊ भांडवलादाखल २,००० रुपये कर्ज मंजूर करण्यांत येऊन वैयक्तिक इसमांना लोंकर विणकर संस्थेचे शेअर्स खरेदी करण्याकरितां ५०० रुपये देण्यांत आले. छोटया उद्योगधंद्यांना सहकारी सहाय्य देण्याच्या सरकारी धोरणानुसार दुसऱ्या योजनेच्या काळांत वैयक्तिक कारागिरांना अवजारें व हत्यारें खरेदी करण्यासाठीं १९,३०० रुपये रक्कम देण्यांत आली आहे. तसेंच नव्यानें संघटित झालेल्या जिल्हा औद्योगिक सहकारी मंडळ या संस्थेला आर्थिक सहाय्य म्हणून ३,५०० रुपये देण्यांत आले.

**सहाय्य व कर्जे**

दुसऱ्या पंचवार्षिक योजनेच्या काळांत औद्योगिक सहकारी संस्था अस्तित्वांत येऊन सरकारनें या संस्थेला ५०० रुपयांचे भाग भांडवल दिलें. नव्यानें संघटित झालेल्या मजूर आणि कंत्राट संस्थेस स्वतःच्या अल्प निधींतून हत्यारें आणि अवजारें खरेदी करण्यासाठीं बऱ्याच अडचणी येत असल्याचें आढळल्यावरून हत्यारें आणि अवजारें खरेदी करण्यासाठीं एक आर्थिक सहाय्याची योजना चालू करण्यांत येऊन या संस्थेस २०० रुपयांचें अनुदान देण्यांत आलें. औद्योगिक सहकारी संस्थांना देखील अवजारें व हत्यारें खरेदी करण्यासाठीं या योजनेखालीं आर्थिक सहाय्य देण्यांत आलें. या योजनेच्या अंतर्गत आतांपर्यंत २,००० रुपयांचें कर्ज वाटण्यांत आलें असून त्यामुळें ४ संस्थांचा फायदा झालेला आहे.

**औद्योगिक संस्थांना कर्ज**

परभणी जिल्ह्यांत मध्यवर्ति आर्थिक संघटना म्हणून कार्य करीत असलेल्या मध्यवर्ति सहकारी बँकेच्या ताब्यांत १,१०,००० रुपयांची रक्कम देण्यांत आली होती. चामडी व कातडी धंद्याच्या विकासासाठीं १,४०० रुपये, ग्रामीण तेल उद्योगधंद्यासाठीं ५८,१५१ रुपये व कुंभारकामाच्या धंद्यासाठीं ८,५०० रुपयांची मदत देण्यांत आली. बँकेच्या ताब्यांत असलेल्या रक्कमेपैकीं ३४ औद्योगिक संस्थांना ८३,५८७ रुपये वांटण्यांत आले. दारूबंदीमुळें बेकार झालेल्या इसमांना काम देण्याच्या निमित्तानें निरा उत्पादक संस्थेच्या संघटनेचें कार्य हातीं घेऊन निरा केंद्रें चालविण्यासाठीं दुसऱ्या योजनेच्या काळांत खादी मंडळातर्फे २,००० रुपयांची रक्कम देण्यांत आली. तसेंच शेअर्स, कोठारें, घाणी, बैल, चरखे वगैरेंसाठीं एकूण ६,००० रुपये खर्च करण्यांत आले.

**मध्यवर्ति सहकारी बँक**

# आ रो ग्य व्य व स्था

या जिल्ह्यांत जनतेच्या आरोग्याचें संगोपन, संवर्धन आणि उपचारांचे काम सार्वजनिक आरोग्य खात्यामार्फत दोन प्रकारांनीं केलें जाते. एक म्हणजे सामुदायिक आरोग्य चांगलें आणि सुदृढ राहावे म्हणून प्रतिबंधक उपाययोजना करणें आणि दुसरा म्हणजे जिल्ह्यांत ठिकठिकाणीं दवाखाने आणि इस्पितळें उघडून रोग पीडितांची उपचार–व्यवस्था करणे. सार्वजनिक आरोग्य खात्याच्या मार्गदर्शनाखालीं ग्रामीण विभागापर्यंत जनतेच्या आरोग्याची काळजी स्थानिक संस्था आणि ग्रामपंचायतीहि घेत असतात.

**उपचार व्यवस्था**

सार्वजनिक आरोग्य राखण्यासाठीं परभणी जिल्ह्यांतील वसमत, जिंतूर, परभणी, हिंगोली, कळमनुरी, परतुड, पाथरी आणि गंगाखेड या तालुक्याच्या ठिकाणीं एकेक सरकारी दवाखाना असून सेलू, मानवत, पूर्णा आणि पालम ह्या विभागांत देखील एकेक दवाखाना आहे. जिल्ह्यांतील बहुतेक मोठ्या दवाखान्यांत स्त्रियांसाठीं खास व्यवस्था असून प्रसूति विभागहि दवाखान्यास जोडण्यांत आला आहे. जिल्ह्यांत प्राथमिक आरोग्य केन्द्र उघडण्यांत आलें असून त्यामध्यें एक आरोग्याधिकारी, एक कंपौंडर, एक सॅनिटरी इन्स्पेक्टर, आरोग्य निरीक्षक व इतर मदतनीस एवढा नोकरवर्ग असतो. हें केंद्र २० ते २५ हजार लोकसंख्येच्या विभागांत कार्य करीत असून तेथें नाममात्र शुल्क घेऊन औषधोपचार केले जातात. ग्रामीण भागांतून येणाऱ्या गर्भवती स्त्रियांसाठीं तेथें एक छोटेसें प्रसूतिगृह असते. स्त्रियांना प्रसूतिपूर्व आणि प्रसूतीनंतर आरोग्य सुधारण्याबाबतचा तसेंच बालसंगोपनाचा सल्ला या आरोग्य केंद्रामार्फत खेड्यांतील स्त्रियांना देण्यांत येतो.


**प्रतिबंधक उपाययोजना**

जिल्हा आरोग्याधिकारी हे प्रतिबंधक उपाययोजनेचे प्रमुख असून शहरी आणि ग्रामीण भागांतील सर्व सामान्य आरोग्याबाबतची परिस्थिती, यात्रा आणि उत्सवप्रसंगीं आरोग्याची व्यवस्था, सांथीच्या रोगांचा प्रादुर्भाव झाल्यास त्यांचा प्रतिबंध करणें आदि महत्वाचीं कामें त्यांच्याकडे असतात व ह्यासाठीं त्यांच्या हाताखालीं आवश्यक तो नोकरवर्ग असल्यामुळें ग्रामीण घटकापर्यंत देखील त्यांचे कार्य अविरत चालू असते. या जिल्ह्यांतील व्हॅक्सिनेटर्स सांथीच्या काळांत देवीची वा इतर रोगाची लस टोचण्याचें काम नेटाने चालवीत असतात.

**जिल्ह्यांतील सॅनिटरी पथकें**

सॅनिटरी पथकें सांथीच्या काळांत घरें, विहिरी, रोग्याचे कपडे वगैरे जंतुरहित करतात आणि सर्व इतर वेळ विहिरी जंतुरहित करण्यासाठीं औषधी टाकणें, रस्ते साफ करणें, मलमूत्र व काडीकचऱ्याचे कंपोस्ट खत बनविणें व ग्रामीण जनतेला आरोग्यविषयक-संवयी लावणें हीं कामें करतात. प्रत्येक पथकांत अेक मुकादम व मजूर मदतनीस असतात. ग्रामीण भागांत स्वच्छता राखण्यासाठीं उपाययोजना करणें, घरें, रस्ते, पाणवठे यांची स्वच्छता राखणें, केरकचरा व मलमूत्र यांचा उपयोग खतें बनविण्याकडे करणें, जनतेस प्रात्यक्षिकाद्वारें शिक्षण देणें इत्यादि कामाची जबाबदारी जिल्ह्यांतील सॅनिटरी इन्स्पेक्टर्स व सब-इन्स्पेक्टर्स यांच्यावर असते. त्याचप्रमाणें जन्म मृत्यूच्या नोंदी

# आरोग्य व्यवस्था




तपासणें, खानावळी व हॉटेलें स्वच्छतेच्या दृष्टीनें तपासणें व सांथींच्या काळांत प्रतिबंधक उपाय-योजना करण्याचें कामहि यांनाच करावें लागतें.

दुसऱ्या पंचवार्षिक योजनेच्या काळांत ३२ आरोग्य पथकांची स्थापना करण्यांत आली. प्रत्येक पथक तालुक्याच्या ठिकाणीं सॅनिटरी इन्स्पेक्टरच्या देखरेखीखालीं काम करीत असते. दुसऱ्या पंचवार्षिक योजनेच्या काळांत या पथकांनी ९५५ खेड्यांना भेट देऊन ५२८० पिण्याच्या पाण्याच्या विहिरी शुद्ध केल्या व ९८० शोष खड्डे तयार केले. १२० खताचे खड्डे नष्ट केले, ९ धुररहित चुली बांधल्या आणि २४ कंपोस्ट खतांचे खड्डे खणले, ८ मऱ्या व शौचकूप बांधले व ६४ गटारे आणि मोऱ्यांचें बांधकाम केलें.

परभणी येथील सिव्हिल हॉस्पिटलमध्यें सूतिका विभागाच्या जोडीस क्षयरोग विभाग, पॅथॉलॉजिकल लॅबोरेटरी युनिट, रेडिऑलॉजिकल युनिट, गुप्त रोग विभाग यांचीहि स्थापना करण्यांत आली आहे.

ह्याव्यतिरिक्त सोनपेठ या ठिकाणीं एक आयुर्वेदिक दवाखाना उघडण्यांत आला असून लौकरच हिंगोली तालुक्यातील कवठा या ठिकाणीं एक, परभणी तालुक्यांच्या पिंगळी आणि जांब या ठिकाणी प्रत्येकीं एक, जिंतूर तालुक्यांतील बोरीस आणि कळमनुरी तालुक्यांतील कळमनुरीस एकेक प्राथमिक आरोग्य केन्द्राची स्थापना केली जाणार आहे.

परभणी जिल्ह्यांमध्यें पहिल्या पंचवार्षिक योजनेच्या काळांत एक सिव्हिल हॉस्पिटल, १२ दवाखाने, ८ युनानी दवाखाने व १२ आयुर्वेदिक दवाखाने होते. ह्याच काळांत परभणी येथील सिव्हिल हॉस्पिटलमध्यें ४० खाटांची सोय करण्यांत आली. त्यांत सूतिकागृहासाठीं करण्यांत आलेल्या ६ खाटांचा अंतर्भाव होतो. हिंगोली येथील दवाखान्यांत १२, वसमत येथील दवाखान्यांत ८ तसेंच बाकीच्या ६ तालुक्यांतील दवाखान्यांतून प्रत्येकी २ खाटांची सोय करण्यांत आली. मानवत व पूर्णा ह्या मोठ्या शहरांतून प्रत्येकी ८ खाटांची आणि सेलू व पालम येथील दवाखान्यांतून प्रत्येकी ४ खाटांची सोय करण्यांत आली.

**सूतिकागृह**

दुसऱ्या पंचवार्षिक योजनेच्या काळांत देणगी रूपानें मिळालेल्या मदतीनें हिंगोली येथील दवाखान्यांत एक सूतिका–गृहहि बांधण्यांत आलें व त्यांत आठ खाटांची व्यवस्था करण्यांत आली. परभणी येथेंहि १२ खाटांचें एक सूतिकागृह बांधण्यांत आलें. परभणी येथील सिव्हिल हॉस्पिटलला एक ऑक्झिलरी नर्स मिडवाईफ ट्रेनिंग स्कूल जोडण्यांत आले असून त्याठिकाणीं १५ परिचारिका शिक्षण घेत आहेत. ह्या परिचारिकांचा २ वर्षांचा अभ्यास पूर्ण झाल्यानंतर प्राथमिक आरोग्य केंद्रांमध्यें त्यांची नेमणूक करण्यांत येते.

क्षय रोगावर इलाज करण्यासाठीं परभणी येथें एक क्षय रोग हॉस्पिटल उघडण्यांत आलें असून तेथें रोग्यांसाठीं १२ खाटांची सोय करण्यांत आली आहे. हॉस्पिटलमधील पॅथोलॉजिकल लॅबोरेटरी युनिट, मेडिऑलॉजिकल युनिट आणि व्ही. डी. क्लिनीक ही केंद्रें उत्तम रीतीनें कार्य करीत आहेत.

दुसऱ्या पंचवार्षिक योजनेच्या काळांत मंठा शिरड, आणि शहापूर ह्या गांवीं ॲलोपॅथिक केन्द्राची स्थापना करण्यांत आली.

**आयुर्वेदिक दवाखाने**

परभणी जिल्ह्यांत एकूण १२ आयुर्वेदिक दवाखाने आहेत. ह्या दवाखान्यांतून प्रशिक्षित दायांची नेमणूक करण्यांत आली असल्यामुळें खेड्यापाड्यांतील गरोदर स्त्रियांना बरीच मदत मिळत आहे. ह्या दवाखान्यांतून प्रसूतिपूर्व आणि प्रसूतीनंतरच्या उपचारांची सोय आहे. प्रशिक्षित दायांच्या उत्कृष्ट कार्यामुळें जिल्ह्यांतील माता व बालक यांच्या मृत्यूसंख्येच्या प्रमाणांत घट झाली आहे. दुसऱ्या पंचवार्षिक योजनेच्या काळांत सोनपेठ या गांवीं एक आयुर्वेदिक दवाखाना उघडण्यांत आला.

**सार्वजनिक आरोग्य**

कुष्ठरोगास प्रायबंद घालण्यासाठीं दुसऱ्या पंचवार्षिक योजनेच्या काळांत परभणी जिल्ह्यांत पूर्णा येथें १९५८ सालीं एक कुष्ठरोग निवारण केंद्र उघडण्यांत आलें. परंतु हें केंद्र अपुरें पडत असल्याचें दिसून आल्यावरून १९५९ सालीं परभणी येथें आणखी एक कुष्ठ रोग निवारण केंद्र स्थापन करण्यांत आलें व ह्या केंद्राच्या शाखा पिंगळी, झरी, पेठगांव आणि सिंगणापूर ह्या चार ठिकाणीं उघडण्यांत आल्या. पूर्णा व परभणी या केंद्रांचा एक एक वरिष्ठ हेल्थ इन्स्पेक्टर नेमण्यांत आला असून त्याला मदतनीस म्हणून एक एक हेल्थ सब्–इन्स्पेक्टरहि देण्यांत आला आहे. कुष्ठ रोग्यांच्या रक्ताचे नमुने घेऊन ह्या केंद्रामधून कुष्ठ रोग्यांवर इलाज करण्यांत येतो. दुसऱ्या पंचवार्षिक योजनेच्या काळांत परभणी येथील केंद्रानें ४६,६८१ इसमांची तपासणी केली. त्यांतून ५५३ कुष्ठरोगी हुडकून काढले व ४४६ रोग्यांवर इलाज केला. निंबगांव लोण, बुजरूग व ताडकळस येथील तीन केंद्रांतील ९६०० इसमांची तपासणी करून ४०३ कुष्ठरोगी हुडकून काढले व त्या सर्व रोग्यांवर उपचार केले.

हिंगोली, मानवत, परतूड व पालम या चार ठिकाणीं दुसऱ्या पंचवार्षिक योजना काळांत सर्व्हे एज्युकेशन व ट्रीटमेंट युनिट्सची स्थापना करण्यांत येऊन डीग्रस, खळेगांव, माळहिवरा, गोदरवाडा, कोठा, इर्ली व रेणापूर ह्या ठिकाणीं त्यांच्या शाखा उघडण्यांत आल्या. ह्या केंद्रांनीं उत्कृष्ट कार्य करून १३.५०५ लोकांची पाहणी केली. १४३ कुष्ठरोगी हुडकून काढले व १२१ रोग्यांवर इलाज केला. परभणी येथील सिव्हिल हॉस्पिटलमधील १२९ कुष्ठरोग्यांना रोगमुक्त झाल्याबद्दलची प्रमाणपत्रेंहि देण्यांत आली आहेत.

**कुटुंब नियोजन केंद्रें**—दुसऱ्या पंचवार्षिक योजनेच्या काळांत परभणी जिल्ह्यांतील जिंतूर, बोरी व हिंगोली ह्या ठिकाणीं कुटुंब नियोजन केंद्रांची स्थापना करण्यांत आली असून लोकांना संतति प्रतिबंधक साधनें मोफत पुरविलीं जातात. हिंगोली व जिंतूर येथील कुटुंब नियोजन केंद्रामार्फत दुसऱ्या पंचवार्षिक योजनेत ३१,८०० लोकांना कुटुंब नियोजनाचे शिक्षण देण्यांत येऊन ५०१४ लोकांना त्याबाबत सल्ला देण्यांत आला. तसेंच १४०० लोकांनी कुटुंब नियोजनासंबंधींचे उपचार करून घेतले.

**प्राथमिक आरोग्य केंद्र**

दुसऱ्या योजना काळांत हिंगोली तालुक्यांतील गोरेगांव या ठिकाणीं प्राथमिक आरोग्य केंद्र स्थापन करण्यांत येऊन चार ठिकाणीं त्यांच्या शाखा उघडण्यांत आल्या. या केंद्रांतून दायांची नेमणूक करण्यांत आली असल्यामुळें त्यांच्यामार्फत बाळंतपण व इतर उपचारांची सोय झाली आहे. ह्या केंद्रामुळें ५०,००० लोकांना केंद्राचा फायदा घेता येतो. ह्याशिवाय पिंगळी, जांब, बोरी, कोठा व आखाडा बाळापूर ह्या ठिकाणीं विकास गटाच्या निधींतून नुकतीच पांच प्राथमिक केंद्रें स्थापन करण्यांत आलीं असल्याने जनतेचा अकारण व अनाठायीं खर्च होणारा पैसा वाचून त्रास बऱ्याच अंशीं कमी झाला आहे. हिंगोली येथील प्राथमिक आरोग्य केंद्रानें दुसऱ्या पंचवार्षिक योजनेच्या काळांत एकूण १५,००० प्रसूतिपूर्वक प्रकरणांची नोंदणी करून ७,४९६ प्रसूतिपूर्व स्त्रियांची पाहणी केली व १९५३ मातांवर उपचार केले. तसेंच ह्या केंद्रानें ८१७१ बालकांची नोंदणी करून ४६५० बालकांवर उपचार केले.

**शालेय आरोग्य दवाखाना**—परभणीमध्यें एक शालेय आरोग्य दवाखाना असून ह्या ठिकाणीं आरोग्य निरीक्षकाद्वारें शाळकरी मुलांची तपासणी केली जाते. उपरोक्त दवाखाना दुसऱ्या योजनेच्या काळांत स्थापन करण्यांत आला. ह्या अवधींत ह्या दवाखान्यातर्फे १५ शाळांतील ४,८७४ मुलांची प्रकृति तपासण्यांत आली. त्या मुलांमध्यें १७४ दातांचे, २८ नाकाचे, ७९

डोळ्यांचे, १२३ कातड्याचे, ४१ हृदयाचे आणि ३१ घसा व इतर रोगांचे रोगी असल्याचें आढळून आले व त्यांच्यावर योग्य असे उपचार करण्यांत आले.

१९५८ नंतर संपूर्ण परभणी जिल्ह्यांत राष्ट्रीय मलेरिया निर्मूलन योजना लागूं करण्यांत आली. या योजनेचें उद्दिष्ट म्हणजे १ जून पासून ३० ऑक्टोबर या कालावधींत परभणी जिल्ह्यांतील प्रत्येक घरास व गुरांच्या गोठ्यास दोन वेळा डी. डी. टी. फवारणे हें होय.

**मलेरिया.**

तसेंच ह्या वर्षीसुद्धा डी. डी. टी. फवारण्याचें कार्य चालूं आहे. या राष्ट्रीय मलेरिया योजनेच्या सफलतेमुळें मलेरियाचें प्रमाण ( १९५८ ) ९.७१ शेंकडा पासून ( १९६० ) १.३ शें.पर्यंत कमी झाले आहे. खालील आंकडेवारीवरून मलेरिया योजना कितपत यशस्वी झाली आहे, हें कळून येईल.

| विवरण | १९५८ च्या पूर्वीचें प्रमाण | १९५८-५९ ची प्रगति | १९५९-६० ची प्रगति |
|---|---|---|---|
| पानथरीचें प्रमाण | ९.७२ शें. | १.८ शें. | १.३ |
| एक वर्षाच्या खालील मुलांतील मलेरियाचें प्रमाण | ०.५ शें. | ०.५ शें. | ०.० |
| एक ते १२ वर्षाच्या खालील मुलांतील मलेरियाचें प्रमाण | १.३ | १.३ | ०.०२ |
| मलेरियामुळें मृत्यूचें प्रमाण | ४.८ | ४.० | १.१ |

सर्व्हेलन्स स्कीम ह्या प्रकारची राष्ट्रीय मलेरिया निर्मूलन योजनेखालीं दुसरी एक योजना चालूं करण्यांत आली आहे. या योजनेनुसार खालील प्रमाणावर काम केलें गेलें आहे. ( १ ) एकूण आजाऱ्याची संख्या ४४,७१० ( २ ) उपचार केलेल्या रोग्यांची संख्या ३१,८८०, ( ३ ) रक्तांचे नमुने घेतलेल्यांची संख्या ४१,३१७, ( ४ ) एकूण मलेरियाचे रोगी सांपडलेल्यांची संख्या १५,४३४ ( ५ ) मलेरियाच्या रोग्यांस वाटलेल्या विनामूल्य गोळ्यांची संख्या १,१४,०८०

या योजनेच्या अंमलबजावणीमुळे जवळ जवळ बाकीचे सांथीचे रोग उदा. हगवण, देवी, एन्फ्ल्यूएंझा वगैरेचें प्रमाण मोठ्या प्रमाणावर कमी झाले आहे. मलेरियाच्या निर्मूलन कार्यामुळें कामगार जमातीचे स्वास्थ्य सुधारले.

# शासनव्यवस्था

जिल्ह्याचें प्रमुख ठिकाण परभणी असून राज्यांतील बहुतेक खात्यांचे जिल्हा पातळीवरील अधिकारी परभणी येथेंच राहतात. जिल्ह्याचें न्यायालय देखील परभणीलाच आहे.

राज्यकारभाराच्या सोयीच्या दृष्टीनें जिल्ह्याचे दोन विभाग पाडण्यांत आलेले आहेत. प्रत्येक विभागांत पुढीलप्रमाणें तालुके आहेत.

**हिंगोली विभाग**—हिंगोली, वसमत, कळमनुरी आणि जिंतूर.

**सेलू विभाग**—परभणी, पाथरी, परतूड आणि गंगाखेड.

प्रत्येक विभागावर एकेक डेप्यूटी कलेक्टर असून प्रत्येक तालुक्याचा अधिकारी तहसीलदार आहे. तालुकाधिकारी हे तालुक्याच्या गांवीं असतात.

**स्थानिक स्वराज्य संस्था**—जिल्ह्यांत ४ नगरपालिका असून आठ पूरपालिका आहेत व ४४८ स्वतंत्र ग्रामपंचायती आणि १०० गट ग्रामपंचायती आहेत. ग्रामपंचायतीचा कारभार सरपंच आणि उपसरपंच यांच्या मदतीनें चालविला जातो.

**शासकीय अर्थव्यवहार**—राज्यकारभारविषयक बाबींतील अर्थव्यवहार जिल्ह्याच्या परभणी येथें असलेल्या सरकारी ट्रेझरींतून होत असला तरी तालुका पातळीवरील लोकांची अधिक सोय व्हावी म्हणून तालुका पातळीवर सब् ट्रेझरींतून अर्थव्यवहाराचें काम चालू असतें. सरकारकडून जिल्ह्याला आलेला पैसा आणि जनतेकडून सरकारजमा व्हावयाचा पैसा असें दुहेरी काम या ट्रेझरींतून चालते. परभणी जिल्ह्यांत एकूण आठ सब् ट्रेझरीज् असून त्या सर्व जिल्हा ट्रेझरीच्या अधिकार क्षेत्राखालीं आहेत.

**पोलीस यंत्रणा**—कायदा आणि सुरक्षा यासाठीं जिल्ह्यांतील १०२५ पोलीस ग्रामीण भागाच्या पातळीपर्यंत कार्य करीत आहेत. परभणी येथें जिल्हा पोलीस प्रमुखांची कचेरी असून जिल्ह्यांतील पोलीस कार्याचें मार्गदर्शन जिल्हा पोलीस प्रमुख करतात. तालुका पातळीवर पोलीस स्टेशने ठेवण्यांत आलेलीं असून तेथें एक सब् इन्स्पेक्टर आणि त्याला मदतनीस पोलीस ठेवण्यांत आलेले आहेत. जिल्ह्यांत एकूण २७ पोलीस स्टेशनें आहेत.

**आऊट पोस्ट**—ग्रामीण भागांत जनतेच्या संरक्षणाकडे आणि सुव्यवस्थेकडे पाहण्याची गरज असल्यामुळें जिल्ह्यांत खेड्यांचा गट करून तेथें मध्यवर्ति ठिकाणीं एक आऊट पोस्ट पोलीस स्टेशन ठेवण्यांत आलें आहे. त्यांत एक हेड कॉन्स्टेबल आणि मदतनीस पोलीस असतात.

**न्यायदानाची व्यवस्था**—जिल्ह्यांतील जनतेची जमीन महसुलाबाबतच्या तक्रारींचे आणि गुन्हेगारींचे परिमार्जन करण्यासाठीं तालुका पातळीवर न्यायदानाची व्यवस्था करण्यांत आली आहे. न्यायदानाच्या व्यवस्थेत दोन विभाग असून जिल्हाधिकारी हे जिल्ह्याचे महसूल न्यायालयाचे, प्रमुख न्यायाधीश होत. न्यायदानाचे काम त्वरित व्हावें म्हणून तालुका पातळीवर न्यायालयाचे अधिकारी नेमण्यांत आलेले आहेत.

जिल्ह्यांतील तालुके आणि पेठा यांच्यासाठीं १० न्यायालयें असून तेथील अधिकाऱ्यास न्यायदानाचे अधिकार देण्यांत आलेले आहेत. तालुक्याचे मामलेदार अथवा महालकरी या न्यायालयाचे प्रमुख होत आणि त्यांच्यापुढें जमीनविषयक तंटे, कुळकायदा, आणि किरकोळ मतभेद, तंटे वगैरेबाबत खटले चालविण्यांत येतात. या न्यायालयांत **महसूल न्यायालयें** लागलेल्या निर्णयाबद्दल समाधान न पावलेल्या लोकांस परभणी येथील न्यायालयांत निवाडा लावून घेतां येतो. आणि त्यापुढें जिल्हाधिकाऱ्यास दाद मागता येते.

**दिवाणी आणि फौजदारी न्यायालय**— जनतेच्या दिवाणी आणि फौजदारी खटल्यांच्या निवाड्याचे काम त्वरित व्हावे म्हणून जिल्ह्यांत तालुका पातळीवर न्यायदानाची व्यवस्था करण्यांत आली आहे. या न्यायालयांत लागलेल्या निवाड्यानें जनतेंत समाधान झालें नाही तर जिल्हा न्यायालयांत जिल्हा न्यायाधीशापुढें दाद मागतां येते.

# पाटबंधारे व विद्युतपुरवठा

**पूर्णा धरण योजना**

ही १३.०५ कोटी रुपयांची प्रचंड व एकमेव योजना मराठवाडा विभागासाठीं दुसऱ्या पंचवार्षिक योजनेंत समाविष्ट करण्यांत आली आहे. पूर्णा नदीचा उगम औरंगाबाद जिल्ह्यांतील डोंगरांतून होतो. २५० मैलाचे नागमोडी वळसे घेऊन ही नदी गोदावरीस पूर्णा रेल्वे स्टेशन जवळ येऊन मिळते. ५८७० चौरस मैल भागांतील पाणी या नदीस मिळते. कन्नड तालुक्यांत बांधलेल्या एका छोट्या बंधाऱ्याशिवाय या नदीवर कोणतीहि पाणी पुरविण्यासंबंधीं योजना नाहीं. या नदीचा बराचसा भाग परभणी जिल्ह्यांत असून देखील ह्या भागांत पाण्याचा तुटवडा आणि दुष्काळ आढळतो.

या भागांतील लोकांचा जीवनदर्जा वाढविण्याचा एकमेव मार्ग म्हणजे पूर्णा धरण योजना हातीं घेणें हा होय. स्वातंत्र्यानंतर ह्या भागांतील जनतेनें पूर्णा धरण योजनेचा समावेश प्रथम पंचवार्षिक योजनेंत करण्याचा आग्रह धरला.

अंदाजे ५८१.७६ लक्ष रुपयांची ही योजना हैद्राबाद सरकारला ऑक्टोबर ५६ मध्यें सादर करण्यांत आली होती. त्यानंतर राज्यपुनर्रचनेमुळें ती मुंबई राज्यांत आली.

२८ जानेवारी १९५७ ला मुंबई सरकारने या योजनेस ५५५ लक्षांची मान्यता दिली. त्यानंतर योजनेची पुनश्च तांत्रिक तपासणी, व पुनर्रचना करण्यांत आल्यावर ही योजना अंदाजे १३०५ लक्ष रुपये खर्चाची झाली.

पूर्णा योजना ही जलपुरवठा व विद्युत् योजना असून योजनेंत खालील कामाचा अंतर्भाव होतो.

१ ) जिंतूर तालुक्यांत येलदरी येथील तलावाचे बांधकाम, ३४,१२९ दशलक्ष घनफूट जलसंचय व १५ हजार किलोवॅटस् वीज निर्मिणारी यंत्रसामुग्री स्थापणें.

२ ) हिंगोली तालुक्यांत सिद्धेश्वर येथें नदीच्या प्रवाहावर धरणाचें आणि कालव्यासाठीं लागणाऱ्या पाण्याच्या मुख्य दरवाजाचें बांधकाम आणि

३ ) सिद्धेश्वर धरणाच्या डाव्या बाजूने काढण्यांत येणारा ३४ मैल लांबीचा कालवा.

योजनेच्या आराखड्याप्रमाणें येलदरीस २९००० दशलक्ष घनफूट पाण्याचा वापर करून कमीत कमी ५,९०० व जास्तीत जास्त १५,००० किलोवॅटस् विद्युत शक्ती निर्माण केली जाईल. येलदरी येथील विद्युत् शक्ति केंद्रांतून सोडलेलें पाणी सिद्धेश्वर धरणामुळें अडविले जाऊन सिद्धेश्वर धरणाच्या डाव्या बाजूकडून काढलेल्या कालव्यानें सोडले जाईल. दर सेकंदास २,००० घनफूट पाणी

जाईल अशी या १२४ मैल कालव्याची रुंदी व उंची केली आहे. कालव्याखाली एकूण १,५२,००० एकर जमीन भिजेल.

या जलसिंचन योजनेच्या आराखड्याप्रमाणें सिद्धेश्वर धरण व कालवा ह्यास तीन वर्षें व येलदरी धरणास चार वर्षें लागतील. जलसिंचनाच्या भागासाठीं येणाऱ्या खर्चाचा आराखडा खालीलप्रमाणें आहे:—

| | | | |
|---|---|---|---|
| येलदरी धरण | ... | ... | ४३७.६३ लक्ष |
| सिद्धेश्वर धरण | ... | ... | २५७.३७ लक्ष |
| जलसिंचन कालवा ... | | ... | ६१०.०० लक्ष |
| | | एकूण | १३०५.०० लक्ष |

**छोटे पाटबंधारे**

मराठवाडा विभागांतील छोट्या पाटबंधाऱ्याच्या योजनांची पाहणी, संशोधन आणि बांधकाम करण्याप्रीत्यर्थ जून १९५८ मध्यें छोट्या पाटबंधाऱ्याच्या विभागाची स्थापना होऊन त्याचें मुख्य ठिकाण औरंगाबाद येथें ठेवण्यांत आलें. जानेवारी १९५९ मध्यें ह्या विभागाचा एक पोट विभाग सेलू येथें उघडण्यांत आला. दुसऱ्या पंचवार्षिक योजनेच्या काळांत खालील योजनांची पाहणी करण्यांत येऊन सरकारतर्फें त्यास मंजुरी दिली गेली.

| योजना | खर्च | पाण्याखालीं भिजणारी जमीन |
|---|---|---|
| कळमनुरी तलाव | १०,५१,५०० | २,००० एकर |
| झरी तलाव | ६,३१,५०० | १,२०० एकर |
| पिंपरखेडा | ७,१३,५०० | १,२०० एकर |

उपरिनिर्दिष्ट तीन योजनांपैकीं दोन योजनांचें काम हातीं घेण्यांत आलें असून त्यांच्या कार्यांत प्रगति होत आहे. आतांपावेतों ह्या दोन्ही तलावांचे काम ३.०० लक्ष रुपयापर्यंत झालें आहे.

**ग्रामीण वीजपुरवठा**

वीजपुरवठ्याच्या क्षेत्रांत दुसऱ्या योजनेच्या काळांत ग्रामीण वीज पुरवठ्याकडे लक्ष देण्यांत येऊन १९५८ सालीं हिंगोली शहरास वीजपुरवठा करण्यांत आला. त्यासाठीं हिंगोली येथें ५० किलोवॅट्स आणि ८० किलोवॅट्सची शक्ति असलेलीं दोन विजेचीं उत्पादन यंत्रें बसविण्यांत आलीं. ता. ११–५–५९ रोजीं परभणी शहरास विजेचा पुरवठा करण्यांत येऊन या ठिकाणी १०० किलोवॅटस्‌ची दोन आणि २०० किलोवॅटस शक्ति असलेले एक अशी एकूण तीन वीज उत्पादन केंद्रें उभारण्यांत आलीं. परभणी येथून ३३ किलोवॅटच्या २० मैल लांबीच्या विद्युत्‌वाहक तारा पूर्णेस नेऊन ता. १५–६–१९६१ रोजीं पूर्णा शहराचे विद्युतीकरण करण्यांत आलें. ता. २६–६–१९६१ रोजीं ३० किलोवॅट शक्ति असलेल्या एका वीज उत्पादन केन्द्राची उभारणी करून परतूर शहरास वीज पुरवठा करण्यांत आला. जिंतूर येथेहि ५० किलोवॅट शक्ति असलेलें एक वीज उत्पादन केंद्र उघडून जिंतूर तालुक्यास वीजपुरवठा करण्यांत येईल. नांदेडहून १२ किलोवॅट वीज वाहक तारा बसवून वसमतनगरला ता. ५–६–१९६१ पासून वीजपुरवठा करण्यांत आला. ह्या वीजपुरवठ्यामुळें उद्योगधंदे, शेतकरी व सर्वसामान्य जनता यांचा बराच फायदा झाला असून उद्योगधंद्याच्या प्रगतीस सहाय्य झालें आहे.

# द ळ ण व ळ ण व वा ह तू क

सडक बांधकामाच्या संबंधांत हा जिल्हा अतिशय अविकसित आहे. दूधना, पूर्णा, गोदावरी, पेणगंगा, कयाधू ह्या प्रमुख नद्या या जिल्ह्यांतून वाहत असून ह्या जिल्ह्यांतील बहुतेक जमीन काळी कपाशीची आहे. नागपूर धर्तीवरील या जिल्ह्याच्या सडक बांधणी कार्यक्रमानुसार राष्ट्रीय राजमार्गाची आणि जिल्ह्यांतील प्रमुख सडकांची लांबी ९०० मैल असून जिल्ह्यांतील प्रमुख सडकांची व ग्रामीण सडकांची लांबी १०९५ मैल आहे.

**सडका**

द्वितीय पंचवार्षिक योजनेच्या प्रारंभीं परभणी जिल्ह्यांतील सडकांची लांबी २०२ मैल होती. द्वितीय पंचवार्षिक योजनेमध्यें ३७३ मैल लांबीच्या सडकांचें काम हातीं घेण्यांत आलें. त्यापैकीं ९० मैलाचें काम पूर्ण झालें. याचाच अर्थ असा कीं, या कालावधींत २९३ मैल लांबीच्या सडका रहदारीस योग्य करण्यांत आल्या. परतूर वाटूर सडकेवरील दुधना नदीवर पूल बांधण्यांत आल्यामुळें तेथील रहदारीचा प्रश्न आपोआप सुटला. त्याबरोबरच वसमत परभणी सडकेवरील पूर्णा नदीवर आणि परभणी गंगाखेड सडकेवरील गोदावरी नदीवर दोन मोठ्या पुलांचें काम सुरू करण्यांत आलें.

तृतीय पंचवार्षिक योजनेंत १६० मैल लांबीच्या सडका तयार केल्या जातील. त्या पूर्ण होतांच औद्योगिक दृष्ट्या ह्या जिल्ह्याची भरभराट होण्यास चांगलीच मदत होईल.

**इमारत बांधकाम**


परभणी जिल्ह्यामध्यें कृषि विद्यालयाची इमारत पूर्ण करण्याचें काम हें महत्त्वाचें काम होय. कृषि विद्यालय हें मराठवाड्यांतील विद्यार्थ्यांसाठींच स्थापलें असून ह्या विद्यालयाच्या इमारतीच्या बांधकामाबरोबरच २५० विद्यार्थी राहूं शकतील अशी वसतिगृहाची इमारत बांधण्याचेंहि काम चालू झालें आहे. ह्या इमारतींप्रीत्यर्थ सुमारें ४५ लक्ष रुपये खर्चीं पडतील आणि त्या एक दोन वर्षांच्या कालावधींतच पूर्ण होतील अशी अपेक्षा आहे.

**नागपूर योजना**—पहिल्या पंचवार्षिक योजनेच्या काळांत परभणी जिल्ह्यांतील राष्ट्रीय राजमार्गाची आणि प्रमुख सडकांची लांबी अनुक्रमें १४२ व ५९ मैल होती. जिल्ह्यांतील इतर सडकांची आणि जिल्हा लोकल बोर्डातर्फे बांधल्या गेलेल्या सडकांची लांबी ५ मैल आहे. दुसऱ्या पंचवार्षिक योजनेच्या काळांत पुढील सडकांचे काम हाती घेण्यांत आलें:—

| | |
|---|---|
| १) परभणी गंगाखेड | २२ मैल |
| २) गंगाखेड ते परळी | १३ मैल |
| ३) परभणी गंगाखेड सडकेवरील गोदावरीचा पूल | |
| ४) सेलू-पाथरी | १४ मैल |

# दळणवळण व वाहतूक

रेल्वेमार्ग
मोटाररस्ते
▲ उरुस व यात्रास्थान
देवस्थान व यात्रास्थान




| | |
|---|---|
| ५) गंगाखेड-पालम-लोहा | २६ मैल |
| ६) परभणी-पाथरी | १५ मैल |
| ७) जालना-जिंतूर | ६ मैल |
| ८) सेलू माजलगांव | ५ मैल |
| ९) परभणी वसमत सडकेवरील पूर्णा नदीवरचा पूल | |
| १०) परभणी वसमत | २७ मैल |
| ११) वाटूर परतूड | ९ मैल |
| १२) हिंगोली औंढा | १४ मैल |
| १३) कळमनुरी-सांबरपिंपरी | ९ मैल |
| १४) नांदेड ते पूर्णा | १० मैल |
| १५) हट्टा-नागेशवाडी | १४ मैल |

उपरोक्त सडकांचें बांधकाम सुरू असून परभणी गंगाखेड सडकेचें १३ मैलापर्यंतचें काम पूर्ण झालें आहे. सेलू-पाथरी सडकेचें काम संपत आलें असून गंगाखेड पालम लोहा सडकेचें काम पूर्ण झालें आहे. परभणी पाथरी सडकेचें काम ९ मैलापर्यंत पूर्ण झाले असून पूर्णा नदीवरील काम प्रगतिपथावर आहे. जालना जिंतूर सडकेचे काम पूर्ण झालेले आहे. कळमनुरी सांबरपिंपरी काम व नांदेड पूर्णा सडकेचें कामहि ३ मैलापर्यंत पूर्ण झाले आहे.तसेच हट्टा नागेशवाडी सडकेचे कामहि ३ मैलापर्यंत पूर्ण झालें आहे. इतर कामें शीघ्रगतीनें पूर्ण करण्यांत येत आहेत.

जिल्हा लोकल बोर्डातर्फे दुसऱ्या योजनेच्या काळांत १९५९-६० ह्या वर्षांत खालील सडकांचीं कामें हातीं घेण्यांत आलीं होतीं.

| | |
|---|---|
| १) पाटोदा ते मंठा सेलू | २) चिकलठाणा-जिंतूर-मंठा |
| ३) पेडगांव रेल्वे स्टेशन | ४) पेडगांव आबादी |
| ५) पेडगांव रेल्वे स्टेशन ते जांब | ६) रावरापूर ते गंगाखेड पालम |
| ७) वसा-जिंतूर-औंढा | |

१९६०-६१ मध्यें बोर्डाने खालील रस्त्यांचीं कामें हातीं घेतली होती.

| | |
|---|---|
| १) पिंगळी ते ताडलिंबा | २) लिंबा ते वझूर |
| ३) मिरखेल ते वरपूड | ४) आडगांव ते जिंतूर औंढा |
| ५) गिरगांव ते वसमत नांदेड | ६) क्रांडली ते नांदेड हिंगोली |
| ७) कुर्तडी ते नांदेड हिंगोली | ८) आजळे ते बांगतपुरी |
| ९) लाड नांद्रा ते डासाळा | १०) लाड नांद्रा ते ब्राम्हणवाडी |

यापैकी ७ रस्त्यांची बांधकामें पूर्ण झालीं आहेत. जिल्हा लोकल बोर्ड १ मे १९६२ पासून बरखास्त झाल्यामुळें बाकीचीं कामें जिल्हा परिषदेतर्फे करण्यांत येतील.

**रेल्वेमार्ग**—ह्या जिल्ह्यांत पुरेशी रेल्वे वाहतुकीची साधनेहि उपलब्ध नाहींत.

सेंट्रल रेल्वेचा मीटर गेजचा मनमाडपासून काचीगुडा (हैद्राबाद) पर्यंतचा सुमारे ६१ मैलांचा मार्ग ह्या जिल्ह्यांतून जातो. तसेच पूर्णा अकोला रेल्वेचा ९२ मैलांचा मार्ग आणि परभणी परळी हा २२ मैलांचा मार्ग याच जिल्ह्यांतून जातो.

# सामुदायिक प्रयत्न -- वैयक्तिक लाभ

हैद्राबाद को–ऑपरेटिव्ह सोसायटीचा १९१४ चा कायदा मंजूर झाल्यानंतर ह्या जिल्ह्यांत सहकारी पतपेढ्या स्थापन करण्यांत आल्या आणि सेन्ट्रल बँका उघडण्यांत आल्या. परंतु अगदीं अलीकडच्या काळापर्यंत भांडवलाचा तुटवडा, प्रचाराचा अभाव आणि योग्य अशा नेतृत्वाची उणीव यामुळें या योजनेच्या वाढीसाठीं पुरेशी चालना मिळू शकली नाहीं. आर्थिक सहाय्याची योजना म्हणून कर्ज देण्याचें कार्य प्रामुख्यानें चालू आहे. शेतकऱ्यांना दीर्घ मुदतीचीं कर्जे देण्यासाठीं परभणी येथें एक लँड मॉर्गेज बँकदेखील स्थापन करण्यांत आली आहे.

दुसऱ्या पंचवार्षिक योजनेच्या काळांत रिझर्व बँक ऑफ इंडियाच्या ग्रामीण पत पाहणी अहवालांतील शिफारशीनुसार सहकारी संस्थांच्या भांडवली शक्तीचा आणि कार्याचा विकास राज्य सरकारकडून करण्याचें योजण्यांत आले. तसेंच ग्रामीण जनतेची शक्य तेवढी मोठी संख्या यामध्यें सामील व्हावी या दृष्टीनें राज्य सरकारने **शेतकी पतपेढ्या** यांत भाग घेऊन सहकारी संघटनांची भांडवल उभारणी केली. त्यानुसार या जिल्ह्यांत २६ विविधोपयोगी सोसायट्या स्थापन करण्यांत आल्या. तसेच या जिल्ह्यांत १०८ छोट्या सोसायट्या स्थापन करण्यांत आल्या. याशिवाय सेन्ट्रल को–ऑपरेटिव्ह बँकेच्या ५ शाखा जिल्ह्यांतून उघडल्या गेल्यामुळें शेतकऱ्यांना शेतीच्या कामासाठीं लागणारा पैसा, स्वस्त व्याजाच्या दरानें मिळण्याची उत्कृष्ट सोय झाली आहे. उपरिनिर्दीष्ट सहकारी शेतकी पतपेढ्या आणि विविध सहकारी कार्यकारी संस्था या जिल्ह्यांत स्थापन केल्या गेल्यामुळें शेतकऱ्यांची आर्थिक विवंचना मोठ्या प्रमाणांत दूर झाली असून त्यामुळें त्यांना शेतीपासून अधिक धान्योत्पादन करण्याच्या कामीं उत्कृष्ट मदत झाली आहे.

सध्यां परभणी जिल्ह्यांतील सहकारी संस्थांची संख्या खालीलप्रमाणे आहे.

## परभणी जिल्ह्यांतील सहकारी संस्थेचा विस्तार

| संस्थेचें नांव | वर्ष | | |
|---|---|---|---|
| | १९५८–५९ | १९५९–६० | १९६० ६१ |
| **अ) भांडवल पुरवठा करणाऱ्या संस्था** | | | |
| १) परभणी जिल्हा सहकारी बँक लि. | १ | १ | १ |
| २) शेतकी सहकारी पतपेढ्या, विविध कार्यकारी संस्था व सेवा सहकारी संस्था | ६४६ | ९१८ | ९५९ |

| संस्थेचें नांव | वर्ष | | |
|---|---|---|---|
| | १९५८–५९ | १९५९–६० | १९६०–६१ |
| ३) लँड मॉर्गेज सोसायटी | १ | १ | १ |
| ४) अर्बन बँका | ४ | ४ | ३ |
| ५) पगारदार नोकरांच्या सोसायट्या | ६ | ८ | १० |
| ६) धान्य कोठारे | ३५९ | ३२३ | २९८ |
| **ब) सहकारी माल विक्रीच्या संस्था** | | | |
| १) सेल सोसायटी | १ | १ | १ |
| २) मल्टी परपज् ( नॉन ॲग्रिकल्चर ) | १ | १ | १ |
| ३) तालुका सहकारी मार्केटिंग सोसायट्या | ७ | ७ | ७ |
| ४) परभणी जिल्हा सहकारी मार्केटिंग सोसायटी | १ | १ | १ |
| ५) प्रक्रिया करणाऱ्या संस्था | २ | २ | २ |
| **क) शेतकऱ्यांच्या इतर संस्था** | | | |
| १) संयुक्त सहकारी शेती संस्था | – | १ | २ |
| २) बेटर लिव्हिंग सोसायट्या | ५ | १ | १ |
| ३) तालुका को–ऑपरेटिव्ह असोसिएशन | १ | १ | – |
| **ड) सहकारी उत्पादक सोसायट्या** | | | |
| १) विणकर सोसायट्या | ६ | ८ | १० |
| २) मजुरांच्या सोसायट्या | ४ | ८ | ८ |
| ३) इतर उत्पादक सोसायट्या | ३९ | ५३ | ७३ |
| **इ) इतर सहकारी संस्था** | | | |
| १) हौसिंग सोसायट्या | ४ | ५ | ६ |
| २) ग्राहकांच्या सोसायट्या | – | १ | २ |
| ३) गोरक्षण सोसायटी | १ | १ | १ |
| ४) मोटार ट्रान्सपोर्ट सोसायटी | १ | १ | १ |
| **फ) फेडरल संस्था** | | | |
| १ ) तालुका सुपरवायझिंग युनियन्स लि. | ८ | ८ | ८ |
| २ ) डिस्ट्रिक्ट को–ऑपरेटिव्ह बोर्ड | १ | १ | १ |
| ३ ) डिस्ट्रिक्ट को–ऑपरेटिव्ह इंडस्ट्रियल असोशिएशन | – | १ | १ |

**पतवाढ योजना**

सहकारी पद्धतीनें कर्जपुरवठा करणाऱ्या क्षेत्रांत सहकारी पतपेढ्या व सेवा सहकारी संस्था भरीव कार्य करीत असून शेतकऱ्यांच्या आर्थिक जीवनाचा त्या एक अविभाज्य भाग होऊन बसल्या आहेत. या संस्थांची संख्या ९५९ पर्यंत गेली आहे. त्यापैकीं मोठ्या आकाराच्या २५ विविध कार्यकारी संस्था, ७६ सहकारी पतपेढ्या, १९४ लहान आकाराच्या विविध कार्यकारी संस्था व ६६४ सेवा सहकारी संस्था आहेत. या संस्थांनीं १३५४ खेडीं व्यापलीं आहेत.

द्वितीय पंचवार्षिक योजनेच्या काळांत या संस्थांनीं शेतकऱ्यांना एकंदर रु. १३०.९४ लाख अल्प मुदतीचें कर्ज म्हणून वाटलें. पूर्वीची कर्ज-पद्धति (शेतसाऱ्याच्या प्रमाणावर) बदलली व ती पीक-कर्ज म्हणून ठेवण्यांत आली. सध्यां बँकेनें खालीलप्रमाणें पीक-कर्जाचें प्रमाण ठेवलें आहे. त्यामुळें सर्व सामान्य शेतकऱ्यांना त्याला लागणारा कर्जपुरवठा भरपूर प्रमाणांत मिळावयास लागला. त्याचप्रमाणें खत, सुधारलेली बी-बियाणीं व अवजाराकरितां लागणारी रक्कमहि त्यांना देण्यांत येऊं लागली.

ग्रामीण पत-पाहाणी समितीच्या शिफारसीनुसार रिझर्व बँकेनें सर्व जिल्हा मध्यवर्ति सहकारी बँकांना व्याजाचा दर कमी करण्यास सांगितला व याचाच परिणाम म्हणजे योजनेपूर्वी जी रक्कम शेतकऱ्यांस रु. ९-३७ व्याजानें देण्यांत येत होती तिचा व्याजाचा दर रु. ७-८१ ठेवण्यांत आला.

**भूतारण संस्थेचें कार्य**

योजनेस प्रारंभ होण्यापूर्वीच्या काळांत शेतकऱ्यास फक्त अल्प मुदतीचीं कर्जें देण्यांत येत होतीं. परंतु या बरोबरच त्यांना जमिनीची सुधारणा करण्याकरितां, इंजिनें घेण्याकरितां, विहिरी खोदण्याकरितां लांब मुदतीचीं कर्जें देण्यास सुरुवात झाली. याकरितां परभणी येथें भू-तारण संस्था स्थापन करण्यांत येऊन तिची नोंदणी करण्यांत आली व योजनेच्या अखेरपर्यंत या संस्थेनें १८.६६ लक्ष रु. कर्ज शेतकऱ्यांस वरील निरनिराळ्या बाबींकरितां दिलें. शेतकऱ्यांनीं शेती सुधारून शक्य तितकें अधिक धान्य पिकवावें आणि देशाला सतत भेडसावणारा अन्न प्रश्न सोडविण्यांस भरीव मदत करावी या हेतूनें सरकारनें स्वातंत्र्योत्तर काळांत सतत प्रयत्न चालविले आहेत. शेतकऱ्यांना या कामीं भांडवलाची सतत अडचण भासत असते हें लक्षांत घेऊन सरकार शेतीच्या निरनिराळ्या कामासाठीं सवलतीच्या व्याजाच्या दरानें तगाई रूपानें कर्जवांटप करतें. ही तगाई अनेक कारणाकरितां म्हणजे बैल विकत घेणें, शेतीचीं अवजारें विकत घेणें, विहीर खुदाई व दुरुस्ती-करणें, एंजिनें व पंपिंग सेटस् विकत घेणें इ. साठीं वाटली जात असते. यापैकीं विहीर खुदाई व दुरुस्तीसाठीं आणि एंजिनें वगैरे विकत घेण्यासाठीं तगाई वाटण्याचें कार्य लँड मॉर्गेज बँका सन १९५८ पासून करीत आहेत.

**विहीर-तगाई योजना**

**नवीन विहिरीसाठीं तगाई**—या योजनेप्रमाणें एका अर्जदारास नवीन विहीर खोदण्यासाठीं आणि ती बांधण्यासाठीं जास्तींत जास्त रु.२५०० पर्यंत तगाई कर्ज मिळूं शकते. या कर्जास व्याजाचा दर द. सा. द. शें. रु. ४॥ असून तें सारख्या १० वार्षिक हप्त्यांनीं फेडावयाचें आहे. विहिरीचें बांधकाम पूर्ण करून ती उपयोगांत आणल्यास, ती विहीर बांधण्यास आलेल्या खर्चाच्या २५ टक्के रक्कम अर्जदारास मदत म्हणून मिळते. मात्र अशी मदतीची रक्कम जास्तींत जास्त रु. ५०० पर्यंतच आहे. शिवाय ही रक्कम अर्जदारास रोख पैशाच्या स्वरूपांत न देतां ती त्याचे कर्ज खात्यांत जमा करण्यांत येऊन तेवढ्या रकमेची त्यास कर्जात सूट मिळते.

**जुन्या विहिरींसाठीं तगाई**—जुन्या विहिरीची दुरुस्ती करण्यासाठीं देखील तगाई कर्ज मिळते. मात्र हें कर्ज जास्तीत जास्त रु. १००० पर्यंतच मिळते आणि या कर्जास मदत मिळत नाहीं. व्याजाचा दर मात्र येथेंहि द. सा. द. शें. ४॥ असून परतफेड सारख्या १० वार्षिक हप्त्यांनीं करावी लागते.

या योजनेनुसार नवीन ऑईल एंजिन–इलेक्ट्रिक मोटारपंपिंग सेट इ. विकत घेण्यासाठीं एका अर्जदारास जास्तीत जास्त रु. ४००० पर्यंत कर्ज मिळूं शकतें. या कर्जास व्याजाचा दर द. सा. द. शे. ४½ असून ते सारख्या १० वार्षिक हप्त्यांनीं फेडावयाचें आहे.

**एंजिन तगाई योजना**

याहि कर्जास मदत मिळत असून ती एंजिन–इलेक्ट्रिक मोटर–पंपिंग सेट इ. विकत घेऊन तें बसविण्याच्या कामी झालेल्या खर्चाच्या २५ टक्के किंवा जास्तींत जास्त रु. ८०० इतकी मिळते. मात्र या योजनेनुसार अर्जदारानें १) सरकार-मान्य कंपनीची सरकारी मान्यता असलेलीच नवीन एंजिने–इले.मोटर्स–पंपिंग सेटस् इ. विकत घेतली पाहिजेत. २) जुने एंजिन–इले. मोटर्स–पंपिंग सेटस इ. विकत घेण्यासाठीं या योजने-नुसार तगाई रूपाने कर्ज मिळत नाहीं.

नॅशनल डेव्हलपमेंट कौन्सिलच्या शिफारशीनुसार या जिल्ह्यांत सेवा सहकारी संस्था स्थापन करण्याकडे विशेष लक्ष दिलें व आतांपर्यंत ६६४ सेवा सहकारी संस्था स्थापन करण्यांत आल्या आहेत.

**सेवा सहकारी संस्था**

या संस्था उत्पादनाकरितां कर्ज पुरवठा करतात. त्याशिवाय शेतीउपयोगी वस्तूंचे वाटप, शेतकऱ्यांच्या मालाचा साठा व त्यांच्या विक्रीची सोयही करीत आहेत. कांहीं संस्थांनी बी–बियाणें, खतें व साखर वितरणाचे कार्यास आरंभ केला आहे.

**सहकारी घरबांधणी संस्था**—अशा प्रकारच्या सहा संस्था या जिल्ह्यांत आहेत. त्यापैकीं सेलू येथें एक मागासलेल्या जातींच्या लोकाकरितां स्थापन झाली आहे. आतांपर्यंत या संस्थे-मार्फत २८ घरें बांधण्याचें काम पूर्ण झालें आहे व ४८ घरें बांधणीचें काम सुरू आहे. त्याचप्रमाणें ४५ घरें बांधण्याचें काम मागासलेल्या जातींतील संस्थेनें सुरू केलें आहे व याकरिता सरकारने या संस्थेस रु. ४५,००० कर्ज रूपानें मदत केली आहे. वरील विवेचनावरून असें दिसून येईल कीं, शहरी वस्तींत घर टंचाईचा व तो बांधणीचा भेडसावणारा प्रश्न वरील संस्थेने अल्पशा प्रमाणांत कां होईना सोडविण्याचा प्रयत्न केला आहे.

**सहकारी मार्केटिंग सोसायट्या**—कर्जपुरवठ्याबरोबरच शेतकऱ्याने उत्पादन केलेल्या मालास जास्तीत जास्त किंमत मिळवून देण्याच्या उद्देशानें व शेती उपयोगी वस्तूंचा पुरवठा करण्या-करितां या संस्था द्वितीय पंचवार्षिक योजनेच्या काळांत स्थापन झाल्या. शेतकऱ्याच्या मालाची सह-कारी यंत्रणेद्वारा विक्री करून देण्याचा उपक्रम कांहीं संस्थानीं नुकताच सुरू केला आहे. या जिल्ह्यांत अशा प्रकारच्या ८ संस्था आहेत त्यापैकीं एकीचें कार्यक्षेत्र सबंध जिल्ह्यांत असून उरलेल्या सात संस्थांचें कार्यक्षेत्र तालुक्यापुरते आहे.

**मार्केट कमिटी**—शेतीच्या माल विक्रीच्या दृष्टीनें नियंत्रित बाजारपेठांची फारच उप-युक्तता आहे. दुसऱ्या पंचवार्षिक योजनेच्या अखेरीस या जिल्ह्यांत नऊ नियंत्रित बाजारपेठा होत्या. खरेदी विक्री व्यवहारावर मार्केट कमेटीचें नियंत्रण असल्यामुळें शेतकऱ्याची वजन–मापांत फसवणूक होत नाहीं. त्याचप्रमाणें मार्केट कमिट्या वेळोवेळीं बाजारभाव जाहीर करींत असल्यामुळेंहि शेत-कऱ्यांच्या मालास चांगला भाव मिळण्यास मदत झाली आहे.

योजनेच्या काळांत या जिल्ह्यांत ३ संयुक्त सहकारी संस्था स्थापन झाल्या. या संस्थांच्या कार्यक्षेत्रांत येणाऱ्या जमिनीपैकीं २७९ एकर जमीन लागवडीस आणली गेली आहे. त्याचप्रमाणें गिरगांव येथील संस्थेस सरकारनें रु. ४ हजार भांडवल म्हणून दिलें आहे.

**सहकारी शेती संस्था**

जी वैयक्तिक पडीक जमीन लागवडीस आणणें शक्य झालें नसतें अशी जमीन गिरगांव संस्थेनें लागवडीखालीं आणली. तिची यशस्वी कार्यपद्धति पाहून दोन नवीन संस्था निर्माण झाल्या व जिल्ह्यांत याबाबत चैतन्याचें वातावरण निर्माण झालें आहे.

देशाचा बिकट अन्न प्रश्न सुटावा व देश अन्नाच्या बाबतींत स्वयंपूर्ण व्हावा म्हणून भारत सरकारनें सहकारी शेतीच्या ठरावाद्वारें भारतीय शेतकऱ्यांना सहकारी शेती करण्याचें आवाहन केलें आहे. त्यांनीं केलेलें आवाहन शिरसावंद्य मानून भारतांतील प्रत्येक राज्यामध्यें सहकारी शेतीच्या प्रयोगास प्रारंभ झाला. त्यानुसार परभणी जिल्ह्यांतील पहिली सहकारी शेती संस्था दि. ३०-१२-१९५९ रोजीं रजिस्टर्ड झाली. संस्थेचें कार्यक्षेत्र गिरगांवपुरतेंच मर्यादित असून सध्यां १६ सभासद आहेत आणि जमिनीचें क्षेत्रफळ २०६ एकर ३ गुंठे आहे. ह्यापैकीं लागवडीखालील जमीन १७५ एकर आहे. त्यापैकीं प्रथम अवस्थेंत बागायत क्षेत्र ११ एकर होतें व आज १४ एकर आहे. बाकीचें जिरायत क्षेत्र आहे.

**गिरगांव शेती सहकारी संस्था**

संस्था स्थापन होण्यापूर्वीं सभासदांकडून त्यांच्या क्षेत्रफळाच्या प्रमाणें नगदी एकरी १० रु. शेअर्स व प्रवेश फी प्रत्येकी १ रु. घेण्यांत आली. अशा रीतीनें एकंदर पैशाच्या रूपानें ५०० रु. भाग भांडवल जमविण्यांत आलें. सभासदांकडून शेतीच्या अवजाराच्या रूपानें ७०१ रु. व जनावराच्या रूपानें ४,००० रु. भाग भांडवल जमविण्यांत आलें. ह्या भांडवलावर सरकारकडून ४,००० रु. शेअर भांडवल मिळालें. नवीन सभासदांकडून ५० रु. भाग घेण्यांत आल्यानें सध्यां संस्थेचें एकूण भांडवल ९,२५१ रु. आहे.

**भाग भांडवल**

**बँक कर्ज व कॅश क्रेडिट:**—परभणी जिल्हा मध्यवर्ति सहकारी बँकेनें आतापर्यंत संस्थेस अल्पमुदतीचें कर्ज ५,००० रु. दिलें. व ४,००० रुपयांचें खास मुदतीचे कॅश क्रेडिट मंजूर करण्यांत आलें. वरील दोन्हीं कर्जांची फेड संस्थेनें शेतीच्या माल विक्रीवर केली. संस्थेचा व्यवहार चालविण्यासाठीं वेळोवेळीं अनामत रूपानें सभासदांकडून ३४०० रुपये घेण्यांत आले व त्याची परतफेड करण्यांत आली.

संस्थेच्या शेतीच्या कामास व व्यवहारास २७ जानेवारी १९६० पासून सुरुवात झाली.

शेतकऱ्यांच्या मालाची विक्री सहकारी यंत्रणेमार्फत होणें जरूरीचें आहे पण त्याचबरोबर त्या मालाचें पूलिंग केले तर तो अधिक किफायतशीररीतीनें विकला जातो. शिवाय यांत मालाची शास्त्रशुद्ध प्रतवारी लावण्याची सोय करतां येते. त्या दृष्टीने या जिल्ह्यांत कापसावर प्रक्रिया करण्याकरितां २ संस्था निर्माण झाल्या आहेत. या संस्थेचें भाग भांडवल रु. २,३८,२८० असून त्यापैकीं सरकारचें भांडवल ६० हजार रुपये आहे. वैयक्तिक सभासद संख्या २,७९५ असून सोसायट्यांची सभासद संख्या ११४ आहे. वरीलपैकीं हिंगोली सोसायटीनें गेल्या वर्षीं ६४१ पल्ले कापूस जीनिंग केला त्याचप्रमाणें रु. ४,१४,०३८ किंमतीचा ३७८२ पल्ले कापूस विकत घेतला. याप्रमाणें तेथील शेतकऱ्यांना कापसाला चांगल्या प्रकारें भाव मिळाला. त्यापैकीं खालील कांहीं उदाहरणें उल्लेखनीय आहेत.

**सहकारी प्रक्रिया सोसायट्या**

( १ ) श्री. देवराव अण्णा केन्द्रे, व्हाईस चेअरमन, जिल्हा विकास मंडळ, परभणी यांनी कापसाचा भाव रु. १०५ असतांना ७२ पल्ले कापूस सोसायटीकडे दिला. तोच कापूस जीन करून विकल्यानंतर त्यास रु. १३१ पल्ल्याप्रमाणें भाव मिळाला.

( २ ) श्री. दाजीबा हिवरेकर यांचाहि ३६ पल्ले कापूस रु. ११० पल्ला याप्रमाणें विकला गेला. त्यावेळेस बाजार भाव रु. १०८ च्या आसपास होता.

( ३ ) सदना सहकारी सेवा संस्थेनें पाठविलेल्या कापसास सरासरी रु. ११६ पल्ला भाव पडला.

यावरून असें दिसून येईल कीं, सोसायटीनें कापूस घेऊन तो जीन करून विकल्यानंतर त्यांस चांगल्या प्रकारें भाव आला. या गोष्टीचा येथील शेतकऱ्यांवर चांगला परिणाम झालेला आहे व यावर्षी वरील दोन्हीहि संस्था स्वतःच्या मालकीच्या जीनिंग फॅक्टऱ्या सुरू करणार आहेत व त्या दृष्टीनें प्रयत्न चालू आहेत.

ग्रामीण पत पाहणी समितीच्या मुख्य शिफारशी लक्षांत घेऊन खात्यानें जो द्वितीय पंचवार्षिक योजनेचा कार्यक्रम आखला त्या अनुरोधानें परभणी जिल्ह्यांकरितां कांहीं अिष्टांक ठरविला होता. ही योजना यशस्वी होण्याकरितां हिरिरीनें प्रयत्न केला गेला व द्वितीय पंचवार्षिक योजनेंत जी प्रगति झाली व जें आर्थिक सहाय्य मिळालें त्याचा संक्षिप्त आढावा खालीलप्रमाणें आहे:—

## शेतकी पतवाढ योजना

खालील प्रकारची मदत सरकारकडून मिळाली.

| | रु. |
|---|---|
| जिल्हा सहकारी मध्यवर्ति सहकारी बँकेस शेअर भांडवलासाठीं | ४,५०,००० |
| जिल्हा मध्यवर्ति सहकारी बँकेस खर्चासाठीं अनुदान | ३७,३२५ |
| २१ मोठ्या आकाराच्या विविध कार्यकारी सोसायट्यांचे शेअर भांडवलासाठीं | ११,४०० |
| २४ मोठ्या आकाराच्या विविध कार्यकारी सोसायट्यांना सेक्रेटरीच्या खर्चासाठीं अनुदान | २१,००० |
| ४०० सेवा सहकारी सोसायट्यांना सेक्रेटरीच्या खर्चासाठी अनुदान | २,५८,६०० |
| भूतारण सहकारी संस्थेस खर्चासाठीं अनुदान | ४,३७५ |

## सहकारी मार्केटिंग संस्था

| | |
|---|---|
| ५ मार्केटिंग सोसायट्यांना शेअर भांडवल | ६५,७०० |
| २ मार्केटिंग सोसायट्यांना खर्चासाठीं अनुदान | २,००० |
| ३ मध्यम आकाराचे गोदामाकरितां खर्च | १५,००० |
| ,, ,, ,, अनुदान | ५,००० |
| ३९ लहान आकाराच्या गोदामाकरितां खर्च | ९०,००० |
| ,, ,, ,, अनुदान | ३०,००० |

## शेतकी सहकारी संस्था

| | |
|---|---|
| संयुक्त सहकारी संस्थेस शेअर भांडवल | ४,००० |
| ,, ,, ,, | ३,२०० |

## ग्रेन डेपो

| | |
|---|---|
| मागासलेल्या जातीसाठीं ९ ग्रेन डेपोसाठीं कर्ज | ३६,००० |

## घरें बांधणाऱ्या संस्था

| | |
|---|---|
| जिल्ह्यांत जिंतूर व हिंगोली येथील दोन जीनिंग प्रेसिंग सोसायट्यांना सरकारी भाग भांडवल | ६०,००० |

## घरें बांधणाऱ्या संस्था

| | |
|---|---|
| ४ लो इन्कम ग्रुप हौसिंग सोसायट्यांना कर्ज | २,४७,११२ |
| एका मागासलेल्या जातीच्या संस्थेस सरकारी कर्ज | ४५,००० |

## मार्केट कमिटी

| | |
|---|---|
| मार्केट कमिटी खर्च | १०.००० |
| मार्केट कमिटी अनुदान | १६,७५० |

## औद्योगिक सहकारी संस्था

| | |
|---|---|
| या योजनेखालील निरनिराळ्या बाबींवर द्वितीय पंचवार्षिक योजनेच्या अखेरीस खर्च झाला. | १,८९,२१८ |

# ग्रा मी ण वि का स

लोकांमध्यें उत्साह निर्माण करून जनकल्याणाच्या कार्यासाठीं त्यांना प्रवृत्त करणें व पंचवार्षिक योजना यशस्वी करणें हें स्थानिक विकास कार्यक्रमामागील मूलभूत तत्त्व होय. स्थानिक विकास कार्यक्रमानुसार ग्रामीण पाणीपुरवठा, लहान लहान पाटबंधारे, बांध, जोडरस्ते, लहान पूल, सार्वजनिक उपयोगाची कामें, धर्मशाळा, वाचनालयें, व्यायामशाळा अशा प्रकारचीं कामें करण्यांत येतात.

पहिल्या पंचवार्षिक योजनेच्या काळांत परभणी जिल्ह्यांत निरनिराळ्या ठिकाणीं स्थानिक विकासाचीं ७१ कामें पूर्ण करण्यांत आलीं तर दुसऱ्या योजनेंत ३७ कामें पूर्ण करण्यांत आलीं. या कामामध्यें प्राथमिक शाळांच्या इमारती, चावड्या, पिण्याच्या पाण्याच्या विहिरी, वाचनालयें, दवाखाने. रस्ते इत्यादींचा अंतर्भाव होता.

**ग्रामपंचायती**—ग्रामीण विकास कार्यक्रमांच्या अंमलबजावणीसाठीं खेड्यांत पंचायत असणें जरूर आहे व त्या दृष्टीनें ग्रामपंचायतींना दिवसेंदिवस वाढतें महत्त्व प्राप्त होत आहे. पहिल्या पंचवार्षिक योजनेच्या काळांत जिल्ह्यांत एकूण ५१ ग्रामपंचायती होत्या तर दुसऱ्या पंचवार्षिक योजनेंत ग्रामपंचायतींच्या संख्येंत मोठ्या प्रमाणांत वाढ झाली. आतां परभणी जिल्ह्यांत एकूण १२६४ ग्रामपंचायती कार्य करीत आहेत.

परभणी येथें १–८–१९५६ पासून समाज विकास शिक्षणाच्या सहा महिन्यांच्या अभ्यासक्रमाकरितां समाज विकास शिक्षण केंद्र कार्य करीत होतें व त्यासच जोडून १–११–१९५६ पासून शेतकी विषयक एक वर्षाच्या अभ्यासक्रमाची संस्था येथेंच काम करीत होती. ह्या दोन्हीं संस्था १–१०–५९ रोजीं बंद करण्यांत येऊन त्यांच्या ऐवजी ग्रामसेवकांना शिक्षण देण्याकरितां दोन वर्षाचा अभ्यासक्रम असलेलें ग्रामसेवक प्रशिक्षण केंद्र सुरू करण्यांत आलें. परभणी येथून एक वर्षाचा शिक्षणक्रम घेऊन उत्तीर्ण झालेल्या विद्यार्थ्यांची संख्या २९७ होती. तसेंच सहा महिन्याचा समाज विकास शिक्षणाचा अभ्यासक्रम पुरा करून एकुण ४३५ विद्यार्थी उत्तीर्ण झाले.

**परभणी येथील ग्रामसेवक प्रशिक्षण केंद्र**

सहा महिन्यांच्या समाज विकास शिक्षणाच्या कोर्सप्रमाणें शेतकी शिक्षण घेतलेल्या विद्यार्थ्यांना ( १ ) समाज विकास योजना ( २ ) विकास कार्याचे मार्ग ( ३ ) समाज शिक्षण ( ४ ) सार्वजनिक आरोग्य ( ५ ) सहकार ( ६ ) ग्रामीण स्थापत्य शास्त्र ( ७ ) ग्रामीण उद्योगधंदे या सारख्या विषयाचें शिक्षण दिलें जातें.


तसेंच ग्रामसेवकांना दोन वर्षाच्या अभ्यासक्रमाप्रमाणें शेती व समाज विकास या दोन्ही बाजूंचें संकलित शिक्षण देण्यांत येते व त्यांना ( १ ) शेती ( २ ) फळबागाईत व पीक संरक्षण

( ३ ) जनावरांची जोपासना ( ४ ) सहकार ( ५ ) पंचायत ( ६ ) सार्वजनिक आरोग्य ( ७ ) समाज शिक्षण ( ८ ) विकास, विस्तार, तत्वे व योजना ( ९ ) ग्रामीण स्थापत्य शास्त्र ( १० ) ग्रामीण उद्योगधंदे हे विषय शिकविले जातात. हें शिक्षण शाळागृहांत, संस्थेच्या शेतीवर व खेडेगांवांत शेत-कऱ्यांच्या शेतांत जाऊन अशा तीन मार्गांनी दिलें जाते. २१ महिन्यांचा असा शिक्षणक्रम झाल्यावर विद्यार्थ्यांची अंतिम परीक्षा घेण्यांत येते व नंतर दोन अडीच महिने त्यांना खेडेगांवांत ग्रामसेवकांचें प्रत्यक्ष काम शिकवण्याकरितां पाठविण्यांत येते. त्यानंतर अर्धा महिना त्यांच्या शिक्षणाचा आढावा घेऊन ग्रामसेवक म्हणून त्यांची नेमणूक करण्यांत येते.

ग्रामसेवकांस सहा महिन्याच्या शिक्षणक्रमाकरितां द. म. रु. ५० व दोन वर्षांच्या शिक्षण-क्रमाकरितां द. म. रु. ४० विद्यावेतन दिलें जाते. जे सरकारी नोकर आहेत त्यांना त्यांचा पगार देण्यांत येतो व द. म. रु. २५ विद्यावेतन देण्यांत येते.

ग्रामसेवकांच्या प्रात्यक्षिक कामाकरितां विद्यार्थ्यांना परभणी, जिंतूर, हिंगोली व पाथरी ब्लॉक विभागांत नेण्यांत येते व विकास अधिकारी आणि केन्द्राचा अध्यापक वर्ग यांच्या संयुक्त देखरेखीखाली हें प्रात्यक्षिक शिक्षण देण्यांत येतें.

# समाज विकास


पूर्व विस्तार गट
प्रथमावस्था गट
सामूहिक विकास गट
तालुक्याचे मुख्य ठिकाण
हिंगोली
कळमनुरी
जिंतूर
परतूड
बसमत
परभणी
पाथ्री
गंगाखेड

# स मा ज वि का स

स्वातंत्र्यप्राप्तीनंतर देशाच्या नवनिर्मितीच्या योजना तयार होऊं लागल्या. शेतीप्रधान व बहुसंख्येनें ग्रामीण भागांत राहणाऱ्या विविध घटकांतील लोकांचें जीवनमान व राहणीचा दर्जा सुधारावा असा या नियोजनामागील हेतु आहे. त्यासाठीं कानाकोपऱ्यांतून जनजागृति व जनसहकार्य मिळाल्याशिवाय विकास योजना यशस्वी होणार नाहीं. बाल्यावस्थेंत असलेल्या आपल्या लोकशाहीच्या आर्थिक शक्तीच्या जोडीस ग्रामीण भागांतील जनतेमधील सुप्त विधायक शक्तीची नियोजनानें सांगड घातली आहे व विकासाचें लोण खेडोपाडीं पोहोचविण्यांत आलें आहे. ग्रामीण भागांतील सुप्त शक्ति जागृत करून समाजविकासाच्या कामीं तिचा उपयोग करून घेण्याचें कार्य या जिल्ह्यांत जिल्हा विकास मंडळ, आणि समाजविकास गटामार्फत करण्यांत येत असे. पण आतां विकास मंडळें बरखास्त झाल्यामुळें त्यांचीं कामें जिल्हा परिषदेकडे गेलीं आहेत.

**जिल्हा विकास मंडळ**

जिल्ह्यांतील विविध क्षेत्रांतील आणि भागांतील जनतेचे प्रतिनिधि आणि सरकारी अधिकारी सभासद यांनीं युक्त असें जिल्हा पातळीवर एक विकास मंडळ व तालुका पातळीवर तालुका विकास मंडळे असत. जिल्हाधिकारी हे जिल्हा विकास मंडळाचे अध्यक्ष असून या जिल्ह्यांतील जिल्हा विकास मंडळाचे एकूण ७२ सभासद होते. त्यांत सरकारी १७ आणि बिनसरकारी ५५ सभासद होते. जिल्हा विकास मंडळाची कचेरी परभणी येथें होती. त्याच्या ११ उपसमित्यांमार्फत जिल्ह्यांतील विविध विभागाच्या समाज कल्याणाच्या योजनांना गती, पूर्तता व मार्गदर्शन करण्यांत येत असे. त्याचप्रमाणें जिल्ह्यांतील जनतेच्या सहकार्यानें विविध स्थानिक विकास कामें करण्यासाठीं राज्य सरकारकडून व भारत सरकारकडून आर्थिक सहाय्य मिळत असे. ग्रामीण भागांतील या प्रकारच्या कामावर होणाऱ्या खर्चाच्या निम्मी रक्कम रोख अथवा श्रमाच्या स्वरूपांत स्थानिक जनतेला द्यावी लागत असे. मागासलेल्या वर्गाकरितां लोक वर्गणी पंचवीस टक्क्यापर्यंत कमी करण्यांत येत असे. या जिल्ह्यांत नवीन विहिरी व विभागाकरितां तलावांची दुरुस्ती, शेतीस उपयुक्त असे लहान बंधारे, लहान पूल, जोडरस्ते यासारखीं स्थानिक विकासाची कित्येक कामें पार पाडण्यात आलीं आहेत.

वरील स्वरूपाचीं स्थानिक विकासाचीं कामें जिल्ह्यांत विकास गट क्षेत्र नसेल त्या ठिकाणीं जिल्हा विकास मंडळामार्फत हातीं घेतलीं जात व जिल्हा बांधकाम विभाग अथवा जि. लो. बोर्डाच्या देखरेखीखालीं पूर्ण केली जात. आवश्यक ती स्थानिक वर्गणी पूर्ण करण्याची जनतेनें तयारी दर्शविली तर अशा कामाची जबाबदारी गांव समिति, अथवा ग्रामपंचायत समितीवर सोपविण्यांत येते. याशिवाय ग्रामीण भागांत पिण्याच्या पाण्याची सोय करून घेण्याची आणि ग्रामीण भागांतील जोड रस्त्यांची अशा दोन स्वतंत्र योजनाहि जिल्हा विकास मंडळातर्फें करण्यांत येत असत. पिण्याच्या पाण्याच्या

आणि ग्रामीण जोड रस्त्याच्या योजनेकरितां २५ टक्के लोक वर्गणी असते, मागासलेल्या भागाकरितां मात्र या लोक वर्गणीचे प्रमाण थोडेसें सैल करण्यांत येते.

ग्रामीण भागांतील समाजाचे अज्ञान आणि दारिद्र्य नष्ट व्हावें यासाठीं शेतीचें उत्पादन त्वरेनें वाढावें दर एकरी उत्पादनांत वाढ व्हावी, शिक्षणाचा प्रसार व्हावा, आरोग्य संवर्धन आणि संरक्षणाची सोय व्हावी, ग्रामीण कला आणि व्यवसायाची वाढ व्हावी म्हणून सर्वांगीण विकासाचा कार्यक्रम एकत्रित खेड्यांचा गट घेऊन त्यांत सुरू करण्यांत येतो. या कार्यक्रमास प्रत्येक कुटुंबाचा हातभार लागावा म्हणून विविध समाज विकास कामांत लोक वर्गणी श्रम, शक्ती आणि रोख रूपाने विविध प्रमाणांत घेतली जाते. ग्रामीण जीवनाच्या उद्धाराची व सर्वांगीण विकासाच्या या कार्यक्रमाची योजना २ ऑक्टोबर १९५२ पासून देशांत सुरू करण्यांत आली आहे.

**समाज विकास गट**

१९५८ पर्यंत हा कार्यक्रम पुढील तीन भागांत विभागण्यांत आला होता. १) राष्ट्रीय विकास गट (२) समाज विकास गट (३) विशेष विकास गट. ( पोस्ट इन्टेसिव्ह स्टेज) परंतु बलवंतराय मेहता समितीने केलेल्या शिफारशीनुसार १ एप्रिल १९५८ पासून भारत सरकारने राष्ट्रीय विस्तार कार्यक्रमाचे तीन टप्पे रद्द करण्याचा निर्णय घेतला आणि त्या तीन भागाची दोन विस्तृत भागांत विभागणी केली. ते दोन भाग म्हणजे टप्पा १ विभाग आणि टप्पा २ विभाग. राज्य सरकारने भारत सरकारच्या वरील सूचना स्वीकृत करून विकास कार्यक्रमाची विभागणी दोन भागांत केली आहे. आणि त्याची अंमलबजावणी १ एप्रिल १९५८ पासून सुरू झाली. परभणी जिल्ह्यांत सर्व तालुक्यां-तून विकास गट चालू झाले असून विकास गटांतून प्रत्यक्ष शेती, पाणीपुरवठा, आरोग्य, शिक्षण इत्यादि विकास कार्यावर भर दिला गेला आहे. शेतीच्या सदरांत कंपोस्ट खड्डे, प्रात्यक्षिके, खतवांटप, बी-बियाण्याचे वांटप, जातीवंत वळूंचे वांटप, जातीवंत कोंबड्यांचे वांटप यासारखीं कामें पूर्ण झालीं आहेत. तसेंच पाणीपुरवठा योजनेमध्यें जमिनीस पाणीपुरवठ्याची सोय करण्यांत येऊन जमीन शेतीस उपयुक्त केली गेली आहे. आरोग्याच्या बाबतींत शेतावर चालणारे गॅस प्लँटस् तसेच नवीन विहिरी खोदणे आणि जुन्यांची दुरुस्ती करणे पाईपच्या सहाय्यानें पिण्याच्या पाण्याचा पुरवठा करणे, संडास बांधणे यासारखी कामें तडीस नेण्यांत आली आहेत.

शिक्षणाच्या क्षेत्रांत शाळेच्या इमारतींचे बांधकाम, तसेच प्रौढ साक्षरता योजना, शेतकरी मंडळाची स्थापना आणि महिला मंडळाची स्थापना ह्या बाबी पार पाडल्या गेल्या आहेत. इतर क्षेत्रांत देखील जोड रस्त्यांचें बांधकाम आणि ग्रामीण उद्योगावर भर देण्यांत आला आहे.

**परभणी जिल्ह्यांतील विकास गट व कार्यः**—परभणी जिल्ह्यांत हिंगोली राष्ट्रीय विस्तार सेवा खंड सुरू करण्यांत आला व नंतर १ ऑगस्ट १९५६ पासून त्याचे सामूहिक विकास खंडात रूपांतर करण्यांत आले. ह्या गटांत २,९९,६२८ एकराचे क्षेत्र व ८१,६२२ लोकसंख्या असलेली १५६ खेडीं समाविष्ट झालीं. हा विकासगट द्वितीयावस्था विकास गटांत मोडतो. त्यानंतर तीन चतुर्थांश विकास गट दुसऱ्या योजनेंत चालू करण्यांत आला, याचा विस्तार एकूण १७ खेड्यांत पसरला असून लोकसंख्या ४५,६१७ आहे.

**कळमनुरी व परभणीः**—कळमनुरी प्रथमावस्था विकास गट (जुना) १ एप्रिल १९५६ पासून चालू करण्यांत आला असून त्याचा विस्तार १७३ खेड्यांत पसरला आहे. लोकसंख्या एकूण ७०,६५६ आहे. दुसऱ्या पंचवार्षिक योजनेमध्यें कळमनुरी प्रथमावस्था विकास गट ( नवीन ) २ ऑक्टोबर १९५७ पासून सुरू करण्यांत आला. दुसऱ्या पंचवार्षिक योजनेच्या काळांत परभणी

प्रथमावस्था विकास गट ता. १ एप्रिल १९५६ पासून सुरू करण्यांत आला असून त्यांत १७८ खेडी आहेत व ग्रामीण लोकसंख्या १,१७,७९६ आहे.

**जिंतूर गंगाखेड परतुर**

दुसऱ्या पंचवार्षिक योजनेच्या काळांत जिंतूर प्रथमावस्था विकास गट २ ऑक्टोबर १९५८ पासून पूर्व विस्तार गट म्हणून काम करीत होता. त्यानंतर २ ऑक्टोबर १९५९ पासून त्याचे प्रथमावस्था विकास गटांत रूपांतर करण्यांत आलें. या विकास गटांत २५७ खेडीं असून ग्रामीण लोकसंख्या १८,४९६ आहे. हा दीड विकास गट आहे. गंगाखेड विकास गट पूर्व विस्तार गट म्हणून सुरू झाला. त्यांत १६३ खेडीं व ग्रामीण लोकसंख्या १,४२,२७२ आहे. परतुर विकास गट १ एप्रिल १९६० पासून पूर्व विस्तार गट म्हणून सुरू झाला व १ एप्रिल १९६१ रोजी त्याचे प्रथमावस्था विकास गटात रूपांतर झाले. या विकास गटांत १९६ खेडीं असून ग्रामीण लोकसंख्या १७,५३४ आहे.

**पाथरी व वसमतः**—पाथरी पूर्व विस्तार गट १ एप्रिल १९६० पासून सुरू झाला. त्यांत १३३ खेडीं असून ग्रामीण लोकसंख्या १,४२,२७२ आहे. बसमत पूर्व विस्तार गटाचा श्रीगणेशा २ ऑक्टोबर १९६० रोजी झाला असून ह्या गटांतर्गत २०७ खेडी व १,२०,८८३ लोकसंख्या आहे.

दुसऱ्या पंचवार्षिक योजनेच्या काळांत संपूर्ण परभणी जिल्ह्यांत ८ तालुक्यांतून विकास गट उघडले गेले व त्यांतून शेतकी, पशु संवर्धन, पाटबंधारे, आरोग्य, ग्रामीण स्वच्छता, शिक्षण, सहकार वगैरे क्षेत्रांत उत्कृष्ट कामगिरी बजावण्यांत आली आहे.

दुसऱ्या योजनेच्या काळांत या विकास गटांनीं खालील निरनिराळ्या क्षेत्रांत नेत्रदीपक असें कार्य केलेलें आहे.

**शेतीः**—शेतीच्या विकासासाठीं एकूण ९३८१ कंपोस्ट खताचे खड्डे खोदण्यांत आले. १७,६६६ मण रासायनिक खतें, १८,७६९ मण सुधारलेले बी-बियाणे यांचे वांटप करण्यांत आले. तसेच २,२९२ एकर जमिनीस बांध घालण्यांत आले व १०,७३८ एकर जमीन लागवडीखालीं आणली जाऊन १,१७२ शेतकी प्रात्यक्षिकें करून दाखविण्यांत आली.

**पशु संवर्धनः**—पशुसंवर्धनाच्या बाबतींत एकूण ४०,३५४ पशूंवर उपचार करण्यांत आले व १३,१५६ गुरांना खच्ची करण्यांत आले. ८२,४९४ गुरांना लस टोचण्यांत येऊन व १६८० पक्षांचा पुरवठा करण्यांत येऊन ५३ जातिवंत बैल पुरविण्यांत आले. या व्यतिरिक्त विकास गटांतून ३३ वैद्यक उपकेन्द्रें उघडण्यांत आली.

**पाटबंधारेः**—शेतीला पाणी पुरवण्यासाठी ३४० जुन्या विहीरींची दुरुस्ती करण्यांत येऊन ३७२ नवीन विहिरी बांधण्यांत आल्या. शिवाय ४ बंधाऱ्यांची कामें प्रगतीपथावर असून ३ बंधाऱ्यांची कामें पूर्ण झालीं आहेत. २०२५ एकर जमिनीवर फळझाडें लावण्यांत आली असून ३५८६ एकर जमीन भाजीपाल्याच्या लागवडीखाली आणण्यांत आली. तसेच ३५,२०२ एकर जादा जमीन पाटबंधाऱ्याखालीं आणली गेली व ११६ ऑईल इंजिने पुरविण्यांत आली.

**आरोग्य आणि ग्रामीण स्वच्छताः**—ह्या कार्यक्रमाच्या अंतर्गत पिण्याच्या पाण्याच्या १०६ जुन्या विहिरी निर्जंतुक करण्यांत आल्या व ६० नवीन विहिरी बांधण्यांत आल्या. तसेच

४५२३ शोष खड्डे बांधण्यांत येऊन २१६ शौचकूप तयार करण्यांत आले. ६१०७ फूट गटारेहि खोदण्यांत व बांधण्यांत आली.

**शिक्षणः**—विकास गटांतून शैक्षणिक सोयींसाठीं ३० शाळांच्या इमारती बांधण्यांत आल्या असून ४ इमारतींचें बांधकाम सुरू आहे. तसेंच ३३ शाळांचे मूलोद्योग शाळांत रूपांतर करण्यांत आले.

**ग्रामीण कला व हुन्नर**—यासाठीं पंधरा प्रशिक्षण शाळा उघडण्यांत येऊन योजनेच्या काळांत ६५८ विद्यार्थी प्रशिक्षित करण्यांत आले. सध्यां २८० विद्यार्थी प्रशिक्षण घेत आहेत.

**सहकार**—सहकाराच्या क्षेत्रांत २६६ विविध कार्यकारी व १९३ शेतकी पतपेढ्या स्थापन करण्यांत आल्या. ६,५५,१७६ रुपये भाग भांडवल म्हणून देण्यांत आले व ५१ औद्योगिक सहकारी संस्था स्थापन करण्यांत आल्या.

**ग्रामीण घरबांधणी**—विकास गटातर्फे आदर्श पद्धतीच्या घरबांधणी कामासाठीं ५१ इसमांना ४१,७३० रुपयांचे कर्ज देण्यांत आले.

# समाज कल्याण

देशाचा विकास म्हणजे देशांत राहणाऱ्या लोकांचा विकास. स्वातंत्र्योत्तर काळांत आपल्या देशांत विविध क्षेत्रांत आणि परिस्थितींत राहणाऱ्या लोकांचे जीवनमान उंचविण्याच्या दृष्टीनें अनेकविध योजना हातीं घेण्यांत आल्या असून लोकसंख्येचा फार मोठा भाग सामाजिक, सांस्कृतिक आणि आर्थिक दृष्टीनें मागासलेल्या लोकांचा आढळून आल्यामुळें त्यांच्यासाठीं समाज कल्याणाची खास योजना हातीं घेण्यांत आली आहे. या योजनेनुसार हरीजन, आदिवासी व इतर मागासलेल्या लोकांची सामाजिक, सांस्कृतिक आणि आर्थिक परिस्थिती सुधारण्याचे प्रयत्न करण्यांत येत असून प्रत्येक क्षेत्रांत आज जमातीच्या उन्नतीसाठीं खास योजना व सवलती देण्यांत येत आहेत.

**परंपरागत रूढींचें परिमार्जन**

या जिल्ह्यांत परभणी येथें समाज कल्याण अधिकाऱ्यांचे स्वतंत्र कार्यालय काम करीत आहे. समाज कल्याणाच्या योजना दोन प्रकारें अंमलांत आणतां येतात. पहिला प्रकार म्हणजे स्पृश्या-स्पृश्य, उचनीच, लहानथोर आणि जुन्या परंपरागत भेदभावाच्या रूढींचे प्रचारकार्यानें परिमार्जन करणें आणि दुसरा प्रकार म्हणजे मागासलेपण दूर करण्यासाठीं शैक्षणिक, सांस्कृतिक व आर्थिक सुखसोयी उपलब्ध करून देणें; स्पृश्यास्पृश्य भेदभाव मनांत मूळ धरून असल्यामुळें मत परिवर्तन करण्यासाठीं ग्रामीण भागांतून कीर्तनें, पोवाडे आणि सामुदायिक मेळावे भरवून सर्व समाजाला एकत्र आणण्यांत येते. याप्रमाणें या कार्यांत जनजागृति करणाऱ्या उत्कृष्ट खेड्यास उत्तेजनार्थ बक्षिस देण्यांत येते. समाज कल्याण अधिकाऱ्यांच्या मार्गदर्शनाखालीं हरिजन सेवक संघाचे आणि भारतीय डिप्रेस क्लास लिगचे प्रचारक जिल्ह्यांतील मागासलेल्या वर्गांतील जनतेत जागृतीचें कार्य करीत आहेत.

**संस्कार केंद्र व वसतिगृहें**—जन्मानें जात ठरत नाहीं ह्या गोष्टीचे संस्कार मुलांवर व्हावे या उद्देशानें स्त्रिया व मुलें त्यांच्यासाठीं जिल्ह्यांत एक संस्कार केंद्र स्थापन करण्यांत आलें असून एका वसतिगृहाचीहि सोय करण्यांत आली.

**शैक्षणिक सवलती**

मागासलेल्या वर्गांतील समाजाला अज्ञानाच्या अंधःकारांतून बाहेर काढण्याकरितां ज्ञान-साधनेच्या सर्व सवलती आणि सोयी उपलब्ध करून देण्यांत आल्या आहेत. यांत फी माफी, शिष्य-वृत्त्या, शाळा साहित्यांचा मोफत पुरवठा, वसतिगृहांत राहण्याखाण्याची सोय इत्यादि गोष्टींचा समावेश करण्यांत आला आहे. उच्च आणि परदेशीय शिक्षणाकरिताहि मागासलेल्या विद्यार्थ्यांना सवलती देण्याची तरतूद आहे. शिक्षण क्षेत्राची दालनें केवळ मागासलेल्या जातीसच नव्हे तर आर्थिक दृष्टीनें मागास-लेल्या सर्व वर्गांतील लोकांस खुलीं व्हावींत असें धोरण महाराष्ट्र सरकारनें स्वीकारल्यामुळें विद्यार्थ्यांस शिक्षण घेणें सुलभ झाले आहे. ९०० रुपये उत्पन्नाची मोफत शिक्षणाची योजना आतां बाराशे रुपयांपर्यंत वाढविण्यांत आल्यानें सर्व जमातींतील विद्यार्थ्यांस शिक्षण घेणें सोपें झालें आहे.

परभणी जिल्ह्याच्या एकूण लोकसंख्येपैकीं २,९०,००० लोक वर्गीकृत जमातींचे असून सुमारे ३०,००० लोक विमुक्त जमातींचे आहेत. सुमारे वीस हजाराहून अधिक लोक आदिवासी आहेत. ह्या तिन्ही प्रकारच्या लोकांची वस्ती बहुसंख्येनें ग्रामीण विभागांतूनच आहे. हे लोक शैक्षणिक, सामाजिक आणि आर्थिक दृष्ट्या इतर जनतेच्या मानाने अतिशय मागे पडलेले आहेत. आणि ह्या दृष्टीने त्यांचा सामाजिक विकास साधण्यासाठीं दुसऱ्या पंचवार्षिक योजनेत केंद्र सरकारनें पुरस्कृत केलेल्या योजना तसेंच राज्य सरकारच्या विविध योजना अंमलांत आणण्यांत आल्या.

**मागासलेल्या जमातींचें कल्याण**

**आदिवासी जमातींचें कल्याण**—दुसऱ्या योजनेच्या काळांत ७४३ विद्यार्थ्यांना १५३३४ रुपयांच्या शिष्यवृत्त्या देण्यांत आल्या. कळमनुरी येथें तीन वर्षांपासून चालू असलेल्या २५ विद्यार्थ्यांच्या एका वसतिगृहाला १५,३१२ रुपये अनुदान म्हणून देण्यांत आले. डोंगरी आणि वन विभागांतून राहणाऱ्या आदिवासींच्या मुलांसाठीं तीन खास शाळा उघडण्यांत आल्या. ह्या शाळांतून आतांपावेतो १५० पेक्षा अधिक विद्यार्थ्यांनीं प्राथमिक शिक्षण संपादन केलें आहे.

शेती व शेत मजुरी हे आदिवासी जमातीचे प्रमुख धंदे. शेतीला उपयुक्त असणाऱ्या साधनांचा अभाव असल्यामुळें आपली शेतीवाडी सोडून हे लोक दुसऱ्याच्या शेतावर मजुरी करतात. त्यांची ही नड लक्षांत घेऊन ८० लोकांना ५,०४८ रुपये खर्चून नांगर, साळी, बियाणें इतर अवजारे वगैरे पुरविण्यांत आली. तसेच ४४ कुटुंबांना २३,४०० रुपये खर्चून बैल जोड्या विकत घेऊन देण्यांत आल्या. घरगुती उद्योगधंद्यासाठीं व गाई, म्हशी इत्यादि विकत घेण्यासाठीं २० कुटुंबांना अनुक्रमें ३,२०० व १,८०० रुपये देण्यांत आले. शेतीचें काम झाल्यानंतर फावल्या वेळांत इतर काम करण्यासाठीं शिवणकलेचें शिक्षण देणारे एक केंद्र स्थापन झालें व त्यावर ९,४४५ रुपये खर्च करण्यांत आले. अमदरी येथें ११,३२१ रुपये खर्चून संसारोपयोगी सामानाचें एक दुकानहि सहकारी पद्धतीवर उघडण्यांत आले. दुसऱ्या पंचवार्षिक योजनेच्या काळांत विहिरींचें बांधकाम, घरबांधणी, वसतिगृह व जोडरस्ते यावर ५८,३०० रुपये खर्च करण्यांत आले.

**शेतीच्या साधनांचा पुरवठा**

**वर्गीकृत जमातीसाठीं शैक्षणिक सोई**—दुसऱ्या पंचवार्षिक योजनेच्या काळांत वर्गीकृत जमातीच्या ३,१७४ विद्यार्थ्यांना मोफत शिक्षण देण्यासाठीं ८०,०१६ रुपयांच्या शिष्यवृत्त्या देण्यांत आल्या. ९३५ विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्य पुरविण्यांत आले. तसेच ७५ विद्यार्थ्यांच्या तीन वसतीगृहासाठीं ८२,७५५ रुपये अनुदान दिले गेले, आणि खाजगी शिक्षण संस्थेतून शिक्षण संपादन करणाऱ्या ५० विद्यार्थ्यांना ५९६ रुपयांचे शैक्षणिक शुल्क प्रदान करण्यांत येऊन ४६ विद्यार्थ्यांना मॅट्रिकपर्यंचें शुल्क म्हणून ६२४ रुपये देण्यांत आले.

वर्गीकृत जमातीमध्यें असलेल्या क्षय व अन्य दुर्धर रोगांच्या इलाजासाठीं १०,८०० रुपयांचीं औषधें दिलीं गेलीं. ह्यामुळें ३०० रोग्यांचा फायदा झाला. तसेंच चारशें कुटुंबांना पत्रे आणि घराच्या बांधकामासाठीं साहित्य देण्यांत आलें. दोन हरिजन वस्त्यांतून ७० कुटुंबांच्या राहण्यासाठीं व्यवस्थाहि करण्यांत आली. ह्या जमातीसाठीं ६२,८८७ रुपये खर्चून ३६ विहिरींची दुरुस्ती करण्यांत आली. ४ हजार रुपये खर्च करून चार सार्वजनिक सभागृहें बांधण्यात आलीं व त्यांत वाचनालयें, खेळण्याचें साहित्य इत्यादींची व्यवस्था करण्यांत आली. या सभागृहाचा भजन कीर्तनादि सांस्कृतिक कार्यक्रमासाठीं उपयोग करण्यांत येतो. ३४७ कुटुंबांना गृहोद्योगासाठीं १२,७०० रुपयांचें अनुदान देण्यांत आलें. तसेंच कलाकुसरीच्या सहकार मंडळासाठीं दहा रुपये देण्यांत आले.

**औषधोपचार व अन्य सुखसोयी**

ह्या मंडळांपैकीं पाथरी येथील साबण उत्पादन संघ, परभणी येथील चर्मकार संघ व पूर्णा येथील चुना विटा सहकारी संघ उत्कृष्ट कार्य करीत आहे व बँडवादन, शिवणकाम, सुतारकाम वगैरेसारख्या गृहोद्योगाच्या कामासाठीं ८६ कुटुंबांना १२ हजार रुपयांचे आर्थिक सहाय्य देण्यांत येऊन दुधदुभत्याचा धंदा करण्यासाठीं वर्गीकृत जमातीच्या तेरा कुटुंबांना ३ हजार रुपयांची मदत देण्यांत आली आहे.

**अस्पृश्यता निवारण**

दुसऱ्या योजनेच्या काळांत अस्पृश्यता निवारणाच्या कार्यासाठीं अस्पृश्यता निवारण सप्ताह मेळे, सांस्कृतिक कार्यक्रम, सहभोजन इत्यादि कार्यक्रम आयोजित करण्यांत आले. त्याप्रीत्यर्थ ८२५७ रुपये खर्च करण्यांत आले. योजनेच्या कालावधींत केंद्र सरकार पुरस्कृत एक योजना अंमलांत आणली जाऊन तांदुळवाडी येथें एक हरिजन वसाहत स्थापन करण्यांत आली. सेलू येथें बागायत आणि कलाकार वगैरेंसाठीं दुसरी वसाहत करण्याचें ठरविण्यांत आलें आहे. दोन्ही योजना प्रगतीपथावर असून आतांपर्यंत त्यावर १७,४४,६०० रुपये खर्च झाले आहेत.

**सामूहिक कल्याण**

भारताच्या द्वितीय पंचवार्षिक योजनेच्या काळांत १ जानेवारी १९५८ मध्यें परभणी येथे समाज कल्याण योजनेचे कार्य सुरू झाले. आणि तदनुषंगाने समितीने परभणी समाज कल्याण योजना क्षेत्राची पहाणी करून सुमारे ३०००० लोकवस्तीचे क्षेत्र योजनेखालीं घेतलें. व त्यांतहि २० खेडीं घेण्यांत येऊन झरी, टाकळी, पेडगांव, पिंपरी व सिंगणापूर ह्या पांच ठिकाणीं कल्याण केंद्रें स्थापन केली गेली. प्रत्येकासाठीं ५ मैलाच्या आंतील तीन तीन खेडी उपकेंद्र म्हणून घेतली गेली.

**बालवाडी शिक्षणवर्ग व प्रौढ वर्गाचा कार्यक्रम**

योजना कार्याचीं कामें केंद्रावरील ग्रामसेविका व दाया यांच्याकडून सुरू करण्यात आलीं. बालवाडीचा कार्यक्रम दैनिक असून ३ ते ६ वर्ष वयाच्या मुलासाठीं ह्या बालवाड्यांतून खेळणी, गाणी, गोष्टी इत्यादि द्वारे मुलांना शिक्षण दिले जाते व त्याचबरोबर स्वच्छता, आरोग्य, निरनिराळे जीवनोपयोगी मूलोद्योग इत्यादि कार्यक्रम घेतले जातात. तसेच सोशल वेलफेअर खात्याकडून ५ केंद्रासाठीं शिवण यंत्रें दिलेली आहेत. त्यामुळें केंद्रावर महिलांसाठीं दुपारचा शिवण वर्ग चालवला जाऊन महिलांना घरगुती असे शिवण, विणकाम, कागदकाम इत्यादि शिकविले जाते. त्याशिवाय प्रौढ वर्गातून महिलांना लेखन, वाचन, वैयक्तिक व सामाजिक आरोग्य, स्वच्छता, बालसंगोपन, छोटे उद्योगधंदे इत्यादि घरगुती व आवश्यक विषयांचे शिक्षण दिलें जाते या व्यतिरिक्त दायांमार्फत ग्रामीण महिला व मुलांसाठी वैद्यकीय मदत दिली जाते. त्यामुळे गांवकऱ्यांना सामान्य औषधोपचार, प्रसूतिपूर्व स्त्रियांची काळजी व औषधोपचार, प्रसूति कार्य, माता व मुलांची काळजी इ. बद्दल वैद्यकीय व अतिशय आवश्यक सोयी उपलब्ध झाल्या आहेत. तसेंच महिला मंडळातर्फे राष्ट्रीय व धार्मिक कार्यक्रम पार पाडले जातात.

१९५८-५९ सालीं १८७० मुलांनीं बालवाडीचा फायदा घेतला व २६५३ मुलांसाठीं दूध वांटप करण्यांत आलें. १३,९६८ महिला व मुलांवर वैद्यकीय उपचार करण्यांत येऊन ६२९ स्त्रियांचीं बाळंतपणें करण्यांत आलीं. समाज शिक्षणाचे ६८५ वर्ग घेण्यांत आले. शिक्षण व हस्तव्यवसायासाठीं ७०० वर्ग आयोजित करण्यांत आले. ३१७० सांस्कृतिक कार्यक्रम पार पाडण्यांत आले.

१९५९ मध्यें समाज कल्याण योजनेचें सामुहिक कल्याण योजनेंत रूपांतर करण्यांत येऊन पूर्वीचे वीस खेड्यांचें योजनाक्षेत्र आतां १०० खेड्यांचे करण्यांत आले. वरील क्षेत्रांत पूर्वीची पांच धरून एकूण १० केंद्रें सुरू करण्यांत आलीं व प्रत्येक केंद्राखालीं दहा उपकेंद्रें उघडण्यांत आलीं.

परभणी जिल्ह्यांत विमुक्त जातीपैकीं प्रामुख्यानें पाथरी, लमाणी, वडार, कैकाडी आदि जातींचे लोक असून पूर्वी या जमातीच्या लोकांना गुन्हेगार समजत असत. गांवापासून दूर रहात असल्यामुळें हे लोक जीवनाच्या सर्वच क्षेत्रांत मागासलेले होते. त्यांचा शैक्षणिकदृष्ट्या उत्कर्ष साधण्यासाठीं त्यांना शिष्यवृत्त्या, विनामूल्य शिक्षण, मोफत वस्त्रें इत्यादि सोयी उपलब्ध करून देण्यांत आल्या. या जमातीच्या २२७ विद्यार्थ्यांना शिष्यवृत्त्या देण्यांत येऊन २० विद्यार्थ्यांच्या एका वसतिगृहाला ६४०० रुपये अनुदान दिलें गेलें. याच जमातींतील डोंगरी विभागांत राहणाऱ्या विद्यार्थ्यांसाठीं तीन शाळा उघडण्यांत आल्या आणि दोन शाळांतून प्रौढ शिक्षणाचे पाठ देण्यांत आले.

**विमुक्त जातीच्या लोकांसाठीं शैक्षणिक सोयी**

**आर्थिक सहाय्य**—आर्थिकदृष्ट्या इतर समाजाच्या बरोबर आणण्याच्या दृष्टीनें ह्या जातींतील चाळीस कुटुंबांना बैलजोड्या, बीं-बियाणें, नांगर वगैरे साहित्य पुरविण्यांत आलें. त्यांच्या-साठीं आठ नवीन विहिरी बांधण्यासाठीं व तीन जुन्या विहिरींची दुरुस्ती करण्यासाठीं ६१०० रुपये खर्च करण्यांत आले तर घरांच्या बांधकामासाठीं १२५ कुटुंबांना ९३३४ रुपये देण्यांत आले. ह्या व्यतिरिक्त ह्या जातीच्या लोकांसाठीं मालेगांव येथें २१०० रुपये खर्चून वसाहत बांधण्यांत येत आहे.

इतर मागासलेल्या वर्गाच्या ६७८ विद्यार्थ्यांना शिष्यवृत्त्या देण्यांत येऊन शैक्षणिक अनुदान म्हणून १९ विद्यार्थ्यांना १५६७ रुपये देण्यांत आले. १९५१ सालापासून मागासलेल्या वर्गाची व्याख्या जातीवर ठरविण्यांत येत असे ती उत्पन्नावर ठरविण्यांत आली व ही सवलत १२०० किंवा त्याहून कमी उत्पन्न असलेल्या पालकांच्या मुलांना लागू करण्यांत आली. दुसऱ्या पंचवार्षिक योजनेच्या काळांत २४४४ विद्यार्थ्यांनीं ह्या सवलतीचा फायदा घेतला. परभणी जिल्ह्यां-तील कळमनुरी, वसमत, हिंगोली आणि परतर हे तालुके अविकसित ग्रामीण विभाग म्हणून घोषित केले आहेत. या विभागाच्या विकासासाठीं या चारहि तालुक्यांत विविध योजना आखण्यांत आल्या आहेत. ग्रामीण विभागांतील शेतकऱ्यांना शेतीसाठीं सहा ऑईल इंजिनें देण्यांत आलीं. २९ कुटुंबांना नांगर पुरविण्यांत आले. तसेच कुटिरोद्योगद्वारा चरितार्थ चालविणाऱ्या १९० कुटुंबांना ४८०० रुपयांचे सहाय्य देण्यांत आले. ग्रामसेवक केंद्रावर हस्तव्यवसाय व समाज शिक्षण, वैद्यकीय कार्य इत्यादि दैनिक कार्यक्रम चालू करण्यांत आले. महिला मंडळाची स्थापना करण्यांत येऊन कर्मचारी वर्गाच्या मार्गदर्शनाखालीं घरसुधारणा, घराची स्वच्छता, बिन-धुराच्या चुली, शोष खड्डे, खताचे खड्डे, शेतकी प्रात्यक्षिके, सांस्कृतिक कार्यक्रम इत्यादि कामे करून घेण्यांत आली.

**इतर मागासलेल्या समाजाची सुधारणा**

समाज कल्याण योजनेला केंद्र व राज्य बोर्डाकडून मिळणाऱ्या आर्थिक मदतीला विकास गटाची मदत मिळून समाज कल्याणचे कार्य व्यवस्थित प्रकारे चालावे आणि महिला व मुलें यांना अधिकाधिक फायदा मिळावा ह्या उद्देशाने समाज कल्याण योजनेचे सामूहिक कल्याण योजनेंत परि-वर्तन करण्यांत आले. १९५९-६० सालीं ३२४ मुलांनीं बालवाडीचा फायदा घेतला. ४८५ मुलांना दूध वांटण्यांत आले. ६११७ महिला व मुलांवर वैद्यकीय उपचार करण्यांत आले. ७१९

महिलांची बाळंतपणे करण्यांत आलीं. तसेंच समाज शिक्षणाचे वर्ग व हस्त व्यवसायाचे ७८६ शिक्षण वर्ग भरविण्यांत आले. ह्या योजनेच्या अंतर्गत १३८९ सांस्कृतिक कार्यक्रम घेण्यांत आले. १० महिला मंडळे भरविण्यांत आली. १९६०–६१ सालीं बालवाडीचा फायदा ३७० मुलांनीं घेतला व ६३५८ महिला व मुलांवर औषधोपचार करण्यांत आला. ७५६ महिलांची प्रसूतिपूर्व तपासणी करण्यांत आली. समाज शिक्षणाचे ३०६ व शिवण व हस्तव्यवसायाचे ४३० वर्ग घेण्यात आले. त्याच्या जोडीला सांस्कृतिक कार्यक्रम घेण्यांत येऊन २९ महिला मंडळे स्थापन करण्यांत आली आहेत.

# स्था नि क स्व रा ज्य

देशाची उभारणी मजबूत पायावर करावयाची असल्यास प्रत्येक खेड्यांत एक ग्रामपंचायत, एक शाळा आणि एक सहकारी संस्था असली पाहिजे असे मत आपल्या पंतप्रधानांनीं व्यक्त केलें आहे. स्थानिक विकास कार्याकडे बारकाईनें पाहतां यावे, आवश्यक तीं कामें प्राधान्य देऊन करतां यावीत आणि स्थानिक जनतेंत अशा कार्याबद्दल जागृति व त्याकरितां सहकार्य मिळवितां यावे या दृष्टीनें स्थानिक स्वराज्य संस्थांचें महत्व आगळेंच आहे. हें महत्व ओळखूनच राज्य सरकारनें ग्रामपंचायतीला अधिक कार्यशील आणि स्वयंपूर्ण करण्याच्या दृष्टीनें जिल्ह्याच्या ठिकाणीं परभणी येथें ग्रामपंचायत मंडळाची स्थापना केली होती. आतां जिल्हा परिषदेकडे हें काम सोंपविण्यांत आलें आहे. या जिल्ह्यांत एकूण ५४० ग्रामपंचायती असून त्यांची संख्या तालुकानिहाय पुढीलप्रमाणें आहे.

| | तालुक्याचें नांव | लोकसंख्या | एकूण खेडी | ग्रामपंचायती |
|---|---|---|---|---|
| १) | परभणी | १,५०,०२३ | १७४ | ४७ |
| २) | गंगाखेड | १,४५,६८४ | १८१ | ७६ |
| ३) | पाथरी | १,४२,२७२ | १६३ | ६० |
| ४) | परतुड | १,०७,३८७ | १९६ | ६४ |
| ५) | जिंतूर | १,०८,४९७ | २२७ | ४९ |
| ६) | कळमनुरी | १,२७,२७९ | २१२ | ६६ |
| ७) | वसमत | १,२०,८८३ | २०७ | १०६ |
| ८) | हिंगोली | १,०८,८३९ | २२६ | ७२ |

जिल्ह्यांतील लोकवस्ती लहान लहान खेड्यांतून विखुरलेली असल्यामुळें ग्रामपंचायतीच्या क्षेत्रांत त्यांच्या दुपटीहून अधिक खेड्यांचा समावेश होतो. पाणीपुरवठा, रस्ते दुरुस्ती, आरोग्य या मूलभूत कर्तव्याबरोबरच ग्रामीण जनतेच्या विकासाच्या योजनांची परिपूर्तता करण्याची जबाबदारी ग्रामपंचायतीवरच आहे.

**नगरपालिका:—** या जिल्ह्यांत ४ नगरपालिका पुढील गांवात कार्य करतात. (१) परभणी, (२) मानवत, (३) वसमत, (४) हिंगोली आणि पुढील गांवी पूरपालिका आहेत. (१) पूर्णा, (२) गंगाखेड, (३) सोनपेठ, (४) पाथरी, (५) सेलू, (६) परतुड, (७) जिंतूर, (८) कळमनुरी.

पाणीपुरवठा व ड्रेनेजच्या योजनाहि कांहीं नगरपालिकांनीं आपल्या हातीं घेतल्या आहेत.

**जिल्हा लोकल बोर्ड**

जिल्हा परिषदेच्या स्थापनेपूर्वी अस्तित्वांत असलेल्या जिल्ह्याच्या लोकल बोर्डावर ४२ सभासद होते. त्यांत २ जागा स्त्रियांसाठीं, आठ हरिजनांसाठीं, दोन आदिवासींसाठीं राखून ठेवण्यांत आल्या होत्या. इतर ३० सभासद सर्व सामान्य होते. बोर्डाला एक अध्यक्ष आणि एक उपाध्यक्ष होते. परभणी येथें जिल्हा लोकल बोर्डाचे प्रमुख कार्यालय होते. दळणवळणाची ग्रामीण विभागांतील सोय, पाणीपुरवठा, ग्रामीण आरोग्य व्यवस्था इत्यादि बोर्डाच्या विविध कामाकरितां सभासदांतून निरनिराळ्या समित्या नेमल्या असून लोकल फंड सेस आदींचें उत्पन्न, सरकारी मदत व देणग्या याप्रासून बोर्डाला उत्पन्न होत असे; त्यांतून ग्रामीण विभागांतील रस्ते व जोड रस्ते तयार करणें त्यांची दुरुस्ती करणें, ग्रामीण विभागांत पाणीपुरवठ्याची व औषधोपचाराची सोय करणें ह्या गोष्टी प्रामुख्यानें बोर्डाला कराव्या लागत असत.

# जिल्हा परिषद

दिनांक १ मे १९६२ पासून महाराष्ट्रांत लोकशाही विकेंद्रीकरण कायदा अंमलांत आला असून त्यानुसार जिल्हा परिषदांच्या निवडणूका झाल्या. ही घटना महाराष्ट्राच्या राजकीय आणि सामाजिक जीवनांत मोठें परिवर्तन घडवून आणणारी आहे. महाराष्ट्राच्या ग्रामीण विभागांतील आजचें जीवन आणि १५ वर्षांपूर्वीचें जीवन यांत बराच मोठा फरक पडला आहे. सर्वसामान्य शेतकरी आतां विकास कार्याविषयीं जागरूक होत असल्यामुळें परिणामतः राजकीय दृष्ट्याहि जागृत होत चालला आहे. महाराष्ट्राच्या ग्रामीण भागांतील शेतकऱ्यांची आणि कामकऱ्यांची अस्मिता जागृत झाली आहे आणि म्हणूनच, या जागृत नवीन पिढीच्या आकांक्षा पूर्ण करणारा लोकशाही विकेंद्रीकरणाचा हा धाडसी प्रयोग करण्यांत येत आहे.

लोकशाही विकेंद्रीकरणाची नवी योजना, हें योग्य दिशेनें धैर्यानें टाकलेलें पाऊल असून जिल्हा हा या योजनेचा मूलभूत घटक होय. बलवंतराय मेहता समितीनें सुचविल्याप्रमाणें तालुका हें मूलभूत विकास क्षेत्र न स्वीकारण्यास कांहीं कारणें आहेत. पहिले कारण असें कीं लोकल बोर्ड, स्कूल बोर्ड, विकास मंडळें इत्यादि स्थानिक स्वरुपाच्या संस्था आजवर जिल्हापातळीवरच काम करीत आल्या आहेत तेव्हां या नवीन योजनेचा सांगाडा उभारण्यासाठीं, या परंपरेचा भक्कम आधार घेणें हितावह आणि सोयीचें ठरणार आहे. जनतेला संस्थांचा विचार जिल्हा पातळीवरून करण्याची संवय जडली आहे तिचाच उपयोग करणें इष्ट होईल. दुसरें असें कीं, 'जिल्हा' हाच घटक मानला तर स्थानिक नेतृत्वाच्या वाढीस पुरेसा वाव मिळेल. तिसरें म्हणजे योजनाबद्ध कार्यक्रम अंमलात आणण्याच्या मार्गांत, लहान घटकामुळें अनेक अडचणी उपस्थित होण्याची शक्यता आहे. शिवाय साधनसामग्री निरनिराळ्या कार्यांतील एकसूत्रीपणा, कर्मचारी आणि कामगार इत्यादि बाबतींत जिल्हा हेंच अत्यंत सोयिस्कर क्षेत्र आहे.

बलवंतराय समितीच्या अहवालांत अप्रत्यक्ष निवडणुकीची कल्पना मांडण्यांत आली असली तरी आपल्या राज्यांत जिल्हा परिषद प्रत्यक्ष मतदानानें निवडल्या गेल्या आहेत. कारण अप्रत्यक्ष निवडणुकांबाबत लोकांना पुरेसा उत्साह वाटत नाहीं. त्यामुळें एकदा ग्रामपंचायतींच्या निवडणुका झाल्या कीं लोकांचा जिल्हा परिषदांशीं तसा प्रत्यक्ष संबंध उरणार नाहीं. तेव्हां ज्या पातळीवरील संघटनेच्या हातीं खरी सत्ता असेल, त्या संघटनेच्या निवडणुका प्रत्यक्ष मतदानानेंच व्हावयास पाहिजेत. म्हणून जिल्हा परिषदांच्या निवडणुका प्रत्यक्ष होणें श्रेयस्कर ठरते.

विकास गटाचा अध्यक्ष, जिल्हा सहकारी संघटनेचा प्रमुख व इतर अशाच प्रकारच्या संघटनांचे प्रमुख जिल्हा परिषदांचे सभासद राहणार असले तरी प्रत्यक्ष निवडणुका लढविण्याची गरज नाहीं. त्यांची निवड अप्रत्यक्षरीत्या होईल.

जिल्हाधिकाऱ्यांचें कार्यक्षेत्र परिषद कार्यापासून अलग ठेवण्यांत आलेलें आहे. जिल्हाधिकाऱ्यांचा परिषदेशी संबंध येतो तो केवळ परिषदेचे नोकर निवडण्यासाठीं असलेल्या समितीचे सदस्य या नात्यानें. पण जिल्हाधिकाऱ्यांच्या कार्यालयाचें महत्व संपुष्टांत येईल असें मानण्याचें कारण नाहीं. कारण जिल्हाधिकाऱ्याला अन्य अनेक प्रकारची कामें जबाबदारीनें पार पाडावयाची असून त्या दृष्टीनें त्याला भरीव अधिकारहि देण्यांत आलेले आहेत. जिल्हाधिकाऱ्यांच्या अधिकाराचें व कार्यक्षेत्राचें स्थूलमानानें पुढील स्वरूप राहील.

राज्यसरकारच्या आदेशानुसार जिल्हाधिकाऱ्याला जिल्हा परिषदेच्या कामकाजासंबंधी कोणतीहि माहिती अगर आंकडेवारी मागविण्याचा अधिकार आहे.

जिल्हा परिषद अगर पंचायत समिती यांच्या ठरावाच्या अंमलबजावणीनें अगर अन्य कोणत्याही आदेशामुळें शांतताभंग होईल अगर जनतेस त्यामुळें त्रास होईल असें जिल्हाधिकाऱ्याचें मत असलें तर आपल्या लेखी आदेशानें अशी अंमलबजावणी स्थगित करण्याचा त्याला अधिकार आहे. मात्र या आदेशाची प्रत संबंधित परिषद व कमिशनर यांच्याकडे पाठविली पाहिजे. कमिशनरना सदर आदेशांत जरूर तो फेरफार करण्याचा अधिकार आहे.

निकडीच्या प्रसंगीं सार्वजनिक आरोग्य व सुरक्षितता याबाबतींत कांहीं विशेष असाधारण काम पार पाडणें असल्यास ती बाब परिषदेच्या कक्षेंतील असली तरी जिल्हाधिकाऱ्याला त्यासंबंधीं जरूर ती व्यवस्था करण्याचा अधिकार आहे व यासाठीं होणारा खर्च अगर द्यावयाचा मेहनताना परिषदेनें देण्याची सूचना करण्याचा जिल्हाधिकाऱ्याला अधिकार आहे.

जिल्हा परिषदेच्या कार्यासाठीं घ्यावयाच्या नोकरांची निवड करण्यासाठीं या कायद्यान्वयें अस्तित्त्वांत येणाऱ्या समितीवर जिल्हाधिकारी पदसिद्ध सभासद आहेत.

जिल्ह्यांतील कायदा व सुव्यवस्था पालनाची जबाबदारी सर्वस्वी जिल्हाधिकाऱ्याची आहे.

लोकशाही विकेंद्रीकरण कायदा अंमलांत आल्यापासून म्हणजेच १ मे, १९६२ पासून आपल्या राज्यांतील प्रत्येक जिल्ह्यांत जिल्हा परिषदेची स्थापना करण्यांत आली आहे. या परिषदेवरील प्रतिनिधि निवडून द्यावयाचे असून जास्तींत जास्त ३५,००० लोकसंख्येला एक या प्रमाणांत हे प्रतिनिधि निवडले गेले आहेत. या परिषदेंत प्रतिनिधींची संख्या जास्तींत जास्त साठ आणि कमीत कमी चाळीस राहील. त्यांत एक स्त्री प्रतिनिधि ( सभासद ), अनुसूचित जाति आणि संयुक्त सहकारी संस्थेचे अध्यक्ष हे सहयोगी सभासद म्हणून राहतील.

ही परिषद जिल्ह्यांतील विकास कार्याबाबत पूर्ण जबाबदार राहणार आहे. आणि म्हणून परिषदेच्या स्थायी समिती, अर्थ समिति, बांधकाम समिति, सहकार समिति, शिक्षण समिति आणि आरोग्य समिति अशा अनेक समित्या असतील. जिल्हा परिषदेचा अध्यक्ष हा स्थायी समितीचा पदसिद्ध अध्यक्ष राहील.

जिल्हा परिषदेसाठीं एक मुख्य कार्यकारी अधिकारी आणि दुसरा उपमुख्य अधिकारी यांची नियुक्ति राज्यशासकाकडून करण्यांत आली आहे.

जिल्ह्यांतील प्रत्येक गटासाठीं पंचायत समिति असेल आणि ती लोकांनीं निवडून द्यावयाची आहे. या समितीत, निवडून आलेले सभासद, तसेंच एक स्वीकृत सभासद, शेतकी सहकारी संस्थेचे अध्यक्ष, गटांतील स्त्रिया, अनुसूचित जाति आणि जमाती यांचा प्रतिनिधि समितींत निवडून आलेला

नसल्यास प्रत्येकी एक, आणि पंचायतीच्या सभासदांनीं निवडून दिलेले दोन सरपंच इतके सदस्य असतील.

पंचायत समितीसाठीं एक गटविकास अधिकाऱ्याची नेमणूक झाली आहे. गटविकास अधिकारी हा पंचायत समितीचा पदसिद्ध चिटणीस असेल. पंचायत समितीचे सभापति आणि उप-सभापति सभासदांनीं निवडून द्यावयाचे आहेत.

जिल्हा परिषदेवर कोणत्याहि विकास कार्याची अंमलबजावणी अगर देखभाल करण्याची जबाबदारी सोपविण्यांत येईल आणि जिल्हा परिषद शासनाचे याबाबतींत एजन्ट म्हणून काम पाहील. जिल्हा परिषद शक्यतों सर्व कामें पंचायत समित्यांमार्फत पार पाडील. कांहीं ठराविक कामें पंचायत समित्यामार्फतच पार पाडलीं जातील. जिल्हा परिषदेकडे पुढील कामें सोपविण्यांत आलीं आहेत.

**शेतकी**

शेतकी शाळा-स्थापन करणें, त्यांची व्यवस्था ठेवणें, त्या सुस्थितींत राखणें आणि त्यांना अनुदानें देणें (सहाय्यित शेतकी शाळांना अनुदान देणें या बाबी समाविष्ट करून) परंतु त्यांत पुढील गोष्टींचा समावेश होणार नाहीं (१) अभ्यासक्रम ठरवून देणें. (२) पाठ्य पुस्तकें नेमून देणें (३) शेतकी शाळांची तपासणी, आणि; (४) वार्षिक परीक्षा घेणें. याशिवाय पुढील गोष्टीही जिल्हा परिषदेकडे राहतील. पीक स्पर्धा, पीक संरक्षण, पीक मोहिमा (खरीप आणि रब्बी पिकांच्या मोहिमा आणि प्रकृष्ट भातशेतीची लागवड धरून.) मिश्र खतें व स्थानक खतें, रासायनिक खतें, शेतीचीं अवजारें आणि शेतीसाठीं लागणारें लोखंड, पोलाद आणि सीमेंट यांचें वांटप, सुधारलेल्या शेतीपद्धतींचें प्रात्यक्षिक, दुय्यम बीज केंद्राचें आदर्श प्रात्यक्षिक, सुधारलेल्या बियाणांची आयात व वांटप. गुदामें बांधणें आणि त्यांची व्यवस्था ठेवणें, शेतीची प्रगति व सुधारणा, घातक वनस्पतींचा नाश करणें, अन्यस्थानीय झाडें लावून तीं आपल्या प्रदेशांत वाढविणें.

**पशुसंवर्धन**—पशुवैद्यकीय सहाय्य. (जिल्ह्यांतील गुरांचीं रुग्णालयें वगळून परंतु गुरांचे दवाखाने, पशुवैद्यकीय सहाय्य केंद्रें आणि खेड्यांतील पशुवैद्यकीय पेटया समाविष्ट करून) गुरांच्या, घोड्यांच्या आणि इतर पशुधनाच्या पैदाशीची सुधारणा (यांत कृत्रिम रेतन उपकेंद्रें, प्रमुख ग्राम केंद्रें, वळू बैलांचीं प्रमुख केंद्रें, वैरण मुराविण्याचे खड्डे, तालुका आणि जिल्हा पशुधन सुधारणा संघ व इतर तत्सम संस्था स्थापणें आणि मेंढ्यांच्या सुधारलेल्या पैदाशीचें वांटप यांचा समावेश होतो. सुधारलेल्या कोंबड्या पुरविणें. गुरांचीं प्रदर्शनें व मेळावे भरविणें या गोष्टीहि त्यांत येतात.

**जंगलें**—गांवजंगलें व कुरणें (यांत कुरणाचा व इंधनांकरितां गांवजंगलांचा विकास करावयाच्या उपाययोजनांचा समावेश होतो.)

**समाज कल्याण**—मागासलेल्या वर्गाचा शैक्षणिक विकास—यांत पुढील बाबींसंबंधीच्या उपाययोजनांचा समावेश होतो.

मागासलेल्या वर्गाच्या विद्यार्थ्यांना शिष्यवृत्त्या, नादाऱ्या व परीक्षेची फी देणें, आणि

मागासलेल्या वर्गाच्या विद्यार्थ्यांकरिता वसतिगृहें आणि शाळा स्थापन करणें आणि त्यांची व्यवस्था ठेवणें. यांत वसतिगृहाचें बांधकाम आणि त्यांची व्यवस्था करणें यासाठीं सहाय्यित वसति-गृहांस अनुदानें देण्याचा आणि अशा वसतिगृहांस आणि शाळांस इतर सहाय्य देण्याचा समावेश होतो. परंतु त्यांतून जिल्ह्यापेक्षां अधिक क्षेत्रासाठींचीं वसतिगृहें वगळण्यांत येतील.

मागासलेल्या वर्गांचा आर्थिक विकास : यांत पुढील बाबींचा समावेश होतो:–

शेतीची साधनसामग्री खरेदी करण्यासाठीं व्यक्तिशः शेतकऱ्यांस कर्जाच्या व अर्थ सहाय्याच्या स्वरूपांत आर्थिक सहाय्य देणें;

कुटीरोद्योग आणि उद्योगधंदे यासाठीं व्यक्तिश: कारागिरास कर्जाच्या व अर्थसहाय्याच्या स्वरूपांत आर्थिक साहाय्य देणें;

विमुक्त जातींना चरखे पुरविणें. मागासलेल्या क्षेत्रांत दळणवळणाचा विकास करणें.

सहकारी स्टोअर्सची व्यवस्था ठेवणें आणि कर्मचाऱ्यांच्या व्यवस्थेसाठीं बहुउद्देशीय सहकारी संस्थांस अर्थसहाय्य देणें ( ज्यांचें खेळतें भांडवल, प्रत्येकीं पांच लाख रुपयांहून अधिक नाहीं आणि ज्यांचें अधिकारक्षेत्र जिल्ह्यापेक्षां कमी आहे अशा सहकारी संस्थांशी संबंध येत असेल तेथवर );

हस्तव्यवसायाच्या केंद्रांची स्थापना करणें; आणि गुरांच्या पैदाशीचा आणि कुक्कुटप्रजनन केंद्राचा विकास करणें.

अस्पृश्यतेचें निवारण : यांत पुढील गोष्टींचा समावेश होतो:–

हरिजन सप्ताह साजरे करणें; झुणका भाकर कार्यक्रम घडवून आणणें; सवर्ण हिंदु आणि हरिजन यांच्यांतील आंतरजातीय विवाहास प्रोत्साहन देणें; आणि अस्पृश्यता निवारण्यासाठीं उत्कृष्ट काम करणाऱ्या खेड्यांस बक्षिसें देणें.

मागासलेल्या वर्गाच्या हितसंवर्धनाचे कार्यक्रम : यांत पुढील गोष्टींचा समावेश होतो:–

महिलांच्या आणि बालकांच्या हितसंवर्धनाचे कार्यक्रम व योजना आंखणें; बालवाड्यांची स्थापना करणें व त्यांची व्यवस्था ठेवणें; मागासलेल्या वर्गाच्या विकासासाठीं प्रचार व प्रसिद्धी सुरू करणें; मागासलेल्या वर्गासाठीं करमणुकीचे कार्यक्रम आयोजित करणें; सामाजिक मेळे भरविणें; मागासलेल्या वर्गासाठीं संस्कार केंद्रें, सामूहिक व करमणुकीचीं केंद्रें आणि सामूहिक सभागृहें स्थापणें; विमुक्त जातींना कपडे पुरविणें; औषधें खरेदी करण्यासाठीं व्यक्तींना आर्थिक सहाय्य देणें आणि स्वत: मदत देऊं केलेल्या संस्थांना वैद्यकीय मदत देण्यासाठीं अनुदानें देणें; मागासलेल्या वर्गाच्या इसमांसाठीं घरांची तरतूद करणें; आणि पिण्याच्या पाण्याच्या विहिरींची तरतूद करणें.

मागासलेल्या वर्गांचें प्रशिक्षण, यांत पुढील बाबींचा समावेश होतो:—

प्रशिक्षण शिबिरांचें आयोजन करणें; आणि तांत्रिक प्रशिक्षण आणि पारंपारिक व्यवसायांच्या सुधारलेल्या पद्धतींचें प्रशिक्षण देणें.

**शिक्षण**—प्राथमिक शाळांची आणि मूलोद्योग शाळांची स्थापना, व्यवस्था, त्या सुस्थितींत ठेवणें, त्यांची तपासणी करणें आणि त्यांना भेटी देणें, सहाय्यित शाळांना अनुदानें देणें, पुढील गोष्टी जिल्हा परिषदांच्या कक्षेंत येत नाहींत :—

अभ्यासक्रम ठरवून देणें; पाठ्य पुस्तकें ठरविणें; शिष्यवृत्त्या देण्यासाठीं परीक्षा घेणें; विदर्भांतील प्राथमिक शाळा प्रमाणपत्र परीक्षा आणि चौथ्या वर्गाच्या परीक्षा घेणें; आणि मुंबई प्राथमिक शिक्षण अधिनियम १९४७ अन्वयें राज्य सरकारकडे सुपूर्द केलेले इतर अधिकार वापरणें.

माध्यमिक शाळांची स्थापना, त्या सुस्थितींत ठेवणें, त्यांची तपासणी करणें आणि त्यांना भेटी देणें. परंतु ह्यांतून पुढील गोष्टी वगळण्यांत आल्या आहेत:—

अभ्यासक्रम ठरविणें; पाठ्य-पुस्तकें ठरविणें; परिक्षण अनुदानाचे दर आणि त्यासाठींच्या शर्ती ठरवणें; उच्च शाळांचें उच्चतर माध्यमिक शाळांत रूपांतर करण्यासाठीं परवानगी देणें; फींचे दर व मान्यतेच्या सर्वसाधारण शर्ती ठरविणें; प्राथमिक आणि उंच शाळांच्या शिष्यवृत्तीसाठीं परीक्षा घेणें; आणि सहाय्यक-अनुदान-संहितेनुसार, शिक्षण-संचालकांकडे विशेषरीत्या सोंपविण्यांत किंवा राज्य सरकारकरितां राखून ठेवण्यांत येतील असे इतर अधिकार.

खाजगी माध्यमिक शाळांच्या बाबतींत, अनुदानें व कर्जें याबाबत केवळ शिफारस करणें आणि शिक्षण संचालकांची मंजुरी मिळाल्यानंतर त्यांचें वांटप करणें; प्राथमिक आणि माध्यमिक शिक्षणाच्या संबंधांत विद्यार्थ्यांस कर्जें आणि शिष्यवृत्त्या देणें; माध्यमिक शाळांच्या इमारती बांधणें आणि त्या सुस्थितींत ठेवणें; इतर शैक्षणिक उद्दिष्टें; शाळांसाठीं साधनसामग्री व क्रीडांगणें यांची तरतूद करणें.

**वैद्यकीय**—तालुका दवाखाने आणि तालुका दवाखान्यांच्या दर्जांत वाढ करणें. सिव्हिल आणि कॉटेज रुग्णालयें, त्याचप्रमाणें सिव्हिल रुग्णालयाप्रमाणें असलेलीं इतर मोठीं सरकारी रुग्णालयें वगळून इतर रुग्णालयें, वैद्यक व्यवसायींची अर्थ-सहाय्यित केंद्रें, ग्रामीण वैद्यकीय मदत केंद्रें आणि सार्वजनिक वैद्यकीय मदत यावर देखरेख ठेवणें. पिसाळलेली कुत्रीं चावल्यानंतर, निर्धन इसमावर त्यासाठीं प्रतिबंधक असा इलाज करणाऱ्या संस्थांना आर्थिक-सहाय्य देणें.

**आयुर्वेद**—आयुर्वेदिक व युनानी दवाखाने; (यांत अशा दवाखान्यांना अनुदानें देण्याचा समावेश होतो.) खेड्यांतील आयुर्वेदिक औषधांच्या पेट्यांतील औषधांचा सांठा पुन्हां भरून काढणें.

**सार्वजनिक आरोग्य**—प्राथमिक आरोग्य केंद्रें, फिरती आरोग्य पथकें, वैद्यकीय आणि सार्वजनिक आरोग्यासाठींची एकत्रित पथकें यांची व्यवस्था पाहणें, देवीप्रतिबंधक लस टोचणें, शालेय आरोग्य सेवा. 'यॉज' रोगाविरुद्ध उपचारासाठीं उपाययोजना, प्रसूति व शिशुकल्याण केंद्रें, खेड्यांत औषधी पेट्या ठेवणें, आरोग्य शिक्षणासाठीं सोयी, ग्रामीण साफसफाई, सार्वजनिक आरोग्य रक्षणासाठीं आवश्यक ती उपाययोजना करणें. गलिच्छ वस्त्यांचें पुनर्वसन (त्या कारणांसाठीं खाजगी व्यक्तीस किंवा संस्थांस कर्जें देण्याचा समावेश करून.)

**इमारती व दळणवळण**—ग्रामीण रस्ते, इतर जिल्हा रस्ते, प्रमुख जिल्हा रस्ते, आणि वरील रस्त्यांवरील पूल यांचें बांधकाम, ते सुस्थितींत राखणें व त्यांची दुरुस्ती करणें. ग्रामीण उद्यानें आणि बगीचे (राष्ट्रीय उद्यानें व बगीचे वगळून.) जिल्हा परिषदेच्या गरजांच्या संबधांतील प्रशासन-विषयक आणि इतर इमारतींचे बांधकाम, रस्त्यांव्यतिरिक्त दळणवळणाचीं इतर साधनें, सार्वजनिक नावा, रस्त्याच्या आजूबाजूस झाडें लावणें, छोटे लोहमार्ग व ट्रामचे मार्ग, टेलिफोन लाईन्स यांची जबाबदारी घेणें.

**सार्वजनिक आरोग्यविषयक इंजिनियरिंगचीं कामें**—ग्रामीण पाणीपुरवठा, ग्रामीण विभागांतील जत्रांसाठीं सुरक्षित पाणीपुरवठा, ग्रामीण गटारें, पिण्यासाठीं, स्नानासाठीं किंवा स्वयं-पाकासाठीं लागणारें पाणी दूषित होऊं नये म्हणून त्याचें संरक्षण करण्यासाठीं बांधकाम. (प्रत्येक बाबतींत पांच लाख रुपयांहून अधिक भांडवली खर्चाच्या योजना वगळून.)

**पाटबंधारे**—छोटीं पाटबंधाऱ्यांचीं कामें [ प्रत्येकीं २५० एकर किंवा त्याहून कमी एकर ( जमीन ) भिजविणारी जलसिंचनाचीं कामें. ]

**उद्योगधंदे व कुटीरउद्योग**—स्थानिक उद्योगधंदे, स्थानिक कला ( कुटीरोद्योग व लहान प्रमाणावरील उद्योगधंदे यांचे बाबतींत दहा हजार रुपयांपर्यंतचीं कर्जे मंजूर करण्याच्या मर्यादेपर्यंत. ) जिल्ह्यापेक्षां मोठ्या क्षेत्रासाठीं असलेल्या संशोधन संस्था आणि संस्था वगळून प्रशिक्षण संस्था आणि शाळा. प्रशिक्षण–उत्पादन केंद्रें आणि उत्पादन केंद्रें. विक्री भांडारें व विक्रीचीं दुकानें. वैयक्तिकरीत्या कारागिरांस सहाय्यक अनुदानें व कर्जें देणें. प्रशिक्षण घेणारांस विद्यावेतन देणें. कुटीर उद्योग आणि ग्रामोद्योग यांची वाढ व विकास. कुटीर उद्योग किंवा ग्रामोद्योग यांतील उत्पादना-साठीं विक्रीच्या सोयी उपलब्ध करून देणें. औद्योगिक संस्थांस सहाय्यक अनुदानें व कर्जें देणें. हात-माग; वजनें व मापें अधिनियम यांच्या अंमलबजावणीशीं संबंधित असलेलें अंमलबजावणीचें काम.

**सहकार**—सहकारी संस्थांची नोंदणी ( ज्या संस्थांचें खेळतें भांडवल पांच लाख रुपयांहून अधिक नसेल आणि ज्यांचें अधिकारक्षेत्र एका जिल्ह्यापेक्षां अधिक नाहीं, केवळ अशाच संस्थांच्या बाबतींत. ) सहकारी संस्थांची वाढ करणें आणि त्यांची व्याप्ति वाढविणें ( सर्व प्रकारच्या सहकारी संस्थांच्या बाबतींत. ) राज्य सरकारकडून आर्थिक–साहाय्य मिळण्यासाठीं सहकारी संस्थांच्या अर्जांचें प्रवर्तन करणें. शेअर भांडवलांत सहभागी होण्याच्या बाबतींत सहकारी संस्थांचें ( सहकारी संस्थांच्या रजिस्ट्रारकडून निर्दिष्ट करण्यांत येतील अशा ) अर्जांचें, संयुक्त संस्थांकडे प्रवर्तन करणें. ज्या बाबतींत, सहकारी संस्थांच्या रजिस्ट्रारनें घालून दिलेल्या शर्तींप्रमाणें राज्य सरकार ज्या संस्थांचे शेअर घेऊं शकते अशा सहकारी संस्थांचे शेअर घेणें. शेतमाल विक्रीवर देखरेख नियंत्रण ठेवणें ( हें देखरेखीचें व नियंत्रणाचें काम केवळ जिल्हापातळीवरीलच असेल. )

**प्रकाशन**—फिरत्या प्रकाशन गाड्या, जिल्हा प्रदर्शनें आयोजित करणें,करमणुकीच्या कार्य-क्रमाद्वारें प्रसिद्धि, ग्रामीण विभागासाठीं नभोवाणीचे कार्यक्रम.

**सामूहिक विकास**—सामूहिक विकास कार्यक्रम. स्थानिक विकास कामांचा कार्यक्रम.

**समाज शिक्षण**—सामूहिक मनोरंजन केंद्रें, प्रौढ साक्षरता केंद्रें, क्रीडा, क्रीडांगणें, सामग्री, इत्यादि आणि कल्याणकारी संघटना, किसान मेळे, बाहेरील भागांना भेटी देण्याचा कार्यक्रम आंखणें, माहिती वितरण, अल्पमुदतीचीं शिबिरें, महिला संघटना व कल्याण, शिशु–संघटना व कल्याण, फिरत्या चित्रपट गाड्या, ग्रंथालय आणि वाचनालयें, जत्रा, देखावे आणि प्रदर्शन, ग्रामीण घरबांधणी.

**संकीर्ण**—ग्रामोद्धार, आदर्श गांवें वसविणें ( त्यासाठींची अनुदानें आणि कर्जें धरून ), खेड्याचें आर्थिक कल्याण, लोकांचें आरोग्य सुरक्षितता, सुख किंवा सोय यांची ज्यामुळें वाढ होण्याचा संभव आहे अशी स्थानिक स्वरूपाचीं कामें, बाजार, धर्मशाळा, विश्रामगृहें, मुसाफिरखाने, सराई वगैरे, चावड्या, इतर सार्वजनिक संस्था, औद्योगिक बेकारी वगळून ( इतर ) स्थानिक बेकारी, गांवठाणांची सुधारणा करणें व तीं वाढविणें ( त्या कारणासाठीं द्यावयाचीं अनुदानें व कर्जें धरून ), नवीन गांवठाणे वसविणें ( त्या कारणासाठीं द्यावयाचीं अनुदानें व कर्जें धरून) जिल्हा परिषदेच्या कर्मचाऱ्यांचें स्वास्थ्य, जिल्हा परिषदेच्या कर्मचाऱ्यांसाठीं घरांची तरतूद, सार्वजनिक जागांत आणि उद्यानांत झाडें लावणें व त्यांची जोपासना करणें, रानटी जनावरांचा नाश करण्याबाबत बक्षिसें देणें, जाहीर सत्कार, समारंभ आणि मनोरंजन, स्थानिक यात्रांबाबत व्यवस्था करणें, दफनभूमि व दहन भूमि ( प्रेतांची विल्हेवाट लावण्याचें काम धरून ) यांची व्यवस्था ठेवणें, ग्राम पंचायतीचे पंच, सरपंच आणि बिनसरकारी इसम यांचीं संमेलनें भरविणें, स्थानिक भटक्या गरीब लोकांना मदत, गरीबांसाठीं घरांची व्यवस्था करणें.

# पंचायत समितीच्या अधिकार क्षेत्रांतील कामें

**शेतकी**--खरीप व रबी पीक मोहिमा; प्रकृष्ट भातशेतीची लागवड; शेतीची प्रगति व सुधारणा; सुधारलेल्या शेतीपद्धतीचें प्रात्यक्षिक व त्याबाबत प्रचार करणें आणि नमुनेदार शेतकी संस्था स्थापन करणें व त्या सुस्थितींत ठेवणें; शेतीविषयक सुधारलेल्या अवजारांचा प्रचार करणें; फळें व भाजीपाला यांच्या उत्पादनांत वाढ करणें; गुदामें बांधणें व त्यांची व्यवस्था ठेवणें; रासायनिक खतें, शेतीचीं अवजारें व शेतीसाठीं लागणारें लोखंड, पोलाद व सिमेंट यांचे वांटप करणें.

**पशुसंवर्धन**--खेड्यांतील पशुवैद्यकीय पेट्या; पशुवैद्यकीय साहाय्य केंद्रें; तालुका पशुधन सुधारणा संघ व तशाच प्रकारच्या संस्था स्थापन करणें; वैरण सुधारण्याच्या जागा; वैरण मुरवावयाचे खड्डे; कोंबड्यांच्या सुधारलेल्या पैदाशीचें वांटप; मेंढ्यांच्या सुधारलेल्या पैदाशीचें वांटप, गुराढोरांचीं प्रदर्शनें व मेळावे भरविणें.

**जंगलें**—गांव जंगलें व कुरणें. (चांगल्या प्रतीचें गवत लावण्याच्या कार्याचा समावेश करून); कुरण व जळण यांच्या कारणासाठीं गांव शिवारांच्या विकासासाठीं उपाययोजना.

**समाजकल्याण**—मागासलेल्या वर्गांचा आर्थिक विकास, यांत पुढील गोष्टींचा समावेश होतो :—शेतीची साधनसामग्री खरेदी करण्यासाठीं कर्जे व अर्थसहाय्य यांच्या रूपानें व्यक्तिशः शेतकऱ्यास आर्थिक साहाय्य देणें; कुटीरोद्योग व व्यवसाय यांसाठीं कर्जे व अर्थसाहाय्य यांच्या रूपानें व्यक्तिशः कारागिरांना आर्थिक साहाय्य देणें; विमुक्त जातींना चरखे पुरविणें; हस्तव्यवसाय केंद्रांची स्थापना करणें.

**अस्पृश्यता निवारण**—यांत पुढील गोष्टींचा समावेश होतो–

हरिजन सप्ताह साजरे करणें; सवर्ण हिंदु व हरिजन यांच्यांतील आंतरजातीय विवाहांस प्रोत्साहन देणें; आणि

**मागासलेल्या वर्गांच्या हितसंवर्धनाचे कार्यक्रमः**--यांत पुढील गोष्टींचा समावेश होतोः— महिलांच्या व बालकांच्या हितसंवर्धनाचे कार्यक्रम व योजना; बालवाड्यांची स्थापना करणें व त्यांची व्यवस्था ठेवणें; मागासलेल्या वर्गांच्या विकासासाठीं प्रचार व अशा कार्यक्रमास प्रसिद्धि देणें; मागासलेल्या वर्गांसाठीं करमणुकीचे कार्यक्रम आयोजित करणें; सामाजिक मेळे भरविणे; मागासलेल्या वर्गांसाठीं संस्कार केंद्रें, सामूहिक व करमणुकीची केन्द्रें आणि सामूहिक सभागृहें बांधणें; विमुक्त जातींना कपडे पुरविणें; औषधें खरेदी करण्यासाठीं व्यक्तींना आर्थिक सहाय्य देणें आणि स्वतःहून मदत देऊं केलेल्या संस्थांना वैद्यकीय मदत देण्यासाठीं अनुदानें देणें; मागासलेल्या वर्गांच्या इसमांसाठीं घरांची तरतूद करणें; आणि पिण्याच्या पाण्याच्या विहिरींची तरतूद करणें.

**शिक्षणः**--प्राथमिक शाळेच्या इमारती बांधणें व त्या सुस्थितींत ठेवणें. प्राथमिक शाळांसाठीं साहित्य व खेळाचीं मैदानें यांची तरतूद करणें.

**वैद्यकीयः**--वैद्यक व्यवसायींची अर्थ सहाय्यित केंद्रें; ग्रामीण वैद्यकीय मदत केंद्रें;

**आयुर्वेदः**--खेड्यांतील आयुर्वेदिक औषधांच्या पेट्यांतील औषधांचा सांठा पुन्हां भरून काढणें.

**सार्वजनिक आरोग्यः**—प्रसूति व शिशुकल्याण केंद्रें; खेड्यांत औषधी पेट्या ठेवणें; ग्रामीण साफसफाई; सार्वजनिक आरोग्यरक्षणासाठीं आवश्यक ती उपाययोजना करणें.

**इमारती व दळणवळण**:--ग्रामीण रस्ते बांधणें, ते सुस्थितींत ठेवणें व त्यांच्या दुरुस्त्या; ग्रामीण रस्त्यावर पूल व नाले बांधणें; सार्वजनिक ( तरी ) नावा. रस्त्यांच्या आजूबाजूस झाडे लावणें;

**सार्वजनिक आरोग्यविषयक इंजिनीअरिंगची कामें**:--ग्रामीण पाणीपुरवठ्याच्या विहिरी; गावांत जमिनीच्या पृष्ठभागांवर गटारे बांधणें.

**कुटीरोद्योग**:--वैयक्तिकरीत्या कारागिरांस सहाय्यक अनुदानें व कर्जे देणें; कुटीरोद्योग व ग्रामोद्योग यांची वाढ व विकास करणें;

**सहकार**—सहकारी चळवळीची वाढ करणें व तिची व्याप्ति वाढविणें.

**प्रकाशन**—ग्रामीण नभोवाणी कार्यक्रम, करमणुकीच्या कार्यक्रमाद्वारें प्रसिद्धि.

**सामाजिक विकास**—समाज विकास कार्यक्रम, स्थानिक विकास कामांचा कार्यक्रम.

**समाजशिक्षण**—समाज मनोरंजन केंद्रें; प्रौढ साक्षरता केंद्रें, क्रीडा, क्रीडांगणें, सामग्री आणि कल्याणकारी संघटना, शेतकऱ्यांचे मेळावे, बाहेरील भागांना भेटी देण्याचा कार्यक्रम आंखणें, माहिती वितरण, अल्पमुदतीचीं शिबिरें, महिला संघटना व कल्याण, शिशु संघटना व कल्याण, फिरत्या चित्रपट गाड्या, ग्रंथालयें व वाचनालयें, जत्रा, देखावे व प्रदर्शनें.

**संकीर्ण**—ग्रामीण घर बांधणी, ग्रामोद्धार, आदर्श गांव बसविणें (त्यासाठींची अनुदानें व कर्जें धरून), खेड्यांचे आर्थिक कल्याण, लोकांचें आरोग्य, सुरक्षितता, सुख किंवा सोय यांची ज्यामुळें वाढ होण्याचा संभव आहे अशी स्थानिक स्वरूपाचीं कामें, बाजार, धर्मशाळा, विश्रांतिगृहें, मुशाफिरखानें, सराई वगैरे, चावड्या, इतर सार्वजनिक संस्था, औद्योगिक बेकारी वगळून इतर स्थानिक बेकारी, गांवठाणाची सुधारणा करणें व ती वाढविणें (त्यासाठीं द्यावयाचीं अनुदानें व कर्जें धरून), नवीन गांवठाण बसविणें (त्यासाठीं द्यावयाचीं अनुदानें व कर्जें धरून), सार्वजनिक जागा व बागा यामध्यें झाडें लावणें व त्यांची जोपासना करणें. रानटी जनावरांचा नाश करण्याबाबत बक्षिसें, जाहीर सत्कार व समारंभ आणि मनोरंजन, स्थानिक यात्रांबाबत व्यवस्था करणें, ग्रामपंचायतींचे पंच, सरपंच व बिनसरकारी इसम यांची संमेलनें, स्थानिक भटक्या गरीब लोकांना मदत, गरीबांसाठीं घरांची व्यवस्था करणें.

—०००—

# कांहीं लोकोपयोगी संस्था

**विद्युत् निर्मिती आणि ग्रामीण विद्युतीकरण**

औद्योगिकरणाने राष्ट्रीय विकासाच्या प्रगतींत ज्याप्रमाणें गति निर्माण होते त्याचप्रमाणें समाजाच्या सर्वांगीण उन्नतीकरिता उपलब्ध राष्ट्रीय संपत्तीचा पूर्णपणें विनियोग विद्युत् शक्तीच्या साह्याने जलद गतीने होऊं शकतो. अन्नोत्पादनापासून तो थेट विकास आघाडीवरील औद्योगिकरणाच्या सर्व क्षेत्रांत विद्युत् शक्ति आवश्यक अशी बाब ठरू पाहत आहे. परभणी जिल्ह्यांत आतांपावेतो विद्युतीकरण योजनेबद्दल कांहींच प्रगति नव्हती. तथापि हिंगोली शहरांत आणि खास परभणीस एकेक विद्युतगृह स्थापन झाले असून ह्या दोन्ही ठिकाणीं विजेचा संचार झाला आहे. बाकीच्या ठिकाणीं लवकरच विजेचा पुरवठा केला जाईल.

**प्रसिद्धि आणि सामुदायिक श्रवण**

ग्रामीण विभागांतील जनतेला राज्य व राष्ट्र उभारणीच्या प्रगतीपर कार्याची चलचित्रपटाद्वारें माहिती देऊन विकास कार्यांतील त्यांची सुप्त शक्ति जागृत करण्याचे काम प्रसिद्धि विभागातर्फें करण्यांत येते. त्याचप्रमाणें चालू घडामोडीची माहिती, विविध खात्यासंबंधींची माहिती व कार्याची प्रगति, हस्तपत्रिका व पोस्टर्स आदींच्या सहाय्यानें ग्रामीण विभागांपर्यंत पोहचविली जाते. प्रसिद्धि विभागाला एक मोटार असून त्यांत चित्रपटाचें संपूर्ण साहित्य असते. संपूर्ण जिल्ह्यांत चित्रपट प्रकाशनानें ग्रामीण जनतेचें मनोरंजन व लोकशिक्षण केलें जाते असून प्रसिद्धि कचेरी परभणी येथें आहे. फिरत्या गाडींतून चलचित्रपट दाखविण्याचें काम आतां जिल्हा परिषदेकडे सोपविण्यांत आले आहे.

**जिल्हा माहिती केंद्र**

जिल्ह्यांतील विविध विभागाने केलेल्या कार्यांच्या प्रगतीचा वृत्तांत नकाशे, छायाचित्रें व मॉडेल्स याद्वारें संकलित करून परभणी येथील जिल्हा माहिती केंद्रांत ठेवला असून त्यांत प्रमुख दैनिकें, साप्ताहिके व मासिकें तसेंच सर्व प्रकारची सरकारी माहितीयुक्त पुस्तके मोफत वाचण्यासाठीं ठेवण्यांत आली आहेत. जिल्ह्यांतील वृत्तपत्रांचे संपादक व वृत्तपत्रप्रतिनिधींना जिल्ह्यांतील विविध विकास कार्यांच्या प्रगतीचें प्रत्यक्ष अवलोकन करतां यावे व जनतेसमोर असे कार्य असावें म्हणून प्रसिद्धि विभागातर्फें पत्रकारांना विकास कार्ये दाखविण्यांत येतात.

**सार्वजनिक श्रवणासाठीं रेडिओ**

महाराष्ट्र सरकारच्या प्रसिद्धि खात्याच्या ग्रामीण रेडिओ विभागातर्फे सामुदायिक श्रवणासाठीं ग्रामपंचायती, सहकारी संस्था, नगरपालिका अथवा यासारख्या जबाबदार संस्थांना रेडिओ सेटस् मिळूं शकतात. सुरवातीला रेडिओ बसविण्याची वर्गणी १७५ रुपये व त्याचा वर्षभराचा दुरुस्ती व बॅटरीचा खर्च ६० रुपये भरावा लागतो व त्यानंतर दरवर्षाला ६० रुपये वर्गणी भरावी लागते. या जिल्ह्यांतील रेडिओ बसविण्यासाठीं व त्यांची व्यवस्था पाहण्यासाठीं एका स्वतंत्र टेक्निशियनची नेमणूक करण्यांत आली असून त्याची कचेरी परभणी येथें आहे. त्याच्याकडे स्वतंत्र

मोटार दिली असून नवीन रेडिओ बसविण्याचें काम तसेंच बसविलेल्या रेडिओच्या दुरुस्तीचे काम ते पाहत असतात. ग्रामीण रेडिओ विभागाचें हें कार्यहि आतां जिल्हा परिषदेकडे सोंपविलें आहे.

**ग्रामीण नभोवाणी मंडळ**—अखिल भारतीय आकाशवाणीच्या प्रादेशिक केंद्रावरुन ग्रामीण विभागांतील श्रोत्यांकरिता खास कार्यक्रम मराठींतून प्रसारित करण्यांत येतात. ग्रामीण भागांतील शेतकरी वर्गात या कार्यक्रमानें इतकी आपुलकी निर्माण झाली आहे कीं, कार्यक्रम ऐकल्यानंतर त्यावर ते चर्चा करतात व आपलीं मते संबंधित केंद्राधिकाऱ्यास कळवितात. त्यांच्या मताचा योग्य तो विचार केला जातो व कार्यक्रमांतून त्यांच्या प्रश्नांचीहि उत्तरें देण्यांत येतात. या जिल्ह्यांतील ग्रामीण विभागांत आतांपावेतो बसविण्यांत आलेले रेडिओ पुढीलप्रमाणें आहेत.—

१) परभणी तालुका–१२ (२) कळमनुरी तालुका–२ (३) जिंतूर तालुका–१ (४) परतुड तालुका–१ (५) पाथरी तालुका–१ (६) गंगाखेड तालुका–६ (७) वसमत तालुका–३ (८) परभणी शहर–१

**टपाल व तार खातें**:—डोंगरकपारीच्या भागांतून वस्ती करून राहिलेल्या या जिल्ह्यांतील जनतेचा बाहेरील जगाशीं संबंध ठेवण्याचें व त्यांच्या हितसंबंधांची देवाणघेवाण करण्याचें काम टपाल व तारखात्यामार्फत केलें जातें. लहान मोठ्या वस्तीची या जिल्ह्यांत १५०० खेडीं असली तरी पोस्ट विभागानें पोस्ट कचेऱ्यांमार्फत बहुसंख्य ग्रामीण जनतेची टपाल मिळण्याची व पाठविण्याची सोय केलेली आहे. परभणी हें जिल्ह्यांतील पोस्टाचें प्रमुख केंद्र आहे.

**पोस्ट ऑफिसे** :—जिल्ह्यांतील पोस्ट व तारखात्याच्या व्यवस्थेप्रमाणे जिल्ह्याचे विभाग पाडण्यांत आले आहेत.

**दूरध्वनि व तारव्यवस्था**:—जिल्ह्यांतील सब् पोस्ट ऑफिसें खालील ठिकाणीं आहेत:– १) वसमतनगर (२) जिंतूर (३) गंगाखेड (४) हिंगोली (५) मानवत (६) पालम (७) परतूड (८) पाथरी (९) पूर्णा (१०) सेलू (११) परभणी स्टेशन (१२) सोनपेठ (१३) सातोनासुपणे (१४) कळमनुरी. दूरध्वनीचीं स्वतंत्र केंद्रें जिल्ह्यांत पांच ठिकाणी असून ती पुढीलप्रमाणें आहेत. (१) परभणी (२) सेलू (३) मानवत (४) परतूड आणि (५) हिंगोली व पब्लिक कॉल ऑफिसेस १० ठिकाणीं आहेत.

**वृत्तपत्रें**—परभणी जिल्ह्यांत एकहि मासिक प्रकाशित होत नाहीं. ह्या ठिकाणीं फक्त एक हिंदी आणि तीन मराठी अशीं चार वृत्तपत्रें प्रसिद्ध होतात. " परभणी समाचार " हें हिंदी वृत्तपत्र असून ते साप्ताहिक आहे व ते नियमितपणे शनिवारी प्रकाशित होते. तसेंच " जागृति " हें मराठी साप्ताहिक गुरुवारी व "तरुण महाराष्ट्र"हि त्याच दिवशीं प्रकाशित होतें. तसेंच मराठी 'लोककल्याण' दर गुरूवारी प्रसिद्ध होतें.

**मनोरंजनाची गृहें**—या जिल्ह्यांत स्थानिक स्वरूपाचीं १४ थिएटर्स व तीन फिरतीं मनोरंजनगृहें आहेत. स्थानिक मनोरंजन गृहें खालील भागांतून आहेत. परभणी, गंगाखेड, पाथरी, हिंगोली, जिंतुर, परतुड आणि फिरती मनोरंजन गृहें परतुड, कळमनुरी आणि वसमत.

**जिल्हा अल्पबचत सहकार मंडळ**

राष्ट्रउभारणीच्या कामी प्रत्येकाचा हात लागावा आणि अधिक संपन्नतेचें जीवन जगतां यावें या दृष्टीनें ग्रामीण पातळीवरहि अल्पबचतीचें कार्य नेऊन पोहोचविण्याकरितां विविध क्षेत्रांतील व्यक्ति, कार्यकर्ते आणि सरकारी अधिकाऱ्यांचें जिल्हाधिकाऱ्यांच्या अध्यक्षतेखालीं एक अल्पबचत सल्लागार मंडळ कार्य करीत असून त्यांची कचेरी परभणी येथें आहे. या जिल्ह्यांत सरकारी व बिन सरकारी कचेऱ्या आणि विद्यार्थी व शिक्षक यांचे बचत गट स्थापन झाले असून ते निश्चित उत्पन्नांतून नियमित बचतीचें उल्लेखनीय कार्य करीत आहेत.

**समाज कल्याण मंडळ**—मध्यवर्ती समाज कल्याण मंडळाची परभणी येथें कचेरी असून त्यामार्फत महिलांकरितां शिवण कामाच्या शिक्षणाचे वर्ग चालविण्यांत येतात. तसेंच ग्रामीण भागांत स्त्रिया व मुलांच्या आरोग्य संवर्धनाच्या योजनांचे कामहि वरील मंडळातर्फे केलें जातें.

**जिल्हा स्टॅटिस्टिकल व दारूबंदी कचेरी**

जिल्ह्यांतील विविध विभागानें केलेल्या कार्याच्या प्रगतीची आंकडेवार माहिती एकत्र आणण्याचें कार्य जिल्हा स्टॅटिस्टिकल कचेरीमार्फत होत असून स्टॅटिस्टिकल अधिकाऱ्यांची कचेरी परभणी येथें अलिकडेच सुरू झाली आहे. जिल्ह्यांतील विविध विभागांच्या प्रगतीची माहिती वरील कचेरीमुळें उपलब्ध होऊं शकेल. परभणी येथें दारूबंदी अधिकाऱ्यांची कचेरी असून सांस्कृतिक व करमणुकीचे कार्यक्रम ग्रामीण भागांत ठेवून जनतेच्या मत परिवर्तनाचें कार्य या विभागातर्फे केलें जातें. तसेंच खात्यामार्फत नशायुक्त पदार्थ व द्रवावरहि नियंत्रण ठेवलें जातें.

**मराठवाड्यांत दारूबंदी कायद्याची अंमलबजावणी**

पहिल्या आणि दुसऱ्या पंचवार्षिक योजनेच्या काळांत महाराष्ट्र सरकारनें जे विकासाचे खास प्रयत्न केले आहेत आणि त्या प्रयत्नांचा जो फलस्वरूप फायदा जनतेस मिळाला, त्यांत दारूबंदीचा प्रामुख्यानें समावेश करावा लागेल. त्यासंबंधीचा दारूबंदीचा कायदा मराठवाड्यांत १ एप्रिल १९५९ पासून लागू करण्यांत येऊन सिंदी, दारू आणि अफू व गांजा यासारखीं मादक पदार्थांची दुकानें कायदेशीरपणें बंद करण्यांत आली. अल्पकालपर्यंत सरकारी परवान्यावर कांहीं लोकांना खास कारणांसाठीं मद्यपानाची मुभा देण्यांत आली असली तरी क्रमाक्रमानें ही संख्या घटत जाऊन आतां तर संबंधित खात्याकडून फक्त दारूचे दोन व अफूचे एक परमिट चालू आहे.

**दारूबंदी प्रचार अधिकाऱ्यांची नेमणूक**

मराठवाड्यांत ही योजना अंमलांत आणण्यासाठीं प्रथमतः एका प्रचारक अधिकाऱ्याची जिल्हा पातळीवर नेमणूक करण्यांत आली व त्यास प्रचारकार्यास्तव एक मोटार देण्यांत येऊन तिच्याद्वारा दारूबंदीचा प्रचार केला गेला. सरकारचें दारूबंदीचें धोरण सर्वत्र जाहीर झालें. या सरकारी महत्वपूर्ण धोरणास अनुसरून रयतेनेंहि सहकार्य केलें व प्रत्येक मौज्यांत ग्रामपंचायत समित्या स्थापन केल्या. शेकडो भजनी मंडळानीं मद्यपानानें धुंद असलेल्यांना आपल्या अभंगवाणीनें गुंग करून या दुर्व्यसनाची चटक दूर केली आहे. कित्येक कीर्तनकारांनीं आपल्या अमोलिक सुभाषितानीं जनतेवर दारूबंदीचा प्रभाव गाजविला. दारूबंदीचे फायदे लोकांना प्रभावीपणें समजावून देण्यासाठीं कीर्तन, कलापथकें वगैरे माध्यमांचाही मोठ्या प्रमाणावर उपयोग केला जातो.

**मानवत व वसमत या ठिकाणीं संस्कार केन्द्राची स्थापनाः**——तसेंच दारूबंदीच्या प्रचारकार्यास्तव मानवत व वसमत या ठिकाणीं दोन संस्कार केन्द्रांची स्थापना करण्यांत येऊन त्याद्वारा या दुर्व्यसनास आळा घालण्याचे पद्धतशीर व महत्वपूर्ण कार्य केलें गेलें.

महाराष्ट्र सरकारच्या या समाज हितदक्ष धोरणामुळें हजारो मद्यपी लोकांचे संसारी जीवन सुखी झालें असून सरकार नियोजित औद्योगिकरणांत हे लोक अत्यंत उत्सुकतेनें भाग घेत आहेत. अशीं कित्येक ठळक उदाहरणें गांवोगांवीं प्रत्यक्ष पाहण्यास मिळतील. सरकारने हेतुपुरःसर पत्करलेल्या दारूबंदीचा शुद्ध हेतू संस्कारिक दृष्टया व कायदेशीर रीत्या उपयुक्त ठरला असून अनेकांना प्रगतीचा सुगम मार्ग सांपडला आहे. हे दुसऱ्या पंचवार्षिक योजनेंतील महत्वपूर्ण यश आहे.

**कामगार केंन्द्राची स्थापना**

दुसऱ्या योजनेत कामगार कल्याणाच्या क्षेत्रांत बरेच उपयुक्त काम करण्यांत आले. परभणी जिल्ह्यांत दुसऱ्या पंचवार्षिक योजनेच्या काळांत ८ कामगार कल्याण केंद्रें स्थापन करण्यांत येऊन ८ वाचनालयें उघडण्यांत आलीं. कामगारांना शिक्षण देण्यासाठीं ३१ प्रौढ शिक्षणाचे वर्ग चालू करण्यांत आले व मजुरांसाठीं एक सरकारी औद्योगिक प्रशिक्षण कारखाना उघडण्यांत आला. कामगार केन्द्रांमधून देशी व विदेशी, बैठ्या व मर्दानी खेळांची व्यवस्था करण्यांत आलेली आहे. कॅरम, हार्मोनियम, व्हॉलीबॉल, फूटबॉल, टेनिस वगैरेंच्या साहित्याची तरतूद करण्यांत आली आहे. या व्यवस्थेमुळें कामगार आपला रिकामा वेळ दारू पिण्यांत किंवा इतर अनावश्यक बाबतींत खर्च न करतां ते उपरोक्त केंद्रांतून ठेवण्यांत आलेली वर्तमानपत्रें, मासिकें इत्यादींचें वाचन करण्यांत किंवा खेळ खेळण्यांत अथवा कलासाधनेंत व्यतीत करतात.

मजूर खात्याच्या या कल्याणकारी कार्यांमुळें कामगार वर्गांत व जनतेत शिक्षणाची गोडी निर्माण झाली आहे. नवनवीन व्यवसाय शिकण्याची इच्छा त्यांच्यांत निर्माण होऊ लागली आहे. शिवाय मजुरांच्या आरोग्यांत व जीवनमानांत सुधारणा झाली आहे.

**उद्योग विनिमय केंद्र**

योग्य कार्यासाटीं योग्य माणसांची निवड करून अशा इसमांना नोकरी देणे हे उद्योग विनियम केंद्राचें काम आहे. पहिल्या पंचवार्षिक योजनेच्या काळांत परभणी जिल्ह्यांसाठीं अशा केंद्रांची तरतूद नव्हती. दुसऱ्या पंचवार्षिक योजनेच्या काळांत मात्र ता. १ फेब्रुवारी १९६१ पासून परभणी येथें उद्योग विनिमय केंद्राची स्थापना करण्यांत आली. ह्या केन्द्राने ४०९ इसमांची नांवे नोंदवून ३३५ जागा घोषित केल्या व अडतीस इसमांना रोजगार दिला. १९६०–६१ सालीं केंद्रामधील रजिस्टरवर २०१ लोकांची नांवे होती. नोकऱ्यांच्या शोधांत असलेल्या लोकांना ह्या केन्द्राचे माध्यम फार उपयोगी ठरले आहे.

# हौशी प्रवाश्यांचीं आकर्षणें

भारतीय शिल्पकला ही अत्यंत प्राचीन व नांवलौकिकास पात्र झालेली असून आज ठिकठिकाणीं ह्या कलेचे अवशेष विखुरलेले आढळतात. हौशी प्रवाशांचे जसे हे एक आकर्षण असते तसेच गतकाळांतील ऐतिहासिक, सांस्कृतिक व आर्थिक परिस्थितीचें अवलोकन ह्या अवशेषांवरून प्रवाश्यांना करतां येते. ऐतिहासिक दृष्टीनें परभणी जिल्ह्यांतील खालील स्थळें महत्वाचीं समजली जातात.

**औंढा नागनाथ**

भगवान श्री शंकराचें हें एक सुप्रसिद्ध क्षेत्र होय. भारतांतील बारा ज्योतिर्लिंगापैकीं असलेल्या ह्या स्थळाचें महत्व अवर्णनीय आहे. याच्या स्थापनेचा इतिहास थेट पांडव कालापर्यंत पोंचतो. येथील निसर्गशोभा व शिल्पकला मानवास थक्क करणारी आहे. हजारों मनुष्याकृति, घोडे, हत्ती, बैल यांचे मंदिरावरील शिल्प प्रेक्षणीय आहे. या मंदिरांतील नागनाथाची प्राणप्रतिष्ठा युधिष्ठरानें केली असल्याचा उल्लेख कावेरी खंड पद्मपुराणांत आहे. अमर्दकाचा पंचक्रोश, निसर्गशोभेनें समृद्ध असा आहे. तेथें असलेली लहान मोठीं सरोवरें, मठ मंदिरें, चैत्यालयें, यांचे अवलोकन करण्यांतच मानव मति कुंठीत होते. या साऱ्याप्रमाणें चरक संहितेच्या अभ्यासकास वनौषधी कंदमुळाचा भरपूर सांठा येथें मिळतो.

नागनाथाचें मंदिर अतिप्राचीन व पौराणिक असून ७,२०० चौ. फूटावर हे उभारण्यांत आलेले आहे. मंदिराची एकूण उंची ६० फूट आहे. येथील चैत्यालयाच्या स्थापनेचा इतिहास राष्ट्रकुट कालीन असून औंढ्याचें नांव अमर्दक क्षेत्र असल्याचा उल्लेख खोट्टिग, राष्ट्रकूट यांच्या शके ८९३ मधील ताम्रपटांत आला आहे. औंढा नागनाथाचें द्वार फिरविण्यास कारणीभूत झालेले संत नामदेव व त्यांचे गुरु विसोबा खेचर यांच्या समाध्या गाभाऱ्यात व बाहेर आहेत. आपल्या भक्तिभावाने पंढरीच्या विठ्ठलाला बोलके करणाऱ्या नामदेवाला सर्वभूतीं परमेश्वर असल्याचा साक्षात्कार विसोबा खेचरांनी याच स्थळी पटविला.

पूर्णा–हिंगोली ह्या रेल्वे मार्गावरील स्टेशनपासून औंढा बारा मैल आहे. तसेच परभणीपासून हे स्थळ ५१ मैल असून त्या ठिकाणी जाण्यास एस. टी. ची व्यवस्था आहे. जिंतूरहून नांदेडकडे निघाले असतांहि एस. टी. मार्गानें औंढ्यास जातां येते.

**नरसी**:—एके काळचे तालुक्याचे ठिकाण असलेले नरसी हे गांव अद्यापहि आपल्या वैभवाची साक्ष देते. या ठिकाणी हेमाडपंती नारसिंहाचे एक अप्रतिम असें देवालय आहे. सुप्रसिद्ध संतकवि श्री नामदेव यांनी येथे वास्तव्य केले होते. हे स्थान औंढ्यापासून १५–२० मैलावर असून

असे म्हणतात कीं, श्री नामदेव आपल्या पूर्वायुष्यांत औंढ्या नागनाथाच्या दर्शनाला दररोज जात असत.

**हिंगोली**:—पूर्वीचे हिंगूल म्हणजेच आजचे हिंगोली. एक निसर्गरम्य सरोवर व नानाविध देवालयानी नटलेलें असें हें गांव आहे. खाकेबुवाचा मठ आणि दत्त सांप्रदायिकांच्या आत्मार्पणाची साक्ष देणारे दत्त मंदिर येथेच आहे. स्फटिकाची दत्त मूर्ती व कयाधू नदीचा कांठ हें एक विसाव्याचे स्थळ बनलें आहे. हिंगोली हे परभणीपासून ६५ मैलावर असून या ठिकाणी एस. टी. ने जाता येते.

**नांदापूर**:—चापनाथाचा महादेव शिखरावर असून शंभर वर्षापूर्वीच्या प्रभावती-मधील हे दुसऱ्या प्रतीच्या यात्रेचे स्थान होय. हे कयाधू नदीच्या कांठी वसलेले असून नवनाथांच्या वर्तुळांतील एक स्थळ आहे. आजच्या मराठवाड्यांतील साहित्यिकांच्या पिढीचे अग्रणि कैलासवासी डॉ. नांदापूरकर यांची ही मायभूमि आहे. या ठिकाणी परभणीहून रेल्वेने जातां येते.

**चौंडी अंबा**:—येथील टोकाईचे माता मंदिर, शहाजी भोसल्यांच्या इतिहासाची साक्ष देते. हे संपूर्ण गांव भोसल्यांचें आहे व शहाजीकालीन महालहि येथे आहे. येथील पवमानाच्या महादेवाचे मंदिर प्रेक्षणीय आहे. औंढी हे रेल्वे स्टेशन असून प्रवाशांना ह्या ठिकाणीं रेल्वेने जातां येते. पूर्णा हिंगोली रेल्वे मार्गावर हे स्थानक आहे.

**बामणी**:—सरस्वती व अन्नपूर्णा देवींचीं मंदिरे येथें आहेत. हीं मंदिरे एक हजार वर्षापूर्वीची असावीत असे म्हणतात.

**कुलपाक**:—जैन धर्मीयांचे हें प्रसिद्ध क्षेत्र होय. येथे जैनांचीं प्राचीन मंदिरे असून अखिल भारतांतून जैन लोक येथे दर्शनासाठीं येत असतात. याच ठिकाणी हिंदूंचीहि प्राचीन मंदिरे असून संस्कृत भाषेमध्यें खोदलेले शिलालेख येथें आढळतात. त्यावरून या स्थळांचे प्राचीन ऐश्वर्य आणि वैभव याची साक्ष पटते. आलेर रेल्वे स्टेशनपासून कुलपाक ४ मैल आहे. या स्थळापर्यंत वाहनासाठीं पक्की सडक तयार करण्यांत आली आहे.

**परभणी**:—पूर्वी ह्यास प्रभावती असे म्हणत. ह्या ठिकाणी प्रभावतीचे मंदिर होते असेहि म्हणतात. देशपांडे घराण्यांतील सत्पुरुष हंसराज यांनी लिहिलेले वेदांतपर ग्रंथ प्रसिद्ध आहेत.

**खैरी** :—हिंगोली तालुक्यांतील ह्या गांवाच्या सभोंवती ३० फूट उंचीची व १२०० चौरस फूटांची मजबूत भिंत अद्याप उभी आहे. हें हिंदू मुसलमानांचें यात्रा स्थान आहे. हेमाडपंती देवालयें या गांवी मोठ्या प्रमाणावर आढळतात.

**पाथरी—पार्थपूर** :—या गांवाचे नाव पार्थपूर अथवा पार्थनगरी असल्याचा उल्लेख शके १६३७ मध्यें लिहिलेल्या लक्ष्मी नृसिंह सुत श्रीधराच्या जैमिनी अश्वमेधांत आढळतो. या ठिकाणीं पांडवांचे ओटे अद्याप दाखविले जातात. येथील किल्ल्यांत जुने अवशेष आहेत. निजामशाहीचा मूळ पुरुष येथलाच होता.

**वसमतनगर** :—याची नावे वसुमति, वसंतनगर व बसंतनगर अशी आढळतात. येथील दशमुखांच्या कागदपत्रांत कोणी भारतराज होऊन गेल्याचा उल्लेख आढळतो. येथें कांहीं मराठी, जैन वाङ्मयहि उपलब्ध झालें आहे. येथें शुकानंद व बोधानंद या दोन स्वामींचे मठहि आहेत. शुकानंद हे राजा चंदुलाल यांचा जो गुरु देशिकनंद त्यांचे गुरु होते. वसुमती आख्यान नांवाचा एक ग्रंथहि उपलब्ध झाला आहे.

**कानसूर** :--येथें संकेश्वराचे देवालय आहे. या गांवचे नांव स्कंदेश्वरपूर असें असावें. हें गांव गुंजजवळ आहे.

**मुदगल** :--गोदाकांठच्या या मुदगल गांवी मुदगलेश्वराचे देवालय आहे. मुदगल आख्यान नांवाचा ग्रंथहि उपलब्ध झाला आहे. येथेंच एक इतिहासप्रसिद्ध लढाई झाली होती.

**वालूर** :--या गांवचें जुने नांव वाल्मिकपूर असल्याचा उल्लेख आढळतो. येथें वाल्मिकीचें मंदिरहि आहे.

**धनगर टाकळी** :--या ठिकाणीं सुप्रसिद्ध सत्पुरुष दाजीगुरु यांची समाधी आहे. यांनीं संस्कृतमध्यें वेदावर लेखन केलें आहे. नांदेडहून निघणारे दाजीगुरु पंचांग हे यांच्याच नांवावर निघते.

**परतुड** :—याचा उल्लेख ग्रंथांत प्रल्हादपूर असा आढळतो. येथें गांवाबाहेर नृसिंहाचे जुने हेमाडपंती देवालय आहे व गांवांत नवें देवालय आहे. येथील नृसिंहाच्या मूर्तीएवढी मूर्ति जवळपासच्या परिसरांत आढळत नाहीं. ती काळी वालुकामय असून एका खणांत मावणारी भव्य व सौम्य अशी आहे. येथील देशपांडे दप्तरांत २४० वर्षांपूर्वीचे कागदपत्र मिळाले. येथील पुराणिकाच्या घरीं ३०० हस्तलिखितें मिळालीं. येथें थोरले माधवरावांचा एक मुक्काम झाला होता. प्रल्हादक्षेत्र महात्म्य हा ग्रंथ उपलब्ध झाला आहे. जवळच कुरुक्षेत्र नांवाचें फार मोठें तीर्थ आहे व बाणगंगा नदी आहे. येथें रामानें बाण मारला होता असें म्हणतात.

**कासार बोरी**:—सुप्रसिद्ध महानुभाव ग्रंथकार भास्करभट बोरीकर यांचें हे निवासस्थान. यांचा शिशुपाल वध हा ग्रंथ प्रसिद्ध आहे.

**धारासूर**:—येथील मंदिर म्हणजे औंढा नागनाथ येथील मंदिराची प्रतिकृति होय.

**शिरडशहापूर**:—येथील जुने जैन मंदिर प्रसिद्ध आहे. त्या मूर्तीबद्दल आख्यायिका आहेत. येथें ग्रंथ संपत्तीहि बरीच सांपडण्याचा संभव आहे.

**नवागड**:—उखळद:—मिरखेल स्टेशनजवळ नेमिनाथाचें प्रसिद्ध मंदिर आहे. ही मूर्ति चालुक्याच्या वेळची आहे असे म्हणतात.

**वसेगांव**:—येथील जैन मंदिर प्रसिद्ध आहे.

**शेंदूरसना**:—शिरडशहापूर जवळ असून येथें शिवलीलामृतांतील दुसऱ्या अध्यायांतील मृगिणी आख्यानाचें दृश्य अद्याप आहे. येथील बेलाचें झाड व तळें हें पाहून असें वाटतें कीं, श्रीधरानें या ठिकाणींच तें आख्यान लिहिलें असावें.

**किल्ले वडगांव**:—येथें जुना किल्ला आहे.

**उंबरखेड**:—मंठ्याजवळ असून येथेहि भुईकोट किल्ला आहे.

**गंगाखेड**:—परभणी–परळी या रेल्वे फांट्यावरचें हें गांव. गोदावरी नदीच्या जलस्पर्शानें या गंगाखेडला धार्मिक महत्व प्राप्त झालें. हें एक धर्मक्षेत्र मानलें जातें. येथील वस्ती बरीच जुनी असल्याचा उल्लेख जुन्या कागदपत्रांत आढळतो. येथील राजमहाल जीर्णावस्थेत असला तरी प्रेक्षणीय आहे. गोदावरीच्या कांठी जहागिरदारांनी विस्तीर्ण असे घाट बांधले आहेत. येथील राज-

घराण्यांतील कागदपत्र " पुणें अखबार " नांवाच्या ग्रंथांत प्रसिद्ध झाले आहेत. गंगाखेड–नांदेड एस्. टी. सर्व्हिस आहे.

**प्रमुख यात्रा स्थानें:– हजरत सय्यद शहा:**—परभणी या ठिकाणीं दरवर्षी हजरत सय्यद शहा तुराकुलहक यांच्या उरूसाप्रीत्यर्थ हजारों हिंदु मुसलमान लोक दूर दूर ठिकाणाहून येतात आणि त्यांचें दर्शन घेतात. हा उरूस चार पांच दिवसपर्यंत अत्यंत धुमधडाक्यांत चालतो. सरकारी आणि बिनसरकारी खात्यातर्फे ह्या उरूसांत प्रदर्शनें भरविलीं जातात. हें ठिकाण परभणी रेल्वे स्टेशनपासून दोन मैलावर असून उरूसाच्या प्रसंगीं खास एस. टी. गाड्यांची व्यवस्था केली जाते.

**औंढा नागनाथ:**—औंढा नागनाथ हें भारतांतील बारा ज्योतिर्लिंगांपैकीं एक असून ह्या ठिकाणीं दरवर्षी यात्रा भरत असते. सुमारें ५०,००० लोक या यात्रेंत भाग घेऊन भगवान शंकराचे दर्शन घेतात.

**सेलू:**—ह्या ठिकाणीं दरवर्षी केशवराव बाबासाहेब यांची यात्रा भरत असून ह्या यात्रेस तीन चार हजार यात्रेकरू जमत असतात. सेलू हें रेल्वे स्टेशन मनमाड काचीगुडा रेल्वे मार्गावर वसलें आहे.

**चारठाणें-चारूक्षेत्र:**—चारठाणा ह्या ठिकाणीं दरवर्षी सय्यद शहा जमाल साहाब यांचा उरूस भरत असून ह्याप्रसंगीं हजारों यात्रेकरू उपस्थित असतात. चारुदत्त येथें रहात असे असें म्हणतात. जेथें जेथें खणलें जातें तेथें मंदिराचे अवशेष आढळतात. नुकतेच एका मंदिराचें उत्खनन झालें. त्यांत जैनमूर्ति सांपडल्या. येथील चार स्थानांवरील तीर्थांत स्नान केल्यानें मनुष्य पावन होतो अशी आख्यायिका आहे.

**गुंज:**—हें ठिकाण गोदातटाकी वसलें असून ह्या ठिकाणीं सुप्रसिद्ध सत्पुरूष योगानंद सरस्वती यांची समाधी आहे. ह्या ठिकाणीं दरवर्षी यात्रा भरत असून दोन तीन हजार भाविक यात्रेकरू यात्रेंत भाग घेऊन योगानंद सरस्वतीच्या समाधीचें दर्शन घेतात.

**जिंतूर:**—याचा उल्लेख जैमिनीपूर असा कांहीं ग्रंथात आढळतो. याचें नांव जैनपूरहि संभवते. या ठिकाणीं प्राचीन जैन मंदिर आहे.

**दैठणा:**—ह्या ठिकाणीं दरवर्षी ठाकुरबुवांची यात्रा भरत असून ह्या यात्रेस ४,००० यात्रेकरू हजर असतात. हें ठिकाण परभणी तालुक्यांत आहे.

**तामसी:**—या ठिकाणीं दरवर्षी लकडीबुवांची यात्रा भरत असून सुमारे ६,००० यात्रेकरू यांत भाग घेऊन महाराजांचें दर्शन घेतात. हें ठिकाण जिंतूर तालुक्यांत आहे.

**निशाना:**—ह्या ठिकाणीं दरवर्षी खंडोबाची यात्रा भरत असून सुमारें २,००० यात्रेकरू या यात्रेस उपस्थित असतात. हें ठिकाण कळमनुरी तालुक्यांत आहे.

**येळेगांव:**—हें ठिकाण कळमनुरी तालुक्यांत असून ह्या ठिकाणीं दरवर्षी तुकाराम महाराजांची यात्रा भरत असते. ह्या यात्रेस सुमारे ३,००० यात्रेकरू येतात.

# परभणी जिल्ह्यांतील संत आणि कवि

**भास्कर भट**

वायव्य प्रांतापर्यंत ज्या पंथाची पताका आज फडकत आहे त्याचे पहिले पंर्थाय पुरस्कर्ते श्री. भानुभट, मराठी भाषेचे (बालबोधी लिपीत) एक आद्य साहित्यिक, याच जिल्ह्यांतील होते. भानुभट हे करपरानिवासी होत. जिंतूर तालुक्यामधील बाजार पेठेचे बोरी कासार हें गांव. त्यांची मातृभूमी होय. हे विद्वान ब्राह्मण आणि कट्टर वैदीक अनुयायी होते. नंतर हे महानुभाव झाले. या पंथ दीक्षेपूर्वी कलंकी मार्गातील आचार्य केशवाचार्यांचे हे शिष्य होते. एका प्रसंगाने भानुभटास नागदेवाचार्यांचें दर्शन घडलें व त्यानंतर लौकरच त्यांनी महानुभाव जयकृष्णयानी पंथाची दीक्षा घेतली.

महानुभाव पंडीत भास्करांना त्यांच्या काव्यगुणांमुळें महींद्र भटापेक्षां श्रेष्ठ मानतात. त्यांचें काव्य सरळ मऱ्हाठी. ते शृंगारिक लिहीत. त्यांचीं रूपकें सुंदर असत. शीघ्र कवी म्हणून त्याकाळीं ते प्रसिद्ध होते.

**भक्त नामदेव**

प्रभावती परिसरांतील दुसरा वैदिक संत आणि वारकरी सांप्रदायाचे आद्य भक्त नामदेव हे सरसीचे. नामाच्या आईचें नांव गोणाबाई. नामदेव मोटे व जाणते झाल्यावर त्यांचे लग्न राजाई बरोबर करण्यांत आलें. सरसी हें हिंगोली तालुक्यांतील जुन्या तहशीलचे गांव. हे परिसरच पर्वत राजीचें, दऱ्याखोरीचें, श्वान श्वापदाचें. तेव्हां बंडखोर लोकांच्या छंदी लागून नामदेवानें अनेक ब्राह्मण गरीब वाटसरू यांचे खून केले. अनेकांना लुटलें. तेव्हां राऊत त्याच्या पाठीशीं लागले. त्यांच्याशीं नामदेवाच्या झटापटी झाल्या. मात्र नामदेव नित्य नेमानें औंढ्या नागनाथाच्या दर्शनास येत. एकदां ते असेच दर्शनास आले असतां तेथें एक बाई आपल्या मुलांना घेऊन आली होती आणि तिचीं मुलें भुकेमुळें रडत होतीं व ती बाई त्यांना मारीत होती. नामदेवांनीं बाईला ह्याचें कारण विचारलें असतां ती म्हणाली, "नामदेवानें माझ्या नवऱ्यास मारल्यामुळें आमची अशी दशा झाली आहे." तें दृश्य पाहून नामदेवाचें मन द्रवलें आणि त्यांना उपरति झाली.

नामदेवानें विसोबा खेचराकडून मंत्राचाच नुसता उपदेश घेतला नसून ते काव्यरचनाहि त्यांच्या जवळच शिकले.

नामाचें श्रेष्ठत्व जनसमुहास पटविणारी व्यक्ति म्हणजे त्याची आवडती दासी जना होय. महाराष्ट्रांतील संत कवियित्री कोण ? असें विचारल्यास कोणीही जनाबाईकडेच बोट दाखवतील. जनाबाईचे चरित्र अलौकिक व चमत्कृतिपूर्ण आहे. तिला संत मेळाव्याचा सहवास नामदेवामुळें घडला. त्यामुळें जनाबाई नामदेवाप्रमाणेंच भक्ति-प्रेमाच्या सरोवरांत मनसोक्त विहार करून सदानकदा आत्मानंदात रंगलेली असे. "हाती काम व मुखी नाम" अर्थात भक्ति व कर्म मार्गांचा मधुर संगम तिच्या ठायीं होता. म्हणून जनाबाईस सर्वच 'राजयोगी' मानतात.

**जनाबाई**

एकनाथ समकालीन संत कवि, एक प्रसिद्ध टीकाकार व तत्त्वविवेचक कवि म्हणून श्री. रंगनाथ मोगरेकर महाराष्ट्रांत प्रसिद्ध आहेत. ज्ञानी यांच्या काव्याकडे जास्त ओढले जातात. यांनीं बरेंच साहित्य निर्मिलें आहे. 'चित्सदानंद लहरी' ह्या भगवत्गीतेवरील टीकेंत ज्यांच्या गांवाचा उल्लेख आलेला आहे, तें मोगरे गोदातटाकी परभणी जिल्ह्यांत आहे. रंगनाथ हे सिद्धानंद उर्फ वासुदेवानंद–परमानंद वैकुंठानंद–कृष्णानंद यांच्या परंपरेतले होत. योगवासिष्ठ हा ग्रंथ योगवासिष्ठ याजवरील टीका होय. रामायणांतील सव्वादोनशे श्लोकांवर ही मराठी टीका आहे. या टीकेची एकूण दहा प्रकरणें असून ग्रंथसंख्या ७००० आहे. ही टीका त्यांनीं शके १५३० कीलनाम संवत्सरांत लिहिलेली आहे.

**श्री. रंगनाथ मोगरीकर**

मुरारपंत देशपांडे पैठणचे राहाणारे. त्यांना कुणी निंबाचा (कडू) पाला खाऊन तपश्चर्या करा, पुत्र संतान होईल असें भविष्य वर्तविलें होतें. त्याप्रमाणें त्यांनीं निंबाचा कडू पाला खाऊन तप केलें. मुरारपंतांना पुत्ररत्न झाले. त्याचे नांव त्यांनीं "निंबाजी" ठेवलें. निंबाजीचे पुढें ते निंबराज बनले. कारण "पूर्व सुकृत फळा आलें". यांच्या गुरुचें नांव नरहरी होते. तपस्वी पित्याचा पुत्र मोठ्या आदराचें स्थान बनलेला होता. निंबराजानी ( १ ) ज्ञानबोध ( २ ) जपमाळ व बरीचशी पदें लिहिली.

**श्री निंबराज**

शाक्त पंथाचा प्रसार श्री. रायभास्कर अथवा भासूरानंदाचे शिष्य शुकानंद यांनीं केला आहे. यांनी त्याचा अंगिकारच नव्हे तर योग्य जोपासनेचे कार्यहि केलें. शुक हे सुदामदेवाचे अवतार होत. त्यांनीं अरण्यांत तपश्चर्या केली म्हणून त्यांना तेंच नामाभिधान त्यांच्या पित्यांनीं दिलें. त्यानंतर त्यांनीं तीर्थयात्रा केल्या. नंतर ते स्थायिक झाले. अज्ञानी जीवांचा उद्धार करण्याचें कार्य यांनीं केलें. यांनीं गणेश, देवी ( चक्रश्वरी ) नारायण यांच्या उपासनेचा पाया शास्त्रशुद्ध पद्धतीनें अखिल महाराष्ट्रभर घातलेला आहे. शुक अत्यंत प्राच्यविद्या पंडीत होते. ते योगपट्ट होते. त्यांनीं स्वपंथ प्रचारार्थ संस्कृत मराटीतून जे ग्रंथ तयार केले ते आज वसमत मठांत आहेत.

**श्री. शुक**

हे प्रख्यात सत्पुरुष साधू महाराज पुणें जवळील कानडखेड या गांवचे होते. यांच्या वडिलांचें नांव रामाजीपंत व आईचें नांव रमाबाई होते. हे मूळचे कुळकर्णी. यांचे नांव हनुमंतराव होते. बालपणापासून याना ईशभजनाची गोडी. मौंजीबंधनानंतर लौकरच यांचा विवाह झाला. ते नंतर माहुरास तपश्चर्येस गेले. तपश्चर्येनंतर खंदारचा जहागीरदार राजा जयसिंह याच्या विनंतीवरून खंदारला कांहीं काल मंत्रीपदाचें काम करूं लागले. ते एक चांगले सल्लागार होते.

**साधु महाराज**

एकदां जयसिंह हनुमंतरावच्या भेटीस किल्ल्यांतील निवासस्थानीं गेले असतां, ते दत्तार्चनांत ध्यानमग्न असल्याचें पाहिलें. तेव्हां राजा स्वयंस्फूर्तीनें " हनुमंतराव खरोखरच साधु झाले " असें उद्गारला. तेव्हांपासून या घराण्याचें साधु हेंच नांव प्रचारांत आलें. कांहीं काळानंतर ते तीर्थयात्रेनिमित्त पंढरपुराकडे गेले. संपूर्ण तीर्थयात्रा आटोपून साधु महाराज परतल्यावर राजाच्या आग्रहाखातर परत ते खंदार येथें राहूं लागले. मौलाना शहा रफीउद्दीन खंदारकर ह्या थोर इस्लामी संताचे हे परममित्र होते. या वास्तव्यांतूनच त्यांनीं राजास राजनीतीचा उपदेश केला. रामाजीपंतांच्या ( वडील ) मृत्यूनंतर परिवारासह ते माहुरास निघाले. परंतु मार्गांतच त्यांना दत्ताचा दृष्टान्त झाला. ' मी तुझे घरीं सात पिढ्या राहीन, माहुरास येऊं नये. ' त्यामुळें साधु महाराज उमरखेडीं परतले. यांचें काव्यांतील नांव " रामात्मज " असें आहे.